नोव्हेंबर-डिसेंबर १९८६] भक्त सायुज्य

# श्री साईलीला



नोव्हेंबर-डिसेंबर १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

श्री. रा. द. बन्ने
कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)


---


**वर्ष ६५ वे]** **दिपावली अंक भक्त अनुभव विशेषांक** **अंक ८ व ९**

**किंमत २ रु.**

**दूरध्वनी क्रमांक ४१२२५६१**


---


: कार्यालय :

**''साईनिकेतन'', प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे
श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## श्रीसाई वाक्सुधा

काम, क्रोध, लोभ जाण।
ही नरकाची द्वारें तीन।
यांचे पायीं आत्मविनाशन।
यदर्थ निक्षून त्यागावें॥ १५०॥

परम दयाळू साई समर्थ।
साधावया भजुहितार्थ।
तयालागीं दक्षिणा मागत।
शिक्षणही देत त्यागाचें॥ १५१॥

दक्षिणेची काय किमत।
साधावया गुरूवचनार्थ।
प्राणही द्यावया नाहीं जो उद्यत।
तयाचा परमार्थ कायसा॥ १५२॥

खरेंच भक्त कल्याणावीण।
बाबांस काय दक्षिणेचे कारण।
स्वयें तयांचे नव्हतें जीवन।
अवलंबून दक्षिणेवरी॥ १५३॥

पोटासाठीं भिक्षा मागत।
दक्षिणेपोटीं नव्हता स्वार्थ।
दक्षिणादानें शुद्ध चित्त।
व्हावेत निजभक्त हा हेत॥ १५४॥

श्रीसाईसच्चरित अध्याय १४ वा



**ही दिवाळी व नूतन वर्ष आमच्या सर्व भक्तांना, वाचकांना, हितचिंतकांना सुखाची, समाधानाची व उत्कर्षाची जावो हीच शुभेच्छा**

मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# दिवाळी अंकाचे मानकरी — १९८६

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | | ७ |
| २ | श्री साईनाथांचा शरणार्थी | — श्री. नि. का. ढेर | १० |
| ३ | दु:खद प्रसंग आणि बाबांनी मला काय शिकविले? | — [illegible] मु. व. निंबाळकर | १४ |
| ४ | श्री साईबाबांच्या हयातीत माझ्या वडिलांना आलेले अनुभव | — सौ. शोभना पालकर | १[illegible] |
| ५ | अन् हृदयाची हालचाल पुन्हा चालू झाली | — श्री. सूर्यकांत चंचे | १९ |
| ६ | सारे जीवन साईमय झाले। माझ्या सदनी साईनाथ आले | — सौ. संगीता गोडबोले | २१ |
| ७ | भक्त कैवारी श्री साईबाबा | — डॉ. अनंत एस्. शिंदे | २३ |
| ८ | मूर्तिमंत भगवान श्री साईबाबा | — कु. माधुरी कोविकर | २३ |
| ९ | आई, आजोबा कुठे गेले ग? | — डॉ. श्रीपाद परुळेकर | २५ |
| १० | कृपा दृष्टीचे फळ | — सौ. नंदिनी नाडकर | २८ |
| ११ | अन् मी लेखक-कवि संमेलनात सहभागीही झालो | — डॉ. अनिल मोरे | २९ |
| १२ | काय हा साईंचा चमत्कार | — कु. राजश्री नाईक | ३१ |
| १३ | मुलाचा ताप उतरला | — श्री. पी. डी. काळे | ३२ |
| १४ | साई तारी त्यास कोणी मारी | — सौ. शुभांगी सावंत | ३२ |
| १५ | जशी श्रद्धा तसा अनुभव | — श्री. विजयसिंह परदेशी | ३३ |
| १६ | साईमाऊली हाकेला धावली | — भारती लवेकर | ३५ |
| १७ | अंतर्ज्ञानी श्री बाबा | — श्री. सूर्यकांत गर्जे | ३५ |
| १८ | भाव तेथे देव | — सौ. निर्मला राजे | ३६ |
| १९ | ही तर साईचीच लीला | — श्री. किशोर शिवलकर | ३७ |
| २० | शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी! | — सौ. सुशिला नानिवडेकर | ३८ |
| २१ | जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव | — सौ. भारती चव्हाण | ३९ |
| २२ | व्यक्त | — श्री दत्ता ग. माने | ४० |
| २३ | थांबा बाबा मी आलो | — सौ अस्मिता दांडेकर | ४१ |
| २ | मला श्रद्धा मिळाली | — सौ अश्विनी चीपकर | ४१ |


| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २५ | जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव | — श्री. शिवाजी जाधव | ४३ |
| २६ | श्री साईबाबांनी केलेला चमत्कार | — सौ. शोभा देशपांडे | ४४ |
| २७ | श्री साईंनी काळाला परतवून लावले | — श्री. नंदू पाटील | ४५ |
| २८ | जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव | — सौ. तारा कोंडविलकर | ४६ |
| २९ | बाबांच्या उदीने मुलगा बरा झाला | — श्री. शाम जावळकर | ४६ |
| ३० | बाबांच्या कृपेने पुनर्जन्म | — सौ. अनुराधा पिंपळगावकर | ४७ |
| ३१ | शरण मज आला, आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी | — श्री. भूषण रेखी | ४८ |
| ३२ | श्री साईनाथांचे अजूनही शिरडीत वास्तव्य | — सौ. अरुणा कर्णिक | ४९ |
| ३३ | साईकृपेचा अनुभव | — श्री. एस्. जी. सावंत | ५० |
| ३४ | असाही एक अनुभव | — सौ. सुनंदा गोसावी | ५२ |
| ३५ | असे पुन्हा एकदा साई धावून आले | — श्री. प्रकाश सामंत | ५३ |
| ३६ | श्री साईंची नित्य माझ्या पाठी छाया | — कु. छाया आ. सापळे | ५५ |
| ३७ | बाबांनी मला व बहिणीला नोकरी दिली | — श्री. उ. य. सावंत | ५६ |
| ३८ | जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी | — सौ. जयश्री घाग | ५७ |
| ३९ | श्री साईलीलेचे साक्षात्कार | — श्री. पा. शं. भुजबळ | ५७ |
| ४० | उदीचा प्रताप | — सौ. उषा महाजन | ६० |
| ४१ | बाबांच्या कृपेने मुलाचा पुनर्जन्म | — श्री. डब्ल्यू. के. शेलार | ६१ |
| ४२ | बाबांचे घडता स्मरण, दुःखास मिळे विराम | — श्री. भालचंद्र गंद्रे | ६२ |
| ४३ | शांतीचा अमोल ठेवा - साईप्रसाद | — सौ. स्मिता सावंत | ६३ |
| ४४ | एक अनुभव | — श्री. तुकाराम पोयरेकर | ६४ |
| ४५ | बाबा मला द्यावी सोबत | — सौ. लिलावती बिनसाळे | ६५ |
| ४६ | साईकृपेने पास झालो | — श्री. मुकुंद मोरे | ६६ |
| ४७ | एक अनुभव.... अनेक अनुभव | — श्री. गुरुदास बांबोळकर | ६६ |
| ४८ | साईराजा, तुम्हीच माझे कल्पतरु | — सौ. निलिमा नाईक | ६८ |
| ४९ | श्री दत्तसाई | — श्री. यशवंत भंडारी | ६९ |

| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ५० | श्री साई पोस्टमन | — सौ. प्रमिला पगारे | ७० |
| ५१ | बाबांनी कायम नोकरी दिली | — श्री. देविदास शिंदे | ७० |
| ५२ | शिरडीचे श्री साईबाबा नवसाला पावले | — श्री. अनिल रिसबूड | ७२ |
| ५३ | श्री बाबांनी मुलाला सुयश दिले | — श्री. मधुसूदन सावंत | ७४ |
| ५४ | साई तारी त्याला कोण मारी | — श्री. दिलीप लांडे | ७५ |
| ५५ | साईबाबांच्या कृपेने टाळेबंदी उठली | — श्री. राजीव नारकर | ७६ |
| ५६ | नित्य मी जिवंत, जाणा हेची सत्य.... | — श्री. प्रमोद कोरगांवकर | ७७ |
| ५७ | मला आलेले साईकृपेचे दोन अनुभव | — श्री. वाय. एस्. जोशी | ७८ |
| ५८ | साईकृपेने केदारनाथ बद्रीनाथ यात्रा झाली | — श्री. प्रभाकर भालेराव | ७९ |
| ५९ | — साईकृपेने रेडिओ सापडला | — श्री. नारायण मेहता | ८० |
| ६० | शिरडीस ज्याचे लागतील पाय.... | — श्री. रघुनाथ लाड | ८१ |
| ६१ | विसाव्या शतकातील दिव्य शक्ती | — श्री. विश्वनाथ चव्हाण | ८२ |
| ६२ | जया मनी जैसा भाव.... | — श्री. पी. के. साळवी | ८४ |
| ६३ | प्रपंचा घोर पण साईचा आशीर्वाद थोर | — श्री. गणपत परब | ८५ |
| ६४ | साईकृपेने माझ्या नातवंडास जीवदान | — श्री. लक्ष्मण रापतवार | ८६ |
| ६५ | तुमचा मी भार वाहिन सर्वथा.... | — श्री. शूरसेन पोवळे | ८७ |
| ६६ | ही कृपा श्री साईबाबांचीच | — श्री. सुनील कुलकर्णी | ८८ |
| ६७ | अघोर प्रसंगातून तूच वाचविलेस | — श्री. प्रमोद रायसोनी | ८९ |
| ६८ | बाबा प्रसन्न असले तर.... | — श्री. के. पी. पहाडे | ९० |
| ६९ | उभा पाठीशी असता साई.... | — श्री. अंकुश दळवी | ९२ |
| ७० | नित्य मी जिवंत.... | — श्री. पी. जी. कोरगांवकर | ९३ |
| ७१ | साई तारी त्याला कोण मारी | — श्री. चंद्रशेखर तारु | ९४ |
| ७२ | बाबांची अद्‌भूत लिला | — सौ. आर. जी. जाधव | ९४ |
| ७३ | श्रद्धा असता साईवरी, फळे मिळती रसाळ गोमटी | — श्री. मोहन केळुस्कर | ९५ |
| ७४ | श्री साईबाबांचे अश्रू | — श्रीमती सिताबाई नाडकर्णी | ९५ |
| ७५ | वात्सल्यमूर्ती आई म्हणजेच श्री साई | — श्री. बाळा नाईक | ९६ |
| ७६ | असता साई पाठीराखा.... | — सौ. नीता जाधव | ९७ |
| ७७ | साईनाथांची अगाध लीला | — श्री. मधुसूदन चव्हाण | ९९ |

| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ७८ | साईनाथांनी राहण्याची खोली बदलून दिली | — सौ. उषा जठार | १०० |
| ७९ | माझा पहिला अनुभव | — श्री. सोमकांत गांवकर | १०१ |
| ८० | देव तारी त्याला कोण मारी | — श्रीमती मनोरमा परुळेकर | १०३ |
| ८१ | मृत्यूच्या दारातून परतले बस प्रवासी | — श्री. संजय परळकर | १०४ |
| ८२ | उदी प्राशनामुळे आईला होणारा त्रास संपला | — सौ. ज्योती कोरेकर | १०६ |
| ८३ | अकल्पित अभिषेक | — श्री. अनिल रसाळ | १०६ |
| ८४ | श्री साईबाबा आणि वचनं | — श्रीमती उषा रावरीकर | १०८ |
| ८५ | साईकृपेने वर मिळाले | — एक साईभक्त महिला | १०९ |
| ८६ | साईनाथांचा महिमा | — श्री. रामचंद्र कोयंडे | ११० |
| ८७ | साईबाबांच्या उदीचा प्रभाव | — श्री. लक्ष्मण रापतवार | १११ |
| ८८ | फुलांचा सुवास दिसत नव्हतो | — श्री. कृ. व्य. हवालदार | ११२ |
| ८९ | बहिणीचे लग्न जुळले | — राजश्री रा. कुळकर्णी | ११३ |
| ९० | रेल्वेचा प्रथम वर्ग बाबा आणि मी | — श्री. आशिष कालेवार | ११४ |
| ९१ | विस्कळीत झालेली वर्कशॉपची घडी साईकृपेने सुरळीत | — सौ. विमल परदेशी | ११५ |
| ९२ | बाबांनी जिवित व वित्त हानीपासून वाचविले | — श्री. ललित शृंगारपुरे | ११६ |
| ९३ | मला आलेले साईकृपेचे अनुभव | — सौ. नलिनी डांगे | ११७ |
| ९४ | त्या दिवशी मी सायकल प्रवासास निघालो असतो तर... | — श्री. सोमनाथ कारखानीस | ११८ |
| ९५ | भक्तनिष्ठ श्री संतश्रेष्ठ साईबाबा | — श्री. मधुकर वखारे | ११९ |
| ९६ | श्री साई चमत्कार | — सौ. सुमित्रा धुरी | १२० |
| ९७ | आईचा दुसरा जन्म | — श्री. सुनिल महाजन | १२१ |
| ९८ | हा रिक्षा ड्रायव्हर कोण? | — श्री. कृ. भा. देशमुख | १२२ |
| ९९ | साई माझा पाठीराखा | — श्री. शं. ग. सारंगधर | १२३ |
| १०० | मागें जें जें त्यास तें तें लाभे | — श्री. सदानंद ल. वाईरकर | १२५ |
| १०१ | मला आलेले साईबाबांचे दोन अनुभव | — श्री. लक्ष्मण देऊ धुरी | १२६ |
| १०२ | साईकृपेमुळे नोकरी मिळाली | — श्री. मधुकर कावळे | १२७ |
| १०३ | शिरडीवाले साईबाबा | — | १२८ |

संपादकीय

# भक्तांनो,
# श्री साईसच्चरिताची नुसती पारायणे नकोत तर....



साईभक्तांनो, साईप्रेमींनो, तुम्ही आपल्या घरी आपल्या आवडीने, आदराने, श्रद्धेने श्री साईबाबांची पोथी श्री साईसच्चरित या नावाने प्रसिद्ध आहे, ती आणली असेल. त्या पोथीचे तुम्ही वाचनही केले असेल, त्या पोथीची तुम्ही पारायणे केली असतील. तुम्ही वाचून सप्ताह पण केले असतील. श्रीबाबांची पोथी वाचून तुम्ही एका चांगल्या अध्यात्मिक ग्रंथाचे वाचन केले असे सहाजिक कुणीही म्हणेल.

पण भक्तांनो, नुसती पोथी वाचून काही उपयोग नाही. स्वतः श्री महाराजांनी या बाबतीत एका भक्ताची चांगलीच कान उघडणी केली तिचे चिंतन प्रत्येकाने करण्यासारखे आहे.

एकदा बेळगाव नजिकच्या वडगांवी पुढील घटना घडून आली. तेथे जमीन मोजणी करण्याच्या हेतूने एक सद्‌गृहस्थ बरोबरच्या नोकरमंडळीसह गेले. व तिथे त्यांनी मुक्काम ठोकला. त्या गावी एक सत् पुरुष राहात असत. ते मोजणीदार गृहस्थ देवभक्त होते. अगदी तुमच्या आमच्यासारखे! या गावात सत्-पुरुष एक आहेत हे समजताच ते त्यांच्या दर्शनास गेले. त्यांच्याकडे जाऊन त्यांनी साष्टांग प्रणिपात केला. नित्याप्रमाणे त्या सत् पुरुषाने आशीर्वाद दिला. त्या मोजणीदाराच्या मनाला बरे वाटले. त्या सत् पुरुषाचे हातात त्यावेळी निश्चल दासकृत 'विचार-सागर' हा ग्रंथ होता. तो ते वाचत होता. नमस्कार-चमत्कार होऊन मोजणीदार गृहस्थांनी निरोप घेतला. तेव्हा ते म्हणाले, "हे पहा! माझ्या हातात हा ग्रंथ आहे ना! याचे नाव लक्षात ठेऊन तो आपणही वाचावा. तुमचे मनोरथ परिपूर्ण होतील हे विसरू नका हं! पुढे मागे कामाच्या निमित्ताने तुम्ही उत्तर दिशेला जाल त्यावेळी तुमची एका महापुरुषाची भेट होईल. तशी भेट व्हायला भाग्य लागते परंतु तुमच्या भाग्यात ती भेट आहे. पण तुमचे मन काही स्थीर नाही. भेट झाल्यावर ते महापुरुष पुढचा मार्ग तुम्हाला निश्चित दाखवतील, व तुमचे मन निःसंकोच होईल. त्यांच्या बोधामृताने तुमच्या मनाला शांती मिळेल; व तोच शाश्वत सुख समाधानाचा मार्ग आहे. जा मजेत रहा."

वडगांव येथील मोजणीचे कामकाज संपल्यावर त्या गृहस्थांना जुन्नर येथे जायचे होते; म्हणजे मार्गातील बिकट असा नाणेघाट चढून जावयाचे होते. त्या घाटाची चढण फार बिकट आहे. आता काय करायचे? तिकडे जाताना रेड्यांचा उपयोग करीत असत. घोड्याऐवजी रेडा! रेड्यावर खोगीर घालायचा व त्यावर स्वार व्हायचे! परंतु रेड्यावर स्वार झाल्यावर आदळत आपटत धक्के खात चढणे चढावी लागत. सर्वांग ठणकत

बाबा त्यावेळी नेहमी प्रमाणे चावडीत बसले होते. दोघांनीही जाऊन त्यांचे दर्शन घेतले. बाबांना ओळख करून द्यायची मुळीच गरज नव्हती. बाबा अंतर्ज्ञानी. दर्शन घेऊन मोजणीदार एका बाजूस जाऊन बसले. त्यांच्याकडे पाहून बाबा म्हणाले, "कसं काय ठीक आहे ना! तुम्हाला वडगांवला एक कानडी अप्पा भेटले. त्यांनी तुम्हाला सांगितले ते सत्य आहे. परंतु हा मार्ग कठीण आहे. रेड्यावर बसून नाणेघाट चढणे एकवार सुलभ म्हणता येईल. परंतु हा अध्यात्माचा घाट चढून पलीकडे जाणे वाटतं तितकं सुलभ नाही बरं! फार कष्ट घ्यावे लागतात!"

मोजणीदाराला हे सारे ऐकून चांगलीच खूणगाठ पटली. त्यांनी बाबांना पुनरपि साष्टांग प्रणिपात केला व म्हणाले, "बाबा! तुम्हीच माझे रक्षण करणारे आहात. मी तुम्हाला शरण आलो आहे. कृपा करा मज दीनावर!" वास्तविक खरे पहाता कुठे वडगाव नि कुठे शिरडी. वडगावला कानडी अप्पा भेटले. त्यांच्या हातातील 'विचार सागर' ग्रंथही पाहिला व त्यांनीच सांगितले की पुढे लौकरच एका महापुरुषाची भेट होईल त्याप्रमाणे भेटही झाली हे केवढे भाग्य! असे विचार मनात घोळताहेत तोच बाबा म्हणाले, "खरं आहे कानडी आप्पांनी सांगितलं ते! त्या ग्रंथाची किंवा इतर कोणत्याही ग्रंथाची महती कितीही असली तरी त्याप्रमाणे आपल्याकडून आचरण घडले पाहिजे. पुस्तकात लिहिलेलं पुस्तकात राहिलं. विचार सागर ग्रंथाचे महात्म्य तुम्हाला वडगावच्या आप्पांनी सांगितले ते अक्षरशः खरे आहे. त्याचा आचार कसा करावा? हे शिरडीत कळेल असं त्यांनी सांगितलं ते अगदी बरोबर आहे. त्याचं असं आहे आपण ग्रंथ वाचावा किंवा ऐकावा. परंतु ऐकल्यानंतर त्याचे मनन केले पाहिजे. त्याची पारायणावर पारायणे झाली पाहिजेत. मनावर त्याचा चांगला पक्का ठसा उमटला पाहिजे. त्याचा निदिध्यास घेतला पाहिजे. ध्यानी मनी ते विचार घोळून त्याप्रमाणे आचरण घडत गेले पाहिजे. असे घडेल जेव्हा तेव्हाच त्या वाचनाचे सार्थक होईल! आपण ग्रंथ वाचला एवढ्यावरच आपली जबाबदारी संपली नाही. तर जे काही वाचले ते प्रत्यक्ष कृतीत उतरले पाहिजे. नाही तर उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणे प्रकार घडायचा. तसं घडता कामा नये. वाचल्याप्रमाणे जर कां आपल्याकडून आचरण घडलं नाही तर ते वाचून व्यर्थ, व्यर्थ होय. तसेच ग्रंथातील महत्वाचा भाग आपणास नाही समजला तर तो सद्गुरूकडून समजून घेतला पाहिजे."

श्रीबाबांच्या या उपदेशाने त्या मोजणीदाराचे कान खाडकन् उघडले. मनाची बंद झालेली कपाटे पण एकदम उघडली. संशय निरसन झाले व जे जीवनामृत हवे होते ते पण बाबांच्या कृपेने मिळाले.

तेव्हा भक्तांनो, तुम्ही बाबांची पोथी वाचता ना! वाचा. पण त्या पोथीतून बाबांनी जे काही उपदेशात्मक सांगितलेले आहे ते पण आचरणात आणण्याची सुबुद्धी तुम्हाला होवो. त्यांच्या पोथीचे वाचन करून, मनन करून, चिंतन करून त्या पोथीतील चरणांचा निदिध्यास घ्यायचा हाच यंदाच्या दीपावलीचा संदेश तुम्हाला द्यावासा वाटतो.

असे. परंतु करणार काय? पायी जाणे अशक्य मग रेड्याची शेपटी धरल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

त्यांनी भाड्याने एक रेडा मिळविला; व आपला प्रवास सुरू केला. खूप त्रासाचा प्रवास होता तो! पण तो कसाबसा संपवून स्वारी जुन्नरला पेठेत एकदाची दाखल झाली. तेथे जे काही जमीन मोजणीचे कामकाज होते ते तीन-चार दिवसात संपविले. इतक्यात कल्याणला बदली झाल्याचा हुकूम त्यांच्या हाती पडला.

तेथून त्या मोजणीदारास कल्याणला यावे लागले. दैवयोग कसा असतो पहा! कल्याणला आले तर तिथे होते साईभक्त नानासाहेब चांदोरकर. त्यांचेकडून त्यांना साईबाबांची थोरवी समजली. एवढेच नव्हे तर ते म्हणालेही, "मी जातो आहे शिरडीला. तुम्ही या माझ्याबरोबर बाबांच्या दर्शनाला. चांदोरकरांनी अगदी मनापासून सांगितले परंतु ते त्यांच्या मनात शिरले पाहिजे ना! उगाच कसे बरे ते शिरेल? त्याला लागते तशीच पूर्व पुण्याई!

ज्या दिवशी नाना कल्याणहून निघायचे होते त्याच दिवशी त्या मोजणीदारास ठाणे कोर्टात एका फिर्यादी निमित्त साक्षीसाठी हजर रहायचे होते. मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला. इकडे आड तिकडे विहिर! कोर्टाची तारीख चुकविली तर दंड होण्याची भीती! बरं शिरडीला जाण्याची तर इच्छा व सोबत खूपच चांगली! पण बिचारा पोटार्थी माणूस. नोकरी गेली तर! ही मनात त्याच्या चिंता!

परंतु नानासाहेब चांदोरकर त्यांना आश्वासनपूर्वक म्हणाले, "बाबा रे, त्याची तू काही एक चिंता करू नकोस. श्रद्धायुक्त अंतःकरणाने बाबांच्या दर्शनास ये तेच तुझ्या चिंतेचे निवारण करतील. तो भार त्यांच्यावर सोपवून तू मोकळा हो."

परंतु कसचे मोकळे व्हायला? अंतःकरणात तेवढी श्रद्धा हवी ना! ते भांडवल कुठे होते त्यांच्याजवळ? ते म्हणाले, "मनात चिंतेचा भार ठेऊन येणे आणि जाणे! गोत्यात सापडायला होईल. हे उरकतो एकदाचे काम आणि होतो मोकळा!"

"बाबा तुमची चिंता वहातील. ते तुम्हाला संकटात मुळीच पाडणार नाहीत. तुम्ही आत्ताच चला माझ्याबरोबर" चांदोरकर म्हणाले.

अखेरीस काय झाले? जे व्हायचे तेच झाले! नाना ठरल्याप्रमाणेच गेले शिरडीला मोजणीदार गेले ठाण्याला, कोर्टात हजर रहाण्यासाठी! पण त्यादिवशी तो दावा काही ना काही आकस्मिक कारणामुळे कोर्टापुढे येऊ शकला नाही त्याची तारीख पुढे ढकलण्यात आली.

मोजणीदार गृहस्थास फार मोठा पश्चाताप झाला. नानासाहेबांचे ऐकले असते तर सोन्याहून पिवळे झाले असते आता दुरुस्ती करायची म्हणजे विलंब न लावता शिरडीचे तिकीट काढायचे. अगोदर तिथे नानांची भेट घ्यायची व त्यांच्या मध्यस्थीने बाबांची भेट घ्यायची असे ठरवून ते एकदाचे शिरडीला गेले. तिथे चांदोरकरांची चौकशी केली परंतु ते दर्शन घेऊन लगेच कल्याणला निघून गेल्याचे कळले.

पण शिरडीला अकस्मात त्यांना त्यांचे एक स्नेही भेटले. त्यांचे जवळ त्यांनी आपली सारी रडकथा सांगितली. ते म्हणाले, "अहो! बाबांच्या दर्शनाला इथे मध्यस्थाची मुळीच गरज लागत नाही. त्यांचा दरबार सर्वांना सदा सर्वकाळ खुला आहे. आता तुम्ही बोलावीत आहात तर मी येतो बापडा!"

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१८)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

यानंतर दुसऱ्याच दिवशी दुपारनंतर साडेतीनच्या सुमारास मी व काकासाहेब दीक्षित द्वारकामाईस जायला निघालो. काकासाहेब समोरच्या हनुमान मंदिराच्या मार्गे गेले. मी बुटींच्या बांधत असलेल्या वाड्यातून बाहेर जाण्यासाठी वाड्यात शिरलो. तेवढ्यात एक मोठा दगड माझ्या डोक्यावर पडला व खांद्यावर आपटून खाली पडला. दगडाच्या आघाताने मी मटकन् खाली बसलो व बेशुद्ध झालो. शुद्धीवर आलो तेव्हा 'माणूस असाच मरत असतो' असे जणुकाय बाबा सांगत आहेत असे मला वाटले. शुद्धीवर आलो तेव्हा थोडे दुखत होते. नंतर काकासाहेब मला म्हणाले की, मी तुम्हाला सांगितले होते की बुटीवाड्यातून नको, सरळ शाळेवरच्या रस्त्यावरून चला, पण तुम्ही बुटीवाड्यात शिरला व अपघाताला बळी पडला. असो.

बाबांनी ताबडतोब जखमेवर लावण्यासाठी उदीमिश्रित मलम कोणाबरोबर तरी पाठविले, ते त्याने माझ्या डोक्यावर व खांद्यावर लावले आणि ते पट्टीप्रमाणे चिकटले व जे थोडे दुःख होते ते शमले, व ते सुद्धा कायमचे. काही दिवसांनंतर दुसरे काही औषध लावल्याशिवाय किंवा कांही उपाय केल्याशिवाय ती जखम आपोआप भरून आली.

हा अपघात होण्यापूर्वी साधारण एक तास अगोदर मी बाबांच्या दर्शनाला गेलो होतो. मी खाली सभामंडपात उभा राहिलो असेन किंवा बाबांच्या पाया पडलो असेन — ते आता काही नक्की आठवत नाही — परंतु एवढे मात्र खरे की मी तेथे गेलो तेव्हा बाबांनी आपले आसन उंच करून त्याच्या खाली अर्धा हात खोल व रूंद खड्डा खोदलेला दाखविला, ज्याच्यावरून मला माझ्यावर येणाऱ्या मरणघातक आपत्तीची शंका आली.

दगड माझ्यावर पडल्यावर बाबांनी पाठविलेले उदीचे औषध लावल्यानंतर मी त्या बांधल्या वाड्यातच, जेथे आता समाधी आहे तिच्या दक्षिणेकडच्या भिंतीला टेकून बसलो व माझ्या जवळ निर्णयसागरची भगवद्गीतेची प्रत होती तिच्यातून पाठ म्हणण्यास लागलो. इतक्यात काकासाहेब आले त्यांना मी म्हणालो की, बाबा एकदा म्हणाले होते, 'तुला बुटीसाहेबांच्या वाड्यात बसायचं आहे. तेच खरं होतंय असं वाटतं.' नंतर काकासाहेब बाबांना माझी खबर सांगण्यास गेले व थोड्याच वेळात परत येऊन मला म्हणाले की, बाबा म्हणाले, 'त्याला सांग, काही बोलू नकोस.' म्हणून मी काकासाहेबांजवळ काही बोललो नाही. मला अपघात झाल्याचे ऐकून राधाकृष्ण आईने तिची काळी घोंगडी माझ्यासाठी पाठवली. ती पांघरून किंवा अंथरून, दिवे लागेपर्यंत गीतेचे पाठ म्हणत राहिलो. तो दिवस चावडीचा होता. बाबा चावडीला जाऊन आरतीला सुरुवात झाल्यावर किंवा आरती करण्याची तयारी चालली असताना, मी तेथे पोचलो व पुढील खोलीत निजलो. झोपता झोपता दोन वेळा राधाकृष्ण आईचे प्रेमपूर्ण स्मरण झाले. तिने दोन वेळा आपल्या खोलीतून बाहेर येऊन माझ्याकडे करुणापूर्वक दृष्टिक्षेप करून मला म्हणाली,

"आता मी समजले की बाबा तू येथे 'येईपर्यंत' का अधीरतेने वाट पहात होते! तुझ्या आगमनाच्या दोन तीन दिवस आधी खूपच विचारात असत व जे लोक त्यांच्याकडे जात त्यांच्यातील बऱ्याच जणांना रागवत व दोघातिघांना तर त्यांच्या हातचा मारच मिळाला. तू आलास आणि ते शांत झाले व त्यांनी मारण्याचे थांबविले. तुझ्या शिरावर हे मोठे संकट होते. त्या संकटातून तुला वाचविण्याच्या तीव्र इच्छेने त्यांना असे वाटले की जर तू त्या घडीला त्यांच्या तोंडासमोर असल्यास बरे, म्हणून तुझ्या चिंतेने ते सर्वांवर आपला राग काढत असत."

दगड पडून मी बेशुद्ध होऊन खाली बसलो त्या क्षणी माझे नामस्मरण चालूच होते. आणि त्या वेळी देह सुटला असता तर अशुभ झाले नसते, परंतु जे ईश्वराला, बाबांना आवडले ते खरे. बाबांच्या एकाच लेपाने मी वाचलो; वाचलो एवढेच नव्हे तर अपघात होऊन सुद्धा मला त्यायोगे न काही वेदना सहन कराव्या लागल्या का कधी पथारी धरावी लागली! जसे काही झालेच नाही असा मी हिरता फिरता होतो. जेवताना राधाकृष्णआई नार्वेकरांना म्हणाली, "वामनने त्याच्या अवस्थेत गोड खाता कामा नये". परंतु माझी मनःस्थिती त्या वेळी अशी होती की ही सूचना माझ्या लक्षात रहात नसे व माझ्या पानात जे पदार्थ वाढले जात ते मी खाई. या सुमारास मला शरीराची काही परवाच नाही अशा रीतीने मी यथेच्छ विहार करी.

एक दिवशी सकाळी मी राधाकृष्णआईकडे गेलो तेव्हा तिने मला अपानवायु ऊर्ध्व करून प्राणायाम-ऐक्य करण्याची रीत शिकवली व नंतर एका रात्री माझ्याकडून अपानवायु ऊर्ध्व करवून, दहा मिनिटे तिने आपला अपानवायु ऊर्ध्व करून, माझ्या प्राणाशी तिच्या प्राणाचे ऐक्य केले. जणुकाय आमच्या दोघांची या कार्यात शर्यत लागली आहे असा देखावा होणाऱ्या आवाजाने झाला व अखेर माझा अपान अर्धा झाल्यावर राधाकृष्णआई उठून उभी राहिली. या प्रयोगाने तिने माझ्या तुटक्या प्राणात जणुकाय स्वतःच्या प्राणाचे सिंचन करून मला जीवित दानच दिले असे भासले.

एकदा संध्याकाळी मी शिरडी-कोपरगाव सडकेवर एके ठिकाणी बसलों होतो. सुरुवातीला बाबांची आरती मी खूप मोठ्याने म्हणू लागलो तसे थोड्याच वेळात एक आवाज ऐकू आला, 'अरे, आकाश कशाला दुमदुमवितोस?' म्हणून मनातल्या मनात सर्व प्रार्थना करून ध्यानस्थ बसलो. काही वेळाने ब्रह्मरंध्रातून माझ्या नित्य जपाच्या मंत्राचा खूप मोठ्याने परिस्फोट होऊन तो ब्रह्मरंध्रातून निघून उंच उंच चढून आकाशातील सूर्यात विलीन पावला. यावरून मला विचार आला की साईबाबांना विचारून ज्या निराकार प्राप्तीसाठी मी मंत्र जपत होतो त्यासाठीची माझी अपात्रता — जिची नानावल्लीने माझ्या माथ्यावर पथ्थर मारून जाणीव करून दिली होती — त्यामुळे तो ब्रह्मरंध्रातून निघून आकाशात विलीन पावला. या विचारात मी बराच वेळ सडकेवर बसून राहिलो. नंतर राधाकृष्णआई काकासाहेब दीक्षितांसह मला शोधत शोधत तेथे आली व माझा हात धरून ते मला शिरडीला घेऊन गेले. तरीही या अनुभवाने मला गोंधळात टाकले — तर मग आता कुठल्या मंत्राचा जप करावा? बाबांची काय सूचना आहे?

असा विचार आला, परंतु आता ४३ वर्षांनी समजू शकतो की महान मंत्र आवाज करीत ब्रह्मरंध्रातून निघून आकाशात उंच उठून विलीन झाला तो माझी नालायकी सिद्ध करत नव्हता. उलट, या प्रकारे, बाबांनी माझे ब्रम्हांडभेदन करून माझ्या प्राणाचे समष्टि प्राणाशी ऐक्य करून दिले त्याची सूचना होती. हे द्वार सहाव्या-सातव्या भूमिकेचे आहे व गुरूच्या महान कृपेनेच लाभते.

अशाच रीतीने एका संध्याकाळी गावाबाहेर जाऊन मी जवळच सडकेच्या बाजूला बसलो होतो. त्या वेळी एका माणसाने येऊन माझ्याजवळ काही मागितले. त्याला मी माझी चांदीची बटने होती ती दिली आणि तो माणूस गेल्यावर वाटले की बाबा जणुकाय म्हणत आहेत, 'कोणी काही मागण्यास आला तर त्याला सांगावे की मी असा नागडा उघडा आहे, तुला जे काही घ्यायचे असेल ते घे.' याचा अर्थ हे वचन ऐकणारा अधिकारी मुमुक्षू असला तर समजेल की निःसंग, निराकार, निरंजन, प्रावरण रहित ब्रह्म मी आहेच, ते बघ. तुला काय पाहिजे असेल ते घे, असा या वचनाचा अर्थ होतो.

एकदा संध्याकाळनंतर मी ध्यानस्थ अवस्थेत सडकेजवळ बसलो होतो. रात्र झाल्यावर काही काळाने आनंदमय स्थिती होऊन आकाशाकडे लक्ष जाता बाबा व राधाकृष्णआई जणुकाय मला सोडून निघून जात आहेत असे जाणविले. मी दुःखी होऊन दोघांना प्रेमपूर्वक नमस्कार केला व नंतर असा विचार आला, 'बाबांनी तर मला शेवटच्या कक्षेपर्यंत पोचविले, परंतु मी कधीही बाबांना याबद्दल धन्यवाद दिले नाहीत का त्यांचे उपकार मानले नाहीत, व न कधी त्यांचे ऋण फेडले. त्यावेळी मी आवाज ऐकला, 'मी तुला काहीच दुसरं नवं सांगितलं नाही, पण तू गेल्या जन्मात मला शिकविलेस तेच मी तुला शिकविले आहे. माझ्यावर तुझे उपकाराचे देणं होते त्याची मात्र फेड केली आहे.'

एका सकाळी नऊच्या सुमारास मी शंकर, शनी व गणपतींची देवळे आहेत तेथे होतो. तेवढ्यात एकाएकी मला आकाशात कोणी जीव देहापासून मुक्ती पावून जात आहे असा भास झाला. माझी नजर जाताच कोणीतरी जणुकाय म्हणाले, 'बघ, हा अग्निहोत्री जात आहे.' याने बाबा असे दाखवू इच्छित होते की अग्निहोत्रासारखे व्रत करणाऱ्याची गती जरूर ऊर्ध्व असते.

एक दिवस अगदी पहाटे मी उठलो व लेंडीकडे बघितले तर लेंडीला पूर येऊन पाणी शिगोशिग भरून वहात होते. त्या दिशेने जाण्यास काही पाऊले मी उचलली एवढ्यात दक्षिण दिशेकडे मी उभा होतो तेथून एक केवळ कौपिनधारी, अति तेजस्वी, मजबूत बांध्याची, अस्पष्ट मिशा असलेली श्वेतवर्ण मूर्ती माझ्या दृष्टीस पडली. त्या आकृतीच्या खांद्यावर पिशवी होती, व तिच्यातून लहानशी सुताराची करवत डोकावत होती. मी त्या मूर्तीला शंकर समजून आदरपूर्वक नमस्कार केला व मागे फिरलो.

एकदा सकाळी सुमारे साडेचार पाच वाजता, अंधारात मी सडकेवर शौचासाठी निघालो व तेथून थोडे खाली जाता मला कोणीतरी उचलून एका उंचवट्यावर ठेवले. पुष्कळ वेळ माझ्या कानात आवाज आला, 'नाशकला जा, नाशकला जा.' पण मी त्याचा काही अर्थ समजलो नाही. बाबांचे स्थान शिरडी शिवाय मी दुसऱ्या ठिकाणची यात्रा

करत नसे. मला उचलून ठेवले त्या तेथे आजूबाजूला पहाता एक घडियाळ असलेले टॉवर असल्याचा भास झाला. त्यावरून मला वाटते की बाबांनी मला आपल्या सामर्थ्याने उचलून नाशिकला आणले आहे. उंचवट्याजवळ एक चांगली जागा बघून शौचाला बसलो. नंतर काही वेळ विचार करीत बसून राहिलो. उजाडले तेव्हा तेथे न टॉवर न नाशिक दिसले — पण मी मात्र बाबा ज्या जागी शौचाला बसत तिच्या बरोबर समोरच्या टेकाडावरच होतो. माझ्या विस्मयास पार राहिला नाही. मला उचलून घेण्यात बाबांचा काय हेतू होता? हा विचार येताच मी उठून उभा राहिलो व तडक सडकेवर जाण्यास निघालो तसे मला दिसले की सडकेच्या बाजूस जेथून मला बाबांनी उचलले ती जागा खाचखळग्याची होती व तिच्यातून थोडे पाणी वहात होते. मला उचलण्यात आले नसते तर मी खाचखळग्यात पडून माझा पाय मोडला असता व मला चांगलेच लागले असते. 'नाशक'ला पोचविले असा भास झाला त्याचा अर्थ हे ता. २०.६.५९ रोजी लिहिताना समजते कीं अशा रीतीने मला खाचखळग्यात तसेच पाण्यात पडण्यापासून वाचवून मला बाबांनी जाणीव करून दिली की माझ्यावर त्यांची संपूर्ण कृपा आहे — ही गोष्ट ना-शक म्हणजे निर्विवाद आहे; अथवा असे पण म्हणता येईल की या प्रसंगाने सगुण ईश्वराच्या अस्तित्वाची तसेच त्याच्या भक्तांना संभाळण्याच्या ब्रिदाची वार्ता सत्य आहे व त्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. जवळजवळ ४२ वर्षांनंतर बाबांनी मला उचलून ना-शकला पोचविण्याच्या रहस्याचा उलगडा केला; धन्य आहे त्या बाबांची.

शिरडीला गेल्यानंतर एका रात्री मी काकासाहेबांच्या वाड्याच्या माडीवर ज्या खोलीत मधे मधे झरोके आहेत तेथील तसबीरीकडे डोके ठेवून जिन्याजवळच्या दारासमोर निजलो होतो. मी जागा असताना मला भास झाला की माझा जीव बाहेर पडून समोरच्या भिंतीजवळ आहे असे मी प्रत्यक्ष पाहिले. त्यावरून मी समजलो की मी तर आता मेलो, वामनरावाचा अंत झाला; मी आता कोणीतरी दुसरा आहे. दुसऱ्या दिवशी उठलो तेव्हा सुद्धा हाच विचार मनात होता की मी मेलो असून मी कोणी नवी व्यक्ति आहे. ह्या विचाराचा पगडा माझ्या मनावर एवढा बसला की कोणीतरी दुपारी मला विचारले, "वामनराव, तुम्ही काम करत आहा? सांगत का नाही?" तेव्हा मी त्याला उत्तर दिले, "वामनराव तर मेला, केव्हाच मेला. आता वामनराव आहे कुठे?"

अशा रीतीने जीव सुटा करून दाखविण्यात बाबांचा काय हेतू असावा? काय, असे त्यांना सांगावयाचे होते की जीव जातो येतो पण मी तर साक्षी आहे व जीव निघून गेलेला पाहतो; आणि मी तर आहे. जीवाला अशा रीतीने जाताना येताना पाहणारा जो मी ते माझे वास्तविक साक्षी स्वरुप, सच्चिदानंद स्वरुप- जे कायम आहे आणि जे सर्व व्यापार साक्षीवत् पाहते, ते हेच सच्चिदानंद स्वरुप ईश्वराचे स्वतःचे पण आहे; माझे अल्पज्ञपण परिछिन्न रूप मूळजीव पण निघून जाता जे स्वरुप राहते ते सच्चिदानंद स्वरुप आहे. आणि ते ईश्वराची सर्वज्ञता, व्यापकता ईशादि गुण शुद्ध मायेला ओळखून बाजूला ठेवता जे त्याचे शुद्ध स्वरुप आहे, ते हेच स्वरुप, सच्चिदानंद स्वरुप आहे.

# दुःखद प्रसंग आणि बाबांनी मला काय शिकविले?

— श्री. मु.ब. निंबाळकर
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट,
बंड गार्डन रोड, पुणे ४११ ००१.

*जीव जरी खरा स्वतंत्र। सुखालागीं कष्टता अहोरात्र।*
*पदरीं पडतें दुःख मात्र। हे तों चरित्र सत्तेचें॥ २४॥*
*दुःखे टाळावयालागीं। असता सावधान जागोजागीं।*
*तीं त्या धुंडीत लागवेगीं। त्याचीच मागी घेतात॥ २५॥*
*वारुं जातां गळां पडती। झाडूनि टाकितां अधिक लिपडती।*
*वाउगी जीवाची धडपडती ती। अहोराती तो शीण॥ २६॥*

-अध्याय १३

सन १९७१ ची गोष्ट. मी नुकताच (३ वर्षांपूर्वी) सरकारी नोकरीतून निवृत्त झालो होतो. माझी अर्धी पेन्शन मी अंशराशी केली होती व मिळालेले पैसे चांगल्या नामांकित कंपनीत दीर्घ मुदतीच्या ठेवीत गुंतविले होते. हेतू हा की, २-३ वर्षात राहाण्यासाठी एखादी चांगली वास्तू बांधावी किंवा विकत घ्यावी. इतकी वर्षे ५ मुलामुलींच्या शिक्षणाच्या आणि एका मुलीच्या लग्नाच्या खर्चामुळे व लष्करातील सतत दूरदूर बदल्यांमुळे या गोष्टीकडे आधी लक्ष घातले गेले नव्हते. १९७१ च्या ऑक्टोबर महिन्यात जागा किंवा वास्तू पाहण्यासाठी मी पुण्यास आलो व बंड गार्डन रोड वरील ३ बेडरुमचा एक फ्लॅट विकत घेण्याचे नक्की केले. मुंबईस परत आलो व त्यासाठी कंपन्यांकडे माझे पैसे परत मागण्यासाठी गेलो आणि मला धक्काच बसला. जवळजवळ सर्वच कंपन्यांनी हात झाडले.

बुडालेली रक्कम चाळीस हजारांचेवर होती. आता कुठला फ्लॅट आणि कुठली वास्तू? मी खूपच निराश झालो. खरे म्हणजे हे ऐकून मला हृदयविकाराचा तीव्र झटकाच यावयाला पाहिजे होता. आयुष्यातील सर्व कमाई गेली होती. अर्ध्या पेन्शनवर पुढील आयुष्य कंठावयाचे होते. त्यातून ४ वर्षांपूर्वीच मी हृदयविकाराच्या आजारामुळे मुंबईत सैनिकी रुग्णालयात १॥ महिना राहून आलो होतो. असो!

परंतु श्रीसाईबाबांची नुकतीच भक्ती मी सुरू केली होती. त्यामुळे मी मुळीच विचलीत झालो नाही. श्रीसाईबाबांवर सर्व भार टाकला, आणि पुण्याच्या फ्लॅटसाठी दुसरीकडे पैसे मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. आश्चर्य म्हणजे काही कंपन्यांकडून खटपट केल्यावर दहा हजारापर्यंत रक्कम परत मिळाली. माझा एक लहानसा फ्लॅट मुंबईत होता तो विकताना कल्पना नसतांना त्यावर पंधरा हजार जास्त मिळाले. आणि अशा प्रकारे पुण्याचा फ्लॅट ताब्यात घेण्यादिवशी नेमकी जरुर तेवढीच रक्कम गोळा झाली.१००—१५० जास्तही नाही की कमीही नाही.

नंतर कंपन्यांकडून राहिलेले तीस हजार रुपये परत मिळविण्याचा प्रयत्न मी सुरू केला. आता कंपन्या नेहमीचे व्याज देण्यासही असमर्थ झाल्या होत्या. देणेदाऱ्यांच्या

भीतीने त्यांनी आपले पत्तेही बदलले होते — मुंबई शहरा बाहेर उपनगरात निघून गेले होते संपर्क साधता साधता नाकी नऊ आले. मग श्रीसाईच्चरित्रातील ३६ व्या अध्यायातील एका फकीराने त्या गोमंतकातील गृहस्थाला त्याचे तीस हजार रुपये परत मिळविण्याकरिता आवडीचा पदार्थ सोडण्याचा सांगितलेला उपाय मला आठवला व मी माझा आवडीचा पदार्थ 'गुलाबजाम' सोडला. नीट पाळला की नाही ते आठवत नाही पण बाबांनी कृपा मात्र केली. हो! कृपाच म्हणावी लागेल कारण ८—१० वर्षानंतरही या नामांकित कंपन्या कोणाचेच पैसे किंवा व्याजही देऊ शकत नव्हत्या. त्यांचे दिवाळेच वाजले होते. कोर्ट कचेऱ्यांचाही उपयोग होत नव्हता. परंतु मला मात्र एकाएकी सहजपणे पैसे परत मिळू लागले. एका कंपनीतील लेखपालाने तर आपण होऊनच मॅनेजिंग डायरेक्टरांना माझेबद्दल सांगून कंपनी कडून रु. ५००चा दरमहा हप्ता लावून दिला. अशाप्रकारे १९८१ सालापर्यंत (म्हणजे एकूण १० वर्षांनी) माझी सर्वच्या सर्व मुद्दल रक्कम (रु ३०००० ) व्याजाशिवाय का होईना परत मिळाली. बाबांच्या ईच्छेशिवाय हे कधीतरी शक्य होते का?

आता माझा दुसरा अनुभव पहा. माझा तिसरा मुलगा सैन्यात आहे. सन १९८१ साली तो मेजर हुद्यावर होता. नुकताच निलगिरी (वेलिंग्डन) येथील स्टाफ कॉलेजमधून पी.एस.सी. पदवी घेऊन आला होता व नसिराबाद (राजस्थानात अजमेरजवळ) ब्रिगेड हेडक्वार्टर्स मध्ये महत्त्वाच्या पदावर होता. अचानक एके दिवशी पुण्यास आम्हाला बातमी आली की, त्याला हृदयविकारामुळे सैनिकी रुग्णालयात दाखल केलेले आहे. खरे म्हणजे त्या गोष्टीला १५—२० दिवस होऊन गेले होते पण आम्ही घाबरुन जाऊ म्हणून त्याने आम्हाला कळविले नव्हते व स्वतःच्या पत्नीलाही तशी ताकीद दिली होती. त्या तरुण पोरीने ते पंधरावीस दिवस एकटीने कसे घालविले असतील बाबाच जाणे! पण ही एक आमच्या सैनिकी जीवनाची चुणूक — आमच्या स्त्रियांचेही धैर्यबळ असे तयार होते. असो!

आम्ही तर अर्थात घाबरुन गेलो व लगेच तिकडे जाऊन त्याला वैद्यकिय सुट्टी मिळाल्यावर पुण्यास घेऊन आलो. सविस्तर गोष्टी झाल्यावर कळले की, तो राजस्थानातील जैसलमर जवळ पाकीस्तान सरहद्दीवर कामासाठी गेला होता. तेथून परत येताना रात्री आगगाडीत छातीत कळा येऊ लागल्याने दुसरे दिवशी सकाळी सैनिकी रुग्णालयात गेला होता. तपासणीत हृदयविकार तर निदर्शनाला आलाच परंतु त्याबरोबर मधुमेहही आढळला. वयाच्या ३४ व्यावर्षी असल्या रोगांबद्दल ऐकूनच मनाला धक्का बसतो. सैन्यात दरवर्षी वैद्यकीय चाचणी होत असते व त्याच्यात त्यांना कधी यत्किंचितही दोष आढळला नव्हता. तसेच हा माझा मुलगा माझ्या सर्व मुलात जास्त सशक्त व बॉक्सिंग, क्रिकेट, हॉकी सारख्या मर्दानी खेळात प्रावीण्य मिळविलेला. दुर्दैव तर खरेच !

पण आश्चर्य म्हणजे या सर्व घटनांच्यावेळी माझे मन मुळीच बावरले नाही. बाबांच्या कल्याणकर्तृत्वाविषयी श्रद्धा होतीच. त्यांनी सुरवातीलाच सर्व भीती नष्ट झाल्यावरच आम्हाला बातमी कळविण्याची व्यवस्था केली. आता पुढील प्रकृतीची काळजी वाटत होती. पण त्यासाठी औषधे व इतर उपचार सुरू केले होते. दुःख होते ते दुसऱ्याच गोष्टीचे. हा माझा मुलगा त्याचे करीअरचे ऐन शिखरावर होता. आता त्याचे लेफ्टनंट

कर्नलच्या प्रमोशनचे बोर्ड बसणार होते व त्यात निवडून येण्याची १०० टक्के शक्यता होती. सैन्य दलात लेफ्टनंट कर्नलपासून सिलेक्शन ग्रेड असते व पुढच्या प्रगतीची ही फार महत्वाची पायरी असते. मात्र गुणवत्तेमुळे निवड झाली तरी वैद्यकीय चाचणीत पास झाल्याशिवाय सैन्याचे प्रमोशन मिळत नाही. म्हणजे या मुलाचे पुढचे प्रमोशन कायमचे बंद. फक्त १४ वर्षांच्या नोकरीनंतर पुढची सर्व नोकरी याच हुद्यावर घालवायची अणि तीही गुणवत्ता असून. केवढी अपमानास्पद परिस्थिती? अर्थात माझ्या मुलाच्या तरुण मनाला हा केवढा मोठा धक्का होता आणि त्यानेच आपल्या मनाचा तोल सावरण्याचा प्रश्न होता.

पण यातही बाबांनी मला साह्य केले. माझ्या मुलांचीच अचानकपणे भक्ती त्यांनी स्वतःकडे ओढून घेतली. मी न सांगताच आपण स्वतः होऊनच तो शिरडीस जाऊन आला. बाबांच्या फोटोजवळ नियमितपणे उदबत्ती व अंगाला ऊदी लावू लागला. औषधे, योग वगैरे करुन, जिद्दीने वजन कमी करून, सिगरेट, मद्य व साखर अजिबात सोडून त्याने आधी मधुमेहावर कब्जा मिळविला. (डॉक्टरांनी तसे सर्टिफिकेटही दिले) व हृदयविकार वाढू न देता सैन्यातील सर्व दगदगीची व श्रमाची कामे करण्याचे सामर्थ्य मिळविले. मी किंवा त्यानेही प्रमोशन मिळावे म्हणून बाबांकडे कधी नवसही केला नाही. हळूहळू आपल्या नोकरीतील भविष्य त्याने मान्य करून त्याप्रमाणे मनाची तयारी केली. मी व माझ्या पत्नीनेही बाबांनी जे काय केले ते त्याच्या हिताकरताच केले असे मानून घेतले. बाबांनी आमचा मुलगा तर सुखरुप ठेवला होता ना?

पण बाबा भक्तांचे पूर्णपणे कल्याण न करतील तर ते बाबा कसले? गेल्याच वर्षी (१९८५ मध्ये) मुलाच्या लेफ्टनंट कर्नलच्या बोर्डचा रिझल्ट आला आणि त्याला बोर्डाने पास केले. नंतर वैद्यकीय बोर्ड झाले. हृदयविकाराच्या बाबतीत अजून अंशात्मक दोष असल्याने (तो बहुतेक कायमचाच राहतो) त्यांना त्याला पूर्णपणे वैद्यकीय दृष्टीने निर्दोष ठरविता आले नाही, तरी अपवाद म्हणून त्यांनी त्याच्या प्रमोशनला परवानगी दिली आणि आम्ही गेल्या सप्टेंबरमध्ये त्याचेकडे (मध्यप्रदेशात इंदोरजवळ) महू येथील छावणीच्या ठिकाणी असतानाच त्याने खांद्यावर लेफ्टनंट कर्नलची मानचिन्हे चढवली. केवढी बाबांची कृपा ! 'अचिंत्यदानी गुरुमाय' म्हणतात ते उगीच नाही.

अशी कितीतरी उदाहरणे मला देता येतील. पण ही दोनच प्रतीक म्हणून पुरे. बाबांची भक्ती धरल्याने माझी वरील दुःखे दूर झालीच पण त्या प्रसंगांतून नेऊन बाबांनी मला जी शिकवण दिली तीच फार मोलाची आहे. बाबांचे खालील वचन मी आत्मसात करायला शिकलो.

*"इष्टानिष्ट सुखदुःख । संचितानुसार अमृत वा विख ।*
*हे प्रवाहपतित द्वंद देख । धरी न हरिख वा शोक ॥ ६९ ॥*
*जें जें येईल तें तें साहे । अल्ला मालीक वाली आहे ।*
*सदा तयाच्या चिंतनी राहे । काळजी वाहे तो सारी" ॥ ७० ॥*

—अध्याय ३४

या प्रसंगाचे वेळी माझ्या मनाची शांती फारशी ढळली नाही, व बाबांचे "श्रद्धा व सबूरी" हे दोन शब्द सतत मनात ठसत गेले. हळूहळू त्यांच्या कृपेने माझी प्रगती इतकी होत गेली की नुकतेच परवा एकाच दिवशी आमचेकडे लागोपाठ बाथरुमचे दोन नळ निरुपयोगी झाले, विजेचा बल्ब गेला आणि संध्याकाळी टी.व्ही. देखील बंद पडला. महिन्याचा शेवट व हा विनाकारण खर्च आणि तोही भरमसाठ. (आमच्या फ्लॅटच्या एका नळाला ६०-६५ रुपये पडतात आणि रंगीत टी.व्ही.च्या दुरुस्तीच्या खर्चाला तर मर्यादाच नसते). असे काही घडले की सहज संताप येतो. नेमके आपल्याच बाबतीत आणि याचवेळी अशी अडचण का यावी असे वाटते. परंतु माझे मन जरासुद्धा खवळले नाही. झाले त्याला इलाज नाही असे मानून कोणावरही न रागवता न चिडता निरसनाचा उपाय मी शोधू लागलो. मनात म्हणालो, "बाबा या समस्या उत्पन्न करणारे तुम्हीच आहात, समस्याही तुम्हीच आहात आणि त्या सोडविणारेही तुम्हीच आहात." आणि खरोखरीच माझ्या प्रयत्नांना यश येऊन या तीनही समस्या ३-४ दिवसात फारशी दगदग व फारसा पैशाचा व्यय न होता सुटल्या. केवढी ही कमाई!!

वरील अनुभवांवरुन दुःखद प्रसंगांबद्दल व समस्यांबद्दल माझी विचारसरणी आणि कार्यवाही तयार झाली ती अशीः-

(१) या जगात दिसणाऱ्या सर्व वस्तू व व्यक्ती नाशवंत आहेत. कधीतरी त्या तुटणार, फुटणार, जळणार किंवा मृत्यू पावणार हे निश्चित. काही लवकर काही उशीरा. तेव्हा सरासरीच्या न्यायाने तो प्रसंग आपल्या प्रिय वस्तूवर किंवा व्यक्तीवर येणे शक्य आहे.

(२) म्हणून असल्या प्रसंगाला तोंड देण्याची मनाची तयारी नेहमीच ठेवली पाहिजे आणि तो प्रसंग आल्यावर दैवाला किंवा देवाला दोष देऊन किंवा माझ्याच बाबतीत आणि आत्ताच हे का घडले असे म्हणून रडत न बसता व मनाचे स्थैर्य न गमावता, शांतपणे पुढची कारवाई करण्याकडे लक्ष लावले पाहिजे.

(३) नरजन्म महा पुण्याईने मिळतो म्हणतात. तेव्हा आयुष्यात एखादी अप्रिय गोष्ट घडली म्हणून त्याच्याच शोकाने पुढचे सर्व आयुष्य बरबाद करणे मूर्खपणाचे आहे. लक्षात ठेवा की आयुष्याची आपल्या मनाप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे घडी पुन्हा नीट बसविता येते . ईश्वराने प्रत्येक जीवाला तसे मानसिक बळ दिलेले असते. फक्त त्याने त्याचा उपयोग करुन घेतला पाहिजे.

(४) या सर्व गोष्टी बोलण्याइतक्या सोप्या नाहीत. त्यासाठी माणसाला श्री साईबाबांसारख्या श्रेष्ठ संताची किंवा दैवी शक्तीचा आधार लागतो. त्यांचेकडून या जगात जे घडविले जाते ते आपल्या सर्वांच्या अंतिम कल्याणाकरिताच असते अशी भावना असली म्हणजे आपल्यावर आलेला दुःखद प्रसंगही त्यांचाच प्रसाद म्हणून मानण्याची तयारी होते. मग पुढील मार्ग दाखविण्याचा भार आपण त्यांचे खांद्यावर टाकून निर्धास्त होतो. आणखी आपली 'सबूरी' असली आणि त्यांची कृपा झाली तर कदाचित या वाईटातून चांगलेच उद्‌भवल्याची आपणाला प्रचिती येते.

*सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः सर्वे भद्रं पश्यन्तु न कश्चिद् दुःखमवाप्नुयात् ॥*

ओम् शांतिः शांतिः शांतिः

# श्री साईबाबांच्या हयातीत माझ्या वडिलांना आलेले अनुभव

— सौ. शोभना अनंत पालकर
१०६, पहिला मजला,
लोहार आळी, चेंदणी,
ठाणे - ४०० ६०१.

सन १९१४ पूर्वीची कदाचित १९०८-१९०९ ची गोष्ट असेल. माझे वडील चौदा किंवा पंधरा वर्षांचे असतील. माझी आत्या वडिलांच्या पेक्षा मोठी. तेव्हा त्यांच्या भावोजींच्या बरोबर माझ्या वडिलांना शिर्डीस जाण्याचा योग आला. वडील सांगत, "भावोजी नेहमी शिर्डीस जात. मी पण त्यांचेबरोबर एका गुरुपौर्णिमेस शिर्डीस गेलो. गुरुपौर्णिमेचा सोहळा अत्यंत पहाण्यासारखा झाला. गर्दी बरीच होती. २०० ते २५० लोक होते. आलेल्या भक्तांनी बाबांना वस्त्र व दक्षिणा दिली. मी नुकताच नोकरीला लागलो होतो. पगार रुपये १५/-. माझ्याकडे दक्षिणा देण्यास आठ आणे, अधेली होती. सर्वांच्या चांदीच्या रुपयांच्या दक्षिणा पाहून मला अधेलीची लाज वाटली. मी बाबांची पूजा केली. व बरोबर नेलेले, उपरणे बाबांच्या हातात दिले. बाबा म्हणाले, ते माझ्या अंगावर घाल. मी त्याप्रमाणे केले व दक्षिणा देण्यासाठी ओशाळून हात पुढे केला. परंतु बाबांनी लगेच अंगावरच्या उपरण्याखाली ताम्हण घेऊन त्यात दक्षिणा टाकण्यास सांगितले, तेव्हा बरेच रुपये ओतल्याचा आवाज आला. बाजूला उभ्या असलेल्या लोकांना वाटले की, मी मुठीने रुपयांचा बटवा आत रिकामा केला की काय? त्यानंतर बाबांनी इतर लोकांच्या पूजेच्या वेळी ते उपरणे व ताम्हण बाजूला केले नाही, ताम्हण तसेच झाकलेले ठेवले. त्यामुळे माझे उपरणे बाबांच्या अंगावरच राहिले. इतरांना प्रसादाचे वस्त्र मिळाले. मी ह्या इतर माणसांच्या इतकाच श्रीमंत आहे ह्याच आनंदात आमच्या वास्तव्याच्या जागेत आलो."

"पुन्हा संध्याकाळी आम्ही आरतीस जमलो. शामसुंदरला मला बोलवण्यास पाठवले. तो घोडा असूनही त्याने मला बरोबर ओळखून काढले व माझा शर्ट धरून ओढू लागला. बाजूच्या मंडळींनी मला सांगितले, 'जा तुला बाबा बोलवीत आहेत.' मी बाबांच्या इथे गेलो. बाबांनी मला माझे उपरणे पुन्हा देवू केले. मी म्हणालो, "देई दान परत घेई दान तो पुढचे जन्मी मुसलमान. मी ते तुम्हाला दिले आहे. मला ते परत नको." बाबा किंचित हसले आणि म्हणाले, "नाही रे बेटा, हा गुरुपौर्णिमेचा प्रसाद आहे तो तू घे." माझ्या बरोबरीच्या मंडळींनी पण मला ते घेण्यास सांगितले. व मी तो प्रसाद घेऊन आलो."

"परंतु बाबांच्या प्रसादाची प्रचिती पुढेच आली. १९१४ साली एन्फ्लुएन्झाची साथ आली. ती पहिलीच साथ असल्याने त्यावेळी ह्या रोगाला औषध नव्हते. ज्याला फ्लू झाला त्याला बोलावणे आले असेच समजत. शे पाचशे माणसे पटापट मेली. डॉक्टर्स काहीच करू शकत नव्हते. ते रुग्णांना देवावर भरोसा ठेवण्यास सांगत. त्याप्रमाणे मला

थंडी भरून ताप आला. अंग ठणकू लागले. काका, आई, बहिण, काकी सर्वजण चिंतातूर झाले. आई तर रडू लागली. डॉ. अभ्यंकरांनी लागत नसल्याचे सांगितले. जवळजवळ बाजार संपत आल्याचे सांगितले. मला गादीवरून घोंगडीवर काढण्यात आले. सर्व शरीर थंडगार पडले. होते. चेहरा काळानिळा झाला होता. सर्व आटोपल्यासारखेच होते. परंतु तेवढ्यात आईला उपरण्याची आठवण झाली. ती म्हणाली, 'त्याचाच प्रसाद आहे. जाऊ दे त्याच्याच बरोबर.' असे बोलून ते उपरणे माझ्या अंगावर घातले. आणि थोड्याच वेळात थोडी छाती हालू लागली. व श्वासोच्छवास सुरू झाला. तेव्हाच सिव्हिल सर्जन डॉ. बिलीमोरिया यांना एक नातेवाईक घेऊन आला. त्यांनी मला तपासले आणि औषध नसल्याने छाती शेकून काढण्यास सांगितले. वांगी आणून ती मध्ये कापून त्या फोडी तव्यावर गरम करावयाच्या आणि छाती शेकून काढण्यास डॉ. बिलीमोरिया यांनी सांगितले. त्याप्रमाणे केल्यावर मला परत उचलून बिछान्यावर घेतले. तोच मी आज माझ्या मुलांना माझ्या मरणाची गोष्ट, हकीकत सांगत आहे.'

अशी ही बाबांची कृपा आमच्या कुटुंबावर अजूनपर्यंत आहे. माझ्या वडिलांना मिळालेला आशीर्वाद त्यांच्या पतवंडांनासुद्धा आज मिळत आहे. श्री संत गजानन महाराज पट्टेकर, ठाणे हेदेखील आज आम्हाला बाबांच्या प्रमाणेच मार्गदर्शन करत आहेत.

# अन् हृदयाची हालचाल पुन्हा चालू झाली

**— श्री. सूर्यकांत गोपाळ चंचे**
मु.पो. नेरळ(पाडा), ता. कर्जत,
जि. रायगड.

माझ्या शेजारी माझी चुलत मावशी राहते. दिनांक १२ जानेवारी १९८६ च्या रात्री तिच्या पतीच्या छातीत दुखायला लागले म्हणून डॉ. अशोक कर्वे यांना बोलावण्यात आले. त्यांनी रक्तदाब वगैरे तपासून उपचार सुरू केले. डॉक्टरने मला सांगितले की, "ह्यांना सौम्य हृदयविकाराचा झटका आला आहे. म्हणून त्यांना जास्त बोलू देऊ नका, हालचाल करू देऊ नका." डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे मी त्यांच्या मोठ्या मुलास सूचना देऊन रात्री १२.०० वा. झोपायला घरी गेलो. दुसऱ्या दिवशी त्यांचा मोठा मुलगा सकाळी ६.३० वा. कामावर निघून गेला. त्यानंतर ८.०० वा. ते स्वतः व त्यांचा लहान मुलगा डॉ. कर्वे यांच्या दवाखान्यात गेले. तेथेच त्यांना पुन्हा जोरदार झटका आला

तेव्हा डॉक्टरने त्यांच्या मुलास मला बोलावण्यास पाठविले. त्याने धावतच येऊन मला तसे सांगितले. मी लगेच दवाखान्यात गेलो, तेव्हा ते बेशुद्धावस्थेत होते. डॉ. कर्वे यांनी मला डॉ. शितूत यांच्या दवाखान्यातून ऑक्सिजनचे सिलेंडर आणायला सांगितले. मी व त्यांचा मुलगा मिळून धावत पळत कसाबसा सिलेंडर घेऊन आलो. डॉ. शितूतही बरोबर आले. डॉक्टरांना सलाइन लावायला शिरही सापडत नव्हती. एकदाची पायाची शिर सापडली तेव्हा सलायन लावले. डॉ. कर्वे यांनी रुग्णाला कर्जत किंवा मुंबईला न्यायला सांगितले. लवकरात लवकर उपचार व्हावेत म्हणून भाड्याने टॅक्सी करून आम्ही रुग्णास घेऊन कर्जतला निघालो. आमच्या बरोबर डॉ. कर्वेही आले. मी गाडीत बसलो व श्रीसाईबाबांचा धावा सुरू केला. श्रीसाईंना साकडे घातले की, माझी तुमच्यावर श्रद्धा आहे तिला तडा जावू देऊ नका. माझे शब्द संपतात न संपतात तोच डॉक्टरांनी केस संपली म्हणून पुढे न जाता पुन्हा मागे फिरण्याकरिता ड्रायव्हरला गाडी उभी करायला सांगितले. गाडी खूप वेगात होती व ड्रायव्हरने ब्रेक लावल्यामुळे एक जोरदार धक्का सर्वांना बसला तोच त्यांचे हृदय पुन्हा चालू झाले व ते अर्धेअधिक उठून बसले. त्यांना (रुग्णाला) व्यवस्थित करून आम्ही कर्जतकडे निघालो. कर्जतला सरकारी दवाखान्यात डॉ. साबणे यांनी त्यांचा कार्डीओग्राम काढला. डॉ. साबणे यांनी डॉ. कर्वे यांना रुग्ण जास्तीत जास्त ६ तास जगेल, त्यापेक्षा अधिक जगूच शकणार नाही, असे ठामपणे सांगितले. परंतु माझें मन काही हे ऐकायला तयार नव्हते. मी सर्व भार श्रीसाईवर सोपवला व माझ्याजवळ असलेली उदी मी मावशीकडे देऊन त्यांना कपाळाला लावून पाण्याबरोबर प्यायला देण्यास सांगितले. मी त्यांचा दुसरा सख्खा भाचा व मावशी यांस विचारून संध्याकाळी ४.०० वाजल्यानंतर (म्हणजे ६ तासांनंतर) त्यांना मुंबईला न्यायचा बेत केला. त्याकरिता टॅक्सीची सोय करण्यास मी त्यांच्या दोन नंबरच्या मुलास सांगितले. दरम्यान ते शुद्धीवर आले होते. डॉक्टरांनी तर स्पष्ट सांगितले होते की, रुग्णाच्या हृदयाचे दोन्ही भाग एकमेकांशी सहकार्य न करता वेगवेगळे काम करीत आहेत. अशा परिस्थितीत व त्यांचा मोठा मुलगा हजर नसताना श्रीसाईबाबांवर सर्व भार सोपवून मी त्यांना मुंबईला नेण्याचा निर्णय घेतला होता.

संध्याकाळी ४.३० वा. आम्ही टॅक्सीने रुग्णाला घेऊन मुंबईला निघालो. बरोबर मावशी व इतर चार जण होते. रुग्णाला सलायन लावलेल्या स्थितीतच घेऊन आम्ही ६.०० वाजता के.इ.एम्. रुग्णालयात पोहोचलो, तेथेही डॉक्टरांनी लगेच उपचार सुरू केले व श्रीसाईंच्या आशीर्वादाने त्यांच्या उपचारांना यश येऊन दिवसेंदिवस त्यांची प्रकृती सुधारत गेली. ते दि. २५ जानेवारी ८६ रोजी बरे होऊन घरी आले. आता त्यांची तब्येत ठीक आहे. ते कपडे शिवण्याचे कामही थोड्या प्रमाणात करू लागले आहेत.

सहातासांपर्यंत जगण्याची मुदत असलेली व्यक्ती आज साडे सहा महिने व्यवस्थित असून आपले पूर्वीचे कामही करू लागली आहे. हे कशामुळे शक्य झाले? श्रीसाईनाथांच्या कृपेमुळेच ना? श्रीसाईनाथ भक्तांना दिलेल्या वचनाप्रमाणे आजही त्यांच्या हाकेला धावतात, याचे हे जिवंत उदाहरणच नाही का?

लागला. पुढे तर काम करणे अशक्य झाले व झोपून तळमळत रहायची वेळ आली. वेदना वाढत चालल्या. बरेच दिवस अनेक उपचार करूनही पाठदुखी थांबेना त्यामुळे त्यांच्या मनात निराशा व काळजी उत्पन्न झाली. मात्र त्यांनी श्रीबाबांचा "बाबा बाबा" असा जप सतत चालू ठेवला होता व पुढेही अखेरपर्यंत चालू होताच.

श्रीबाबांनी धावा ऐकला आणि त्यांना स्वप्नामध्ये दृष्टांत दिला. श्रीबाबांनी त्यांचेकडून शिधा मागितला. सकाळी जागे झाल्यावर सासऱ्यांना स्वप्न आठवले. ते त्यांनी कै. सासूबाईना सांगितले. तेव्हां, श्रीबाबांच्या आज्ञेनुसार श्रीबाबांना शिधा देण्याचे ठरले. पण सासऱ्यांना उठता येत नव्हते. तसेच श्रीबाबांची तसबीर अजून घेतली नव्हती. त्यामुळे शिधा कसा व कोठे अर्पण करावा हा प्रश्न पडला.

तथापि योगायोगाने जवळच एक श्री साईभक्त रहात होते. तेव्हां त्यांचेकडे जाऊन श्रीबाबांचे तसबीरीस शिधा अर्पण करावा असे ठरविले. त्याप्रमाणे सासूबाईंनी शिधा तयार केला. सासऱ्यांनी श्रीबाबांच्या नामाचा उच्चार करीत करीत व सासूबाईंच्या मदतीने कसेबसे आटोपले. पुढे दोघे शिधा घेऊन हळूहळू बाहेर पडले. पुढे आणखी एक प्रश्न होता. ज्या घरी श्रीबाबांना शिधा अर्पण करायचा होता ते घर माडीवर होते. त्यामुळे दोघांचाही मनाला या कार्याबद्दल खात्री वाटेना व काळजी वाटू लागली. तथापि "श्रीबाबांचे आज्ञापालन" हा एकच ध्यास त्यांच्या मनात होता. त्यामुळे श्रीबाबांच्या नामाचा उच्चार करीत ते चालत राहिले व जिना चढून त्या घरी गेले. श्रीबाबांना योग्य तऱ्हेने शिधा अर्पण केला. जसे हे कार्य पूर्ण झाले तसे दोघांच्याही मनास समाधान वाटले व धीर आला.

आता पुन्हा घरी जाऊन अंथरुणावर झोपून रहावे लागणार असा विचार करीत, परंतु श्रीबाबांच्या नामाचा उच्चार करीत सासरे व सासूबाई परत येऊ लागले. जसजसे सासरे जिना उतरले तसतसा त्यांचा त्रासही कमी होत गेला, व घरापर्यंतचा रस्ता नकळत पार पडला. पुढे त्या पवित्र दिवसापासून सासऱ्यांना बरे वाटू लागले व पाठदुखी औषधपाण्याविना समूळ नष्ट झाली ती कायमचीच. हे केवळ श्रीबाबांच्या कृपेचे सामर्थ्य. पुढे सासऱ्यांनी सोनारकामासही सुरुवात केली. अशा तऱ्हेने श्रीबाबांनी एक कुटुंब वाचविले व सांभाळले. सासू-सासरे उपकृत झाले, कृतज्ञ झाले. या कृतज्ञतेची जाणीव त्यांनी भक्तिच्या रूपाने ठेवली. श्रीबाबांच्या उपकारांची फेड करण्याचा अन्य मार्ग तो कोणता !

पुढे सासऱ्यांनी श्रीबाबांचा फोटो आणून फ्रेम करून घेतला. श्रीसाईसच्चरित आणले. त्याचे मनोभावे वाचन, पारायणे, सप्ताह वगैरे केले. श्रीबाबांच्या पूजेसाठी एक मोठा चौरंग करून घेतला. त्यावर श्रीबाबांसाठी आकर्षक बैठक करून घेतली. श्रीबाबांना मोत्यांची चौपदरी माळ करून घातली. समया लावल्या. ~~[illegible] वगैरे लावले अभिषेक~~ आरत्या, भजने वगैरे सुरु केले.

पुढे ५-७ वर्षांनी मी सासऱ्यांना त्यांच्या व्यवसायासाठी व कायमचे वास्तव्य करण्यासाठी कोल्हापूर येथे बोलावून घेतले. कारण त्यांना तिथे सांभाळण्यासाठी निकटची पुरुषव्यक्ति कोणीच नव्हती. सासरे व सासूबाई आमच्या घरी आल्यामुळे एक महत्त्वाची गोष्ट घडून आली ती म्हणजे, त्यांनी श्रीबाबांची तसबीर वगैरे सर्व इकडे आणले व आमच्या घरी श्रीबाबांचे स्वतंत्र देवघर झाले. इकडेही पूजा, अभिषेक, आरत्या, भजने वगैरे सुरू झाले. आणि तेथून पुढे आमच्या कुटुंबावरील संकटांची छाया दूर झाली. ही गोष्ट आता आमच्या लक्षात येऊ लागली आहे. परंतु सासऱ्यांच्या निधनानंतर भक्तिचे प्रमाण कमी झाले. नंतर सासूबाईही निधन पावल्या. मात्र त्यांनी त्यांच्या उत्तरक्रियेच्यावेळी, आमचेकडून भक्ति योग्य तऱ्हेने होत नाही हे निदर्शनास आणले आणि पुन्हा हळू हळू सर्व गोष्टींना सुरुवात झाली आहे.

या सर्व गोष्टीवरून आमच्या लक्षात आले कीं, "आमच्या रक्षणासाठी श्रीबाबा १०० मैल अंतरावरून आमच्याकडे आले." आणि त्यामुळे आम्ही सर्वजण श्रीसाईभक्त झालो !"

# श्री साईमाऊली सदाकृपेची साऊली

**सौ. सुंदर कृष्ण धेडे**
११३६ ब्राम्हणशाही वाई जि. सातारा ४१२ ८०३

भाद्रपद महीना होता. गौरी गणपतिचे दिवस होते. सर्वत्र गणेशोत्सव साजरा होत होता. त्याच दिवसात चोरांचे प्रस्थ फार माजले होते. चोरीच्या अनेक बातम्या रोज कानावर येत होत्या. आमच्याकडे मात्र चोरीचा कधीच अनुभव नव्हता. परंतु त्या गणेशोत्सवाच्या दिवशी आमच्याकडे अचानक चोर आला. रात्री आम्ही सर्वजण झोपलो होतो. माझी मोठी मुलगी एकदम जागी झाली. कसला तरी आवाज येत होता. तिने मला जागे केले. मी उठून दिवा लावला. व आतल्या खोलीत गेले तर दाराची कडी काढलेली होती. माझ्या चाहुलीने चोर बाहेरच थांबला. पण मी जरा धीटपणे दार उघडले तर चोर बाहेरच उभा होता. मला पाहून पुढे तो पळून गेला. त्याने आमच्या खिडकीचे दोन गज काढले होते. पण तेथून आत येत नसल्याने त्याच गजाने दाराची कडी काढली होती. श्री साईबाबांच्या कृपेमुळेच चोर आत येऊ शकला नाही. अशारीतीने त्या प्रेमळ साईमाऊलीनेच आमचे रक्षण केले.

त्या दिवशी चोरी झाली नाही पण २ नच दिवसानंतर माझ्या नातवाचे सर्व दागिने चोरीला गेले. नातवाचे सर्व सोन्याचे दागिने ठेवलेला डबा चोरीला गेला

आम्ही सर्वजण घाबरलो. काही सुचेनासे झाले. शेवटी आम्ही सर्वांनी श्री साईबाबांची करूणा भाकली. आमचे दागिने आम्हाला परत मिळू दया अशी प्रार्थना करीत होतो, व खरच बाबांनी हाक ऐकली. ज्या दिवशी आम्ही कळवळून प्रार्थना केली त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ज्या व्यक्तीने दागिने नेले होते ती नेमकी दारात हजर झाली. शेवटी ती व्यक्ती घरी आल्याबरोबर तिने कबूल केले.. तिने त्या वस्तू मोडल्या होत्या. पण तिने त्या दागिन्यांसारखेच दागिने व नुकसानभरपाई दिली. महत्वाची गोष्ट म्हणजे झालेली चोरी कबूल करणे व आमच्या वस्तू आम्हाला वेगळया रूपाने का होईना परत मिळाल्या ही सर्व बाबांचीच कृपा होय.

त्याचप्रमाणे माझी मुलगी चि. सुवर्णा हिच्या पायाला व हाताला दरवर्षी थंडीत खूप भेगा पडतात. खूप औषधे घेऊन काही उपयोग झाला नाही. तिने श्री साईबाबांची उदी पाण्यातून घ्यायला सुरुवात केली. आणि खरोखरच तिच्या हातापायाच्या भेगा जाऊन हातपाय चांगले झाले. या थंडीत तिला कसलाच त्रास झाला नाही. अशी ही बाबांची उदी म्हणजे अमृत ठरली आहे.

अशा भक्तवत्सल साईमाऊलीला माझे कोटी कोटी प्रणाम ।

**नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।।**
**नित्य हया प्रचित अनुभवे ।।**

अशीच श्री बाबांची प्रेमळ कृपादृष्टी आम्हा सर्वांवर व सर्व साईभक्तांवर बरसत राहो अशी साईचरणी प्रार्थना.

# बाबांनी बहिणीचे लग्न जमविले

**श्री गणपत निळकंठ सावंत,**
बी. कॉम. एल.एल.बी. सी.ए.आय.आय.बी.
बी – २४, को. ओ. हॉ. सो.,
नवघर रोड, मुलुंड (पूर्व)
मुंबई - ४०० ०८१.

मी साईबाबांचा एक सामान्य भक्त आहे, मी गेली दहा वर्षे बाबांची मनोमन प्रार्थना करतो व बाबांची उदी लावल्याशिवाय घराच्या बाहेर कोणत्याही कामासाठी जात नाही. प्रत्येक संकटाच्या वेळी बाबांची मी मनोमन प्रार्थना करून संकट निवारण्यासाठी याचना करतो. बाबांनी मला आता पर्यंत सर्व संकटातून मार्ग दाखविला आहे व चांगल्या सुस्थितीत ठेवला आहे.

माझी पूर्ण खात्री आहे की बाबांची मनोमन प्रार्थना केली तर इच्छीत पूर्ण होते. त्यांना कोणत्याही सोपस्काराची गरज नाही. मी साईचरित्र वाचतो.

मी माझा एक अनुभव सांगणार आहे, तो माझ्या बहिणीच्या लग्नाबद्दल माझी धाकटी बहिण ही माझ्या पेक्षा आठ वर्षांनी लहान आहे तिला मी मुलीप्रमाणे वाढविलेले आहे व तिला नोकरी सुद्धा बाबांच्याच कृपेने मिळाली अशी माझी धारणा आहे. तिचे लग्न दोन वर्षे प्रयत्न करून जमत नव्हते. मी बाबांना म्हटले की मी साईचरित्राचे वाचन सुरू करतो व साईचरित्रांचे वाचन संपविण्याच्या आत माझ्या बहिणीचे लग्न जमवून द्या. त्या प्रमाणे मी संपूर्ण ग्रंथ एकदा वाचला पण काही अनुभव आला नाही. शेवटी मी मनाची समजूत केली की माझ्या कडून पूर्ण श्रद्धेने वाचन झालेले नसावे, म्हणून मी डोळयांत पाणी आणून बाबांना सांगितले की पुनः वाचन सुरू करतो या वेळेस ग्रंथ पूर्ण होण्यापूर्वी लग्न जमले पाहिजे व आश्चर्याची गोष्ट म्हणजे काही दिवसात आम्ही लग्न जमविण्याच्या उद्देशाने एका वर संशोधनास जात असतानाच माझा मोठ भाऊ निरोप घेऊन आला की एक नातेवाईकांनी एक स्थळ सुचविलेले आहे. आम्ही परत माघारी येवून मोठ्या भावाने सांगितलेल्या स्थळासाठी प्रयत्न केले व बाबांच्या कृपेने महीन्या भरांत लग्न जमवून हॉल मिळवून लग्न अल्पावधित निर्विघ्नपणे पार पाडले व आता बाबांच्या कृपेने माझी बहीण सुखात आहे.

माझ्या तीस वर्षाच्या सबंध आयुष्यात मला खूप कौटूंबिक संकटांना तोंड द्यावे लागले परन्तु श्री साईबाबांनी मला प्रत्येक संकटातून वाचविलेले आहे.

आईवडिल भाऊ बहिण सर्व काही माझे साईबाबाच आहेत अशी माझी धारणा आहे. या प्रसंगी मी साईबाबांना कोटी कोटी प्रणाम करतो व सर्व साईभक्तांना प्रणाम करतो कारण त्या सर्वांना मी माझे कुटुंबिय मानतो.

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे ।

**सौ. नंदा हरबनसिग परदेशी**
शेतकी संघाजवळ परदेशीपुरा
मु. पो. नंदुरबार जि. धुळे

माझे दिर श्री जीवनसिग हे धुळे येथे घाडगे कंपनीत ड्रायव्हर म्हणून कामावर आहेत. कामानिमित्त १९८३ च्या भाद्रपद महिन्यात अमदाबादहून गाडी घेवून

परत धुळयाकडे येत होते. साधारणतः संध्याकाळची ७-३० ची वेळ असेल. बाजीपुऱ्या जवळ समोरून भरधाव येणारी दुधाची ट्रक या गाडीवर आदळली काय होते याची कल्पना करण्या पूर्वीच एक मोठी आरोळी कानी आली. दूधाचे ट्रकमधील एक जण जागीच ठार झाला, व माझे दिर बेशुद्ध होवून जागीच पडले होते. जवळ पास कोणी नाही. क्लिनर होता. पण तो देखील भांबावलेल्या स्थितीत होता. रस्त्याने एक बाई दूध देणे कामी गावाकडे चालली होती. तिने परिस्थिती पाहिली व तसेच बारडोलीस जावून तिच्या मामास इत्यंभूत हकीगत कथन केली ते सज्जन अगदी प्रामाणिक होते. त्यांनी लागलीच आपली गाडी घेवून घटना स्थळी हजर झाले, व माझे दिरास तात्काळ बारडोलीच्या दवाखान्यात दाखल केले. त्यांच्या ओळखी मुळे उपचाराची चक्रे वेगाने फिरू लागली. दोन दिवस तर दिर बेशुद्धावस्थेतच होते. इतपावेतो घटना घडली तो पर्यंत आम्हास काही कल्पना नव्हती. वर्तमान पत्रात जेव्हा बातमी वाचली की, "जीवनसिंग नावाचे ड्रायव्हर बारडोली येथे मृत्यूच्या छायेत आहेत. नातेवाईकाने सत्वर यावे," ही, बातमी समजताच आम्ही फारच घाबरून गेलो. माझे पती, धाकटे दिर व हयाचे मित्र बारडोलीस निघाले. मी बाबांना शरण गेले व सांगितले तुम्ही पाठीशी आहात आम्ही तुमच्यावरच विसंबून राहू व लगेच मी हयांच्या जवळ बाबांची उदी दिली. १/२ दिवस तर आम्हास काहीच समाचार मिळाला नाही. नातेवाईक तर फारच घाबरून गेले. नाना शंकानी मन ग्रासत होते. पण मी बाबांचे नामस्मरण करीत होते, व सर्वाना धीर देत होते. दुसऱ्या दिवशी पूजेच्या वेळी बाबांची आराधना केली. बाबा कृपा करा आमची आपलेवर फार श्रद्धा आहे, १० वाजेपावेतो माझे दिराचे बाबतीत कुशल समाचार कळू द्या. पुजा वगैरेआटोपल्या नंतर मी परत दिराच्या सासऱ्याकडे गेले व त्यांना दिलासा देत होते. तेवढयात बारडोलीहून फोन आला, व तो ही कुशलतेचा ! बाबांचा महिमा कोणत्या शब्दात लिहू!

माझे मावस दिराचे पायावर १/२ वेळा शस्त्रक्रिया झाली. व बाबांचे कृपेने आता ते अगदी उत्तम असून कामावर देखील रुजु झाले आहेत. त्यांना शिरडीस बाबांचे दर्शनास अवश्य आणेन हे दिरास सांगितले आहे, आणि दिवाळीच्या सुट्टीत आम्ही शिरडीस बाबांच्या दर्शनास जाणार आहोत.

अशा माझ्या प्रेमळ, संकटकाळी धावून येणाऱ्या बाबांना माझे प्रणाम.

# दु:ख्खे हरिती साईकृपेने

**श्री. शांताराम ब्रीद**
२६ नवयोजना सदन, ताडदेव मुं. ३४.

माझ्या तसेच माझ्या कुटुंबाच्या आयुष्यातील आनन्दाचा दिवस आणि कधीही विसरता येणार नाही असा भक्तांच्या दु:खाला धाऊन येणाऱ्या बाबांच्या दर्शनाचा दिवस आमच्या जीवनात आम्ही अनुभवला आहे तो असा–

तसे माझे सर्व कुटुंबच साईभक्त असून कितीही मोठे संकट आले किंवा लहान मोठी अडचण आली तरी आम्ही अेकच हांक मारतो. ती म्हणजे "साईबाबा" सर्व आमचा दुखण्यावर अेकमात्र उपाय म्हणजे लाखो गुणकारी बाबांची उदी. मनाला समाधान शांती देणारा अेकमात्र मंत्र म्हणजे बाबांचे नामस्मरण. आजपर्यंत बाबांच्या कृपेने, आशिर्वादाने आम्हाला बाबांनी बरेच वेळा तारलेले आहे. त्यांचे कित्येक अनुभव आम्हाला प्रत्यक्ष आलेले आहेत. मोठमोठया अडचणीतून दु:खातून बाबांनी आम्हाला तारले आहे. त्यापैकी खालील अनुभव बाबांच्या दर्शनाचा आहे तो खालील प्रमाणे.

गुरुवारचा दिवस होता. संकष्ट चतुर्थी होती त्या दिवशी १/२ वर्षापासून माझी कंबर दुखत होती. डॉक्टरानी सल्ला दिला. कंबर स्लीप डिस्क झाल्यामुळे दुखत असावी. ते समजताच आमचे सर्व कुटुंबच हादरून गेले, आणि बाबांवर नितांत श्रद्धा असलेली माझी पत्नी सौ. प्रज्ञा तर रडकुंडीला आली. तिचे डोळे अश्रूने भरून गेले. तशातच आमचे श्रद्धास्थान पूज्य बाबा यांना नमस्कार करून म्हणाली,"बाबा आमचे डॉक्टर वैद्य, वाली सर्व काही तुम्हीच आहात, तुम्हीच कंबर दुखी घालवायला पाहिजे. आम्ही दुसरीकडे जाणार नाही" आणि ती शाळेत निघून गेली.

बाबा सतत भक्तांची हाक अेकतात तशी तिची हाक अेकली. संध्याकाळी साडे तीनच्या सुमारास बाबा मालीसवाला बनून माझ्या घरी आले. चौकशी करू लागले. "शांताराम घरात आहे ?" माझ्या बहिणीने उत्तर दिले ते संध्याकाळी येतील. तुम्ही संध्याकाळी या ! बहिणीला वाटले या मालीसवाल्याचे काय काम असेल !

संध्याकाळी ७.३० वाजता तेच मालीशवाले परत चौकशीला आले. त्यावेळी सुद्धा मी घरी नव्हतो. माझ्या घरांत दर गुरुवारी साईबाबांना चटणी भाकरीचा नैवेद्य दाखविला जातो तो कार्यक्रम चालू होता. म्हणून मालीशवाल्यांना (बाबांना) खुर्चीवर बसायला सांगण्यात आले. आणि चौकशी केली. की आपण कुठून आलात. त्यावेळी ते म्हणाले शांतारामच्या मित्राच्या शेजारी मी रहातो. शांताराम डॉकयार्डच्या ऑफिसमध्ये भेटला होता त्याची कंबर दुखते त्याचे मालीश

करायला मी आलो आहे पण तो आता भेटला नाही तर पुन्हा येईन असे सांगून मालीसवाले (बाबा) निघून गेले. जाताना त्याची कंबर ठीक होईल इतके मात्र बोलले.

इतके होऊन सुद्धा कोणी मालीसवाला आला असेल असेच घरात समजत होते. इतक्यात मी घरी पोहोचलो. माझ्याजवळ चौकशी करता मी सांगितले मी कोणाला भेटलो नाही. आज डॉकयार्डरोडच्या ऑफिसात गेलो नाही किंवा मालीश वाल्याला बोलाविलेले नाही. मी कधीच अंगाला अगर कंबरेला तेल लाऊन घेत नाही मग मालीसावाल्याला कसा बोलावू ? त्यावेळी माझ्या पत्नीच्या मनात झटकन आले अरे ते बाबाच मालीसवाल्याच्या रुपाने येऊन गेले आणि त्या दिवसापासून माझी कंबर दुखायची थांबली ती आजपर्यंत फक्त बाबांच्या आशिर्वादाने आणि आम्हाला असा अनुभव आला.

**"जरी हे शरिर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी"**

असे आमचे दैवत बाबा त्यांनी आम्हाला तारले आहे. त्याची कृपा सदैव राहो इतकीच त्यांच्या चरणी प्रार्थना ! त्यांची भक्ति सतत करण्याची शक्ति मिळो.

# बाबांची कृपादृष्टी

**सौ. सुशिला य. शिंदे**
४१ दामोदर सहनिवास
राधा दामोदर नगर ठाणा पूर्व ४०० ६०३

श्री साईबाबा हे आमच्या घरातील सूत्रधार, मालक आहेत. सर्व बऱ्या वाईट गोष्टीचे चालक आहेत. तेथे बाबा आहेत तेथे वाईट हे लिहीणेच मुळी चुकीचे आहे. पण काही वाईटातूनच चांगले घडत असते हे विसरून चालणार नाही. बाबांविषयी अनुभव सांगावे तेवढे थोडेच आहेत.

माझा नातू श्रद्धानंद हा जन्मल्यानंतर १५ दिवसांनी त्याच्या जांघेच्या वरच्या बाजुला फणसाच्या बी एवढी गाठ आलेली दिसली. लगेच डॉक्टरकडे दाखविली. डॉक्टर म्हणाले हा हर्निया आहे. सात महिन्यानंतर शस्त्रक्रिया करावी लागेल. गाठ

वाढू देवू नका. सध्या काही औषध नाही हे ऐकून मी फार घाबरून गेले. घरी आल्यावर श्री साईबाबांच्या मूर्ती समोर उभी राहून त्यांची प्रार्थना केली त्यांना सांगितले हे दयाघना माझा धन्वतरी तूंच आहेस. तुझी संजीवनी (उदी) मी बाळाच्या गाठीला दिवसातून तीन वेळा लावीन त्याला प्यायला देईन. पंधरा दिवसांच्या आंत गाठ बरी झाली पाहिजे. आमच्या वंशाच्या दिव्याला तेवत ठेवण्याचे काम तुमचेच आहे. तुम्हीच तारणार मी त्याबद्दल गांठीबद्दल डॉक्टरकडे मुळीच जाणार नाही. त्या दिवसापासून मी उदी गाठीला रोज लावू लागले आणि काय सांगू माझ्या धन्वंतरी श्री साईची लीला एक आठवडयाच्या आत गाठ लहान होत जावून पंधरादिवसांच्या आत साफ बरी झाली. तसेच त्याच्या नावा विषयी त्याच्या जन्माच्या अगोदरच मी बाबांना सांगितले होते. मुलगी वा मुलगा होवो मी त्याचे नाव श्रद्धा ठेवणार. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याची रास कुंभच आली आहे. त्याप्रमाणे त्याचे नाव श्रद्धानंद असे ठेवले आहे की नाही माझ्या जगतचालक साईची लीला अशा या माझ्या पाठीराख्याला कोटी कोटी प्रणाम.

मला नेहमी वाटावयाचे म्हाताऱ्या साईचे मला दर्शन व्हावे. ती इच्छा साईंनी द्वारकामाईत पूर्ण केली पण मला अभागीनीला उमगलीच नाही. त्याचे असे झाले मी ठाणा गाडीने शिरडीला रात्री ८ वाजता पोहोचले तसेच बॅग फुलवाल्याकडे ठेवून हात पाय धुवून चावडीच्या बाजूने द्वारकामाईत बाबांच्या शिळेवर मस्तक ठेवण्याकरिता निघाले एवढयात द्वारकामाईचे कोपऱ्यावर एक शुभ्र वेषधारी म्हातारा फकिर मला म्हणाला "भूख लगी है खाना दो" मी त्याला म्हणाले, "जरा ठहरो पाव पडके आती हूँ" असे म्हणून मी द्वारकामाईत गेले माझ्या मागे तो फकिर दारात येवून उभा राहिला. मी शिळेवर डोके टेकता टेकता त्याला हाताने खुण केली जरा थांब तो माझ्याकडे पाहून हसत उभा होता. मी शिळेवर डोके ठेवून नमस्कार करीत असतानाच द्वारकामाईत कुत्री मोठयाने ओरडत होती इतक्यात कोणी तरी बोलले बाबांची फेरी आहे. कुत्र्याना हाकलू नको हे शब्द कानी पडताच मी दाराकडे पाहिले पण काय तिथे कोणीच नव्हते तो फकिर निघून गेला होता. मी तशीच वेडयासारखी त्या फकिराला शोधण्यासाठी भोजनालयाकडे गेले तिथ भेटल्यावर त्याला घेवून जेवायला जाईन. पण तो तिथेही नव्हता. लेंडीबागेत पाहिले. संपूर्ण मंदिराच्या परिसरात शोधले पण तो फकिर मला परत भेटला नाही. कसा भेटणार प्रत्यक्ष साईबाबांनीच माझी इच्छा पूर्ण केली होती पण मला अभागिनीला त्याची ओळखच पटली नाही. भुकेलेल्याला आधी संतुष्ट करा ही त्यांच्या साईसच्चरित्रातील शिकवणूक त्याच्या शिळेवर मस्तक ठेवण्याच्या नादात विसरून गेले. या अभागिनीला इच्छा बाबांनी पूर्ण केली पण मी मात्र त्यांना काहीच देवू शकले नाही. साधा नमस्कार पण. तेव्हापासून माझ्या मनाला फार खंत लागली आहे. अजून माझ्या डोळयासमोर ती शुभ्र वेषधारी, हसत मान वर केलेली म्हातारी मूर्ती येते व तोंडातून शब्द निघतात "अगाध तुझी अघटित करणी".

# कल्पवृक्ष श्रीसाईनाथ

– श्री. श्रीहरी बोंगाळे,
रमेशभुवन शेजारी, नागशेतकोप्पा, केशवापूर, हुबळी.

नारळाच्या झाडाला आपण कल्पवृक्ष असे संबोधतो. कल्पवृक्ष म्हणजे कल्पेल ती गोष्ट देणारा वृक्ष.

प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात कोणती ना कोणती तरी संकटे येत असतात व अशा ऐन संकटाचे वेळी आपण शेवटचा उपाय म्हणून भगवंताला आळवतो व या संकटातून सुटका कर असे मागणे मागतो.

मी. स्वतः श्रीसाईबाबांचा भक्त आहे आणि जेव्हा, जेव्हा माझ्यावर संकटे ओढवतात त्या त्या वेळी मी श्रीसाईबाबांचा धावा करतो व आज पर्यंत त्यांनी मला अनेक संकटातून वाचवले आहे. त्याचे प्रत्यंतर दाखवून देणारी घटना माझ्या अनुभवास आली ती मी पुढे देत आहे.

दि. २१।१०।१९८४ ची ती दुपार. आम्ही सर्व दवाखान्याच्या व्हरांडयात येरझाऱ्या घालत होतो. सर्वांच्या चेहऱ्यावर चिंतेचे सावट पसरले होते. मी तर सतत देवा समोर आईची या गंभीर दुखण्यातून सुटका व्हावी म्हणून देवाजवळ प्रार्थना करत होतो.

सुमारे दहा बारा दिवसापूर्वी नेहमी प्रमाणे आम्ही बाहेरून फिरुन आलो आणि माझ्या आईला अचानक थंडी भरली व अंगाला सूज आली. डोळया समोर काळे काहीतरी दिसते आहे असे ती म्हणत होती. आम्ही ताबडतोब डॉक्टरांना बोलावले. त्यांनी सारी तपासणी करून औषध लिहून दिले. त्यामुळे आईला तो एक दिवस आराम वाटला. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा तसेच झाले, व ती बेशुद्ध झाली. तेव्हा डॉक्टरांनी निदान काढले की रक्तात विष तयार होण्याची प्रक्रिया सारखी होत आहे. रक्त अशुद्ध आहे व त्याची ॲलर्जी म्हणून अंगाला सूज वगैरे येत आहे. तेव्हा, ताबडतोब हॉस्पिटल मध्ये हलवायला पाहिजे. पण अशा प्रकारचा विचित्र विकार व्हायला काही तरी घटना किंवा खाण्यातील दोष वगैरे काही तरी कारण नको होते का ? पण आम्ही डॉक्टरना जास्त काही न विचारता तिला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. पण काही उपयोग झाला नाही. तिची प्रकृती आणखीनच खालावत चालली होती. आता मात्र आम्हा भावंडांचा व वडिलांचा धीरच सुटला होता, आणि डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करायचा निर्णय घेतला. कारण जी जी इंजेक्शनस् तिला दिली जात होती त्याची उलटीच प्रतिक्रिया येत होती.

आणि दि. २१ ऑक्टोबरची दुपार आम्ही सर्व चिंतातूर होतो. थोडया वेळानी डॉक्टर बाहेर आले व म्हणाले की, ही बाई या दुखण्यातून सुटणे कठीण आहे.

कारण नेमके कोणतेच निदान होत नाही.

मी तर पुरता भेदरलेलो. तशाच अवस्थेत सायकलवर टांग मारून घरी आलो. श्री साईबाबांच्या फोटो समोर गेलो व म्हटले, ''बाबा, हया परीस्थितीतून आम्हाला व आईला वाचवा. जर का आईच्या जीवाचे बरे वाईट झाले तर आम्ही पोरके होऊ''. आणि उदीची पुडी घेऊन मी हॉस्पीटल मध्ये आलो. डॉक्टरांना भेटून आईला श्रीसाईबाबांचा अंगारा लावायला परवानगी मागितली व त्यांनी ती आनंदाने दिली.

मी खोलीत गेलो. आईचे कृश शरीर व खोल गेलेले डोळे. मला एकदम कसेतरीच झाले. मी तिच्या जवळ गेलो व तिला उदी लावली. तिला बोलण्याची सुद्धा ताकद नव्हती. पण त्यातूनही खोल गेलेल्या, थकलेल्या आवाजात ती म्हणाली, ''अरे, बाबांच्या फोटो समोर दिवा लावलास ? मी नाही म्हटले, ''मग जा आता जाऊन लाव''.

मी मुकाटयाने खोली बाहेर पडलो व तडक घरी आलो बाबांच्या फोटो समोर दिवा लावला, व श्रीसाईस्तवन मंजिरी वाचत बसलो.

बाबांच्या समोर लावलेल्या दिव्याचा मला मोठा आधार वाटत होता. मी पुन्हा हॉस्पीटल मध्ये गेलो. तेंव्हा रात्रीचे दहा वाजले होते. पण मघाशी जे सगळयांच्या चेहऱ्यावर चिंतेचे सावट होते. त्याच्यात फरक पडला होता. मी वडिलांना भेटलो, ते मला म्हणाले, ''आता आईच्या रक्तात खूपच फरक पडला आहे. दर दोन तासानी जे रक्तात विष तयार होत होते ते आता होत नाही, व ती आता हालचाल करते''.

आईला हॉस्पिटलहून घरी जाण्यास परवानगी मिळाली. घरी आल्या नंतर आम्ही नियमीत पणे तिला उदी पाण्यातून प्यायला देत असतो. तिची प्रकृती आता चांगलीच सुधारली आहे.

श्री श्रीसाईनाथांना कल्पवृक्ष म्हटले ते याच मुळे. कारण कल्पवृक्ष मागेल ते देतो. त्याच प्रमाणे श्रीसाईनाथांनी आईचे प्राण वाचवून, मी आईचे प्राण वाचवा म्हणून केलेली प्रार्थना ऐकली, व माझी इच्छा पूर्ण केली.

।। धन्य धन्य श्रीसाईनाथ ।।

# ।। साई माझा सखा ठाई ठाई उभा ।।

**सौ. मधु पांडुरंग गायकवाड**
सी-५, २८।१।३, सेक्टर - १८
न्यू पनवेल, जि. रायगड (म. रा.)

आम्ही अंबरनाथ येथे एका कृष्ण भक्तांच्या "बंगाल हाऊस" नामक चाळीत १८-२० वर्षे राहिलो. नुकतेच लग्न झाले होते व रेल्वेत नोकरी मिळाल्यामुळे आम्ही या चाळीत रहावयास गेलो. हळूहळू नव नवीन वस्तु खरीद्दल्या जाऊ लागल्या कारण आम्ही दोघेही नोकरी करीत आहोत. ती वास्तू भाग्याची आहे ही भावना दृढ झाली. आपल्या आईवर प्रेम असावे तसे त्या वास्तूवर- घरावर आमचे प्रेम होते. तेथेच राहून आम्ही साईकृपेने सिडको, न्यू पनवेल येथ ब्लॉकही घेतला. त्यामुळे साईवर श्रद्धा अधिकच दृढ झाली. व वास्तूही लाभदायक आहे ही भावना बळावली. त्यामुळे पनवेलच्या ब्लॉक मध्ये रहावयास गेल्यावरही आम्ही अंबरनाथचे घर सोडले नव्हते. सोडायचा विचारही नव्हता. भाडे भरावयास मी मधून मधून जात असे. भिवंडीची दंगल उसळली व मी आजारी पडले त्यामुळे एकदा मी मनिऑर्डरने भाडे पाठविले. दंगल थोडी शांत झाल्यावर मी पुढचे भाडे भरावयास गेले. पण घरमालक व त्यांची पत्नी म्हणू लागली माझ्या मुलाचे लग्न करावयाचे आहे, मेहेरबानी करून तुम्ही जागा सोडा. याच घराचे आम्हाला ५००० ते ८००० रु. दुसरे लोक द्यायला तयार होते. पण माझे श्रद्धाळू मन त्या वास्तूचा सौदा करायला तयारच नव्हते. शेवटी घरमालक ज्यांना मी भाईसाहेब म्हणत असे ते म्हणाले की काही पाहिजे असेल तर मागा पण जागा मलाच द्या. मी सर्व ऐकले व घरी येऊन माझ्या यजमानाना सर्व सांगितले. घरमालकाला एकच मुलगा आहे. आम्हालाही एकच मुलगा आहे. घरमालकाच्या मुलाला मी माझ्या मुलाप्रमाणेच वागवत असे. त्याची आई तिलाही मी भाबी म्हणत असे. शेवटी विचार केला. एवढे त्या घरावर प्रेम आहे पण त्या घरांत रोज दिवाही आपण लाऊ शकत नाही. शेजारी रहाणारा माझा भाऊ एकाएकी रेल्वे अपघातात वारला. त्यामुळे अंबरनाथला गेले की मी आजारी पडत असे. कारण हा भाऊ लहान होता माझ्यापेक्षा. मी पुत्रवत त्याला वाढविले होते. शेवटी घरमालकाच्या मुलाच्या लग्नासाठी हे घर सोडायचे ठरविले. मनात साईबाबांना नवस केला. "साईनाथा या घराचे जे काही पैसे मिळतील (कारण घर मालकाच्या तोंडूनच निघाले होते की "काही मागा, पण घर परत द्या") त्यांतून हजारी ५ अशी माणसे जेऊ घालीन मालक अतिशय कंजूष आहे. त्याचे हातून काही सुटणे कर्म कठीण होते. साईवर हवाला टाकून मी घरून निघाले. घरमालकाने मला १५०० रु. देऊ केले व माझे २० वर्षापूर्वीचे ५०० रु. डिपॉझिट घेऊन मी घर मालकाच्या ताब्यात दिले. माणसे जेऊ घालण्याचे देवाला कबूल केले. गृहस्थ बंगाली असल्यामुळे त्याचे दैवत

"काली माता" हिलाही नारळ वाढविण असाही मी नवस केला होता. सध्या माझी प्रकृती ठीक नाही म्हणून नवसाची पूर्ति होऊ शकली नाही. ११ माणसे जेऊ घालण्याचे व नारळाचे असे मी "भाग" बांधून (वेगळे काढून) ठेवले आहेत. साईनाथ मला या आजारातून लवकर बरे करो. मी आतुरलेय त्यांच्या दिव्य दर्शनाला त्यांचा नवस फेडायला.

त्या घरांत माझ्या मयत भावाचे सामान होते ते घेऊन येतांना (घरमालक) भाईसाहेबांनीच मला मदत केली. एक भाऊ गेला तरी दुसऱ्याच्या मुलाच्या लग्नासाठी मी अंबरनाथचे घर सोडले. दिव्याला सामान उतरले तेव्हांही माझ्या यजमानांचा एक परिचित मित्र भेटला त्याने सामान पनवेलच्या गाडीत ठेवले. पनवेलला उतरल्यावर पुन्हा एका आर.पी.एफ. ने एका वेडसर माणसाला हाक मारून ते सामान 'घरपोच करायला मदत केली. माझा साई माझे साठी ठाई ठाई उभा ठाकला. मी सामानासह सुखरूप घरी पोचले. भक्त हो, सामान पोत्यात होते, इतक्या आदळ आपटीत त्या सामानातील कप-बशीही फुटली नाही. माझ्या साईनाथा तुझे किती किती उपकार मानू. असाच माझ्या पाठीशी उभा रहा. माझ्या असंख्य भक्त भावंडांसाठीही असाच उभा रहा हीच तुझे चरणी नम्र प्रार्थना.

"बाबा, मला लवकर बरे कर, मी तुझ्या दर्शनाला आतुरलेय रे, तुझी कृपा होऊ दे मजवर".

# श्री बाबांच्या कृपेची स्मृती सुमने

**श्रीमती शशिकला मरबल्ली**
१ अलहम्ब्रा, ३ कारमाईकल रोड मुंबई २६

मला श्री साईबाबांची भक्ति करण्याची प्रवृत्ती झाली ती माझ्या जावयांच्या आजी - आईची आई यांच्यामुळे. त्या दर वर्षी शिरडी व साकोरीस जात असत म्हणे. ही १९२३, २४ नंतरची गोष्ट असावी. त्या रोज पहाटे बाबांची स्तोत्रे काकड आरती वगैरे म्हणत असत. तसेच श्री साईसच्चरित्र वगैरे वाचीत होत्या. त्यांनीच शिरडीहून एक चांदीची बाबांची मूर्ती छापलेली मोहर आणून त्यांच्याकडे अभिषेकाच्या देवांमध्ये ठेवलेली आहे. त्यांच्या सांगण्यावरूनच आम्ही दोन्ही कुटुंबातील मंडळी प्रथम १९५५ साली शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेऊन दोन तीन दिवस तिकडे राहून आलो. त्यावेळी माझे जावई नुकतेच डॉक्टर झाले होते.

त्या नंतर १/२ वर्षांनी माझ्या जावयांना फुड पॉइझन होऊन ते गंभीर आजारी झाले. डॉक्टरी उपाय चालूच होते. पण काही गूण मिळेना. आम्ही सर्व घाबरून गेलो. आजी सारखा बाबांचा धावा व जप करीत असत. अशा स्थितीत एका पहाटे आजींना जरा झोप लागली व त्यांना बाबा हसत घरात आल्याचे स्वप्न पडले. त्या जाग्या झाल्या व सारख्या म्हणू लागल्या, "आता आमचा बाळकृष्ण (म्हणजे नातू) बरा होणार ! बाबा आमच्या घरात हसत हसत आले. आता भिती नाही." आणि बाबांच्या कृपेने त्यांना हळूहळू बरे वाटू लागले. पहा बाबा किती दयाळू आहेत ते आपल्या भक्तांच्या हाकेला कसे धावत आले.

एकदा माझा नातू, मुलीचा मुलगा, राज, हा दिड दोन वर्षांचा होता तेव्हा त्याला मी फिरायला घेऊन चालले होते. तेव्हा वाटेत एका दुकानात त्याला श्री बाबांचा फोटो दिसला तर लगेच राजने "छाई बा ss बा पा ss पा (नमस्कार)" म्हणून आपले दोन्ही चिमुकले हात पटकन वर कपाळास लावले. त्याच्यावर घरातले फार चांगले संस्कार झाले आहेत. त्याचे आजोबा आमचे व्याही हे स्वांतत्र्य सैनिक होते ते २।३ वेळा तुरुंगामध्येही जाऊन आले होते ते आणि त्यांची साध्वी पत्नी दोघेही स्वतः हाताने सूत काढून कपडा व साडया विकून आणवून नेसत असत आणि ते त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवले.

पुढे हे आजोबा चांगल्या नोकरी वरून सेवानिवृत्त झाले. ते रोज सकाळी मोठयाने मंत्र म्हणून देवाची सांग्य पूजा करीत असत. धाकटा राजू तेव्हढा त्यांच्याजवळ बसत असे. त्यामुळे त्याला बरेच मंत्र पाठ झाले होते. तो मोठा झाल्यावर रोज घराबाहेर पडताना व शाळेत जाताना देवापुढे उभा राहून आपला उजवा हात छातीवर ठेऊन एक क्षणभर डोळे मिटून पाया पडून जात असे. पुढे राजला आय. आय. टी. मध्ये खरगपूर येथे प्रवेश मिळाला. तेव्हा तो एकटाच मुंबईहून तिकडे गेला. तिकडे पोचल्यावर गाडीतून उतरताना त्यांची सूटकेस हरवलेली त्याचे लक्षात आली. अगदी खिन्न मनाने तो बिचारा रेल्वे पोलीसांकडे तक्रार नोंदवण्यास गेला. इतक्यात एक म्हातारा ती सूटकेस घेऊन आला आणि म्हणाला, "ये लेव तुम्हारी बॅग." राज त्याला पैसे देण्यास पाहातो तर तो नाहीसाच झाला. तो म्हातारा म्हणजे आपले बाबाच तर नसतील ना ? नाहीतर पैसे कोण सोडतो ? दिलेले पैसे कमी म्हणूनच भांडतात. अशा अनेक घटना आमच्याकडे घडत असतात.

पूज्य कल्याणीबाई नायम्पल्ली ह्या आमच्या जावयांच्या आजी, त्यांना जाऊन १६, १७ वर्षे झाली. त्यानंतर ४, ५ वर्षांनी माझ्या विहिणबाई गेल्या. आदल्या दिवशी नाग पंचमीच्या सवाष्णीची पूजा करून दुसऱ्या दिवशी पहाटे हार्ट फेल होऊन, आपल्या मुलाच्या खाद्यांवर डोक ठेऊन, शांतादुर्गेच्या फोटोवर नजर स्थीर करून तिच्या चरणी लीन झाल्या. त्या गेल्यावर आमच्या जावयांनी त्यांची आजी

वाचत असलेले श्री साईसच्चरित्र मला दिले. ते सुटे पानांचे होते. ते मी बाइडींग करून वाचण्यास रोज सुरुवात केली. तेव्हा पासून मला बाबाबद्दल जास्त ओढ लागली.

आमच्याकडे सर्वांना साईबाबांवर भक्ति व श्रद्धा आहे. आणि घरात काही विशेष चांगल्या गोष्टी घडल्यास शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेऊन २/३ दिवस राहून येत असतात. पण रोजच्या दिनचर्येत बाबांचे चरित्र पारायण वगैरे करीत नाहीत.

माझी मुलगी शिवलीलामृत गणपती स्तोत्र रोज नियमाने वाचते. १२ ज्योतीर्लिंगाची यात्राही तिने केली आहे. तसेच जावयांस थोर महात्म्यांनी लिहिलेली वेदांत विषयक पुस्तके वाचण्याचा नाद आहे. माझा मुलगा रोज पहाटे पाच वाजता उठून देवाजवळ उदबत्ती लावून घटकाभर उभा राहून प्रार्थना म्हणून पाया पडून जातो तेवढेच. सूनबाई रोज गणपती स्तोत्र व आरत्या वगैरे असलेल्या पुस्तकांचे पारायण करते. दर मंगळवारी ती दोघे पहाटे ४ वाजता उठून सिद्धीविनायक मंदिरात जाऊन आरती वगैरे झाल्यावर येतात.

परवा गुरुपौर्णिमेच्या दिवशी साईधाममध्ये बोलता बोलता माझी बहीण म्हणाली, "दिवसा टी. व्ही. वर सिनेमा पाहातेच मग स्वप्नातही तेच दिसते. परवा रात्री मला स्वप्न पडले की मला खुर्चीला बांधून ठेवली आहे आणि एक व्हिलन हातात एक चाकू घेऊन आस्ते आस्ते माझ्याजवळ येत आहे. आणि मी घाबरून सारखा बाबांचा धावा करीत आहे. इतक्यात तो व्हिलन माझ्या अगदी जवळ येऊन पोचला तेव्हा मी बाबांना म्हणते बाबा तुम्ही कसले आता येणार ? तो व्हिलन माझ्या अगदीच जवळ आला आहे. तेव्हढयात माझ्या हातावर जोराची चापटी बसली आणि मी जागी झाले. खरी गोष्ट अशी होती की तिच्याजवळ झोपलेल्या तिच्या नातवाने झोपेतच जोरात एक बुक्का तिच्या हातावर मारला होता आणि दोघेही एकदमच जागी झाली. तो गडबडून म्हणाला "सॉरी हं आजी, मी स्वप्नात शेजारच्या प्रकाश बरोबर बॉक्सींग करीत होतो तर चुकून तो बुक्का तुला लागला." मी बहिणीला म्हटले, "पहा तू बाबांचा धावा केलास ना ? बाबांनी स्वप्नात सुद्धा कोणत्यातरी रितीने संकटांतून तुला मुक्त केले की नाही ?" शरण आला आणि वाया गेला. दाखवा दाखवा ऐसा कोणी " श्री बाबांचे चरणी आमचे कोटी कोटी प्रणाम !

# प्राणांतीक उचकीच्या त्रासातून बरा झालो.

श्री. व्ही. ए. किरपेकर (फोटोग्राफर)
४०५ सोमवार मु. कराड जि. सातारा

ही गोष्ट पाच वर्षापूर्वीची आहे. माझ्या पोटात प्रोस्टेटग्लँड वाढल्यामुळे मला एके दिवशी युरीनचा त्रास जोरात सुरु झाला व ताप आला. आम्ही लगेच येथील डॉक्टरना प्रकृती दाखविली. त्यांनी लगेच ऑपरेशन करावे लागेल फार थांबू नका येथे कराडला तशी ऑप्रेशनची नवीन असलेली साधने नाहीत तरी पुण्यास जाऊन ऑपरेशन करा. तेथील डॉक्टरना मी पत्र देतो. त्याप्रमाणे माझ्या मुलाने पुण्यास डॉ. बापट यांचे दवाखान्यात मला अॅडमीट केले. व तेथे उपचार सुरु झाले व सर्व टेस्ट घेऊन एके दिवशी दुपारी २ वाजता ऑप्रेशन केले, मी जाताना माझ्या बरोबर बाबांचा फोटो व स्तवनमंजिरी पोथी नेली होतीच. त्या प्रमाणे बाबांच्या फोटोला वंदन करून व उदी लावून ऑप्रेशन रुम मध्ये गेलो. मी भीतीने फार घाबरलो होतो. परंतु बाबांनी धीर दिला. ऑप्रेशन चांगले झाले. रिवाजा प्रमाणे मला सलाईन लावण्यात आले होते. तब्बेत ठीक होती. परंतु दुसरे दिवशी सलाईन काढल्यावर उलटया व उचकी सुरु. झोप नाही. बरेच उपचार झाले. शेवटी डॉक्टरनी कराडला घरी नेण्यास सांगितले. बरेच उपचार झाले पण आमच्या औषधानी उचकी थांबत नाही. तुम्ही एखादया चांगल्या वैद्याचे औषध घेऊन पहा. असा सल्ला दिला. आम्ही निराश होऊन घरी परत आलो. प्रवासात उचकीचा त्रास फार झाला. जीव घोटाळू लागला व गुदमरू लागला. काही तासातच माझे प्राण जातील असे झाले. मी आमच्या येथील बाबांच्या पुतळा असलेल्या माडीत सारख्या येरझाऱ्या घालत होतो. बाबांचा जप तोंडाने करत होतो. इतक्यात एका गृहस्थानी सांगितले की येथे चांगले वैद्य श्री. पंडित आहेत. त्यांना दाखवा. त्या प्रमाणे माझ्या मुली रात्री ९ च्या सुमारास वैद्यांचे घरी गेल्या व माझे प्रकृतीमान त्यांना सांगितले. तो दिवस गुरुवारचा होता. वैद्य म्हणाले मी रात्री १० वाजता औषधे व इतर साधने घेऊन येतो. त्याप्रमाणे ते आले. मला तपासून त्यांनी औषधांच्या पुडया दिल्या व एक प्रकारची तेलाची सिरेंज दिली.ते निघुन गेले व सकाळी काय ते सांगा म्हणाले. आश्चर्याची गोष्ट अशी की १५ ते २० मिनीटातच संडासच्या वाटेने तेल पडून गेले व रात्री ११ वाजता गुरुवारी ऊचकी बंद झाली, व माझे प्राण वाचले. तो दिवस मला अद्यापी आठवतो. बाबांच्याच रुपाने रात्री वैद्य घरी आले व त्यांनी चांगले उपचार केले. मी त्यांचे व बाबांचे उपकार फेडू शकत नाही. त्या नंतर आज पावेतो उचकी नाही.

घरातील सर्वांना व मला किती आनंद झाला ते वर्णन करता येत नाही. बाबांची किमया अगाध आहे.

# जिथे भक्त तिथे साई, बाबांनी दिवा लावला...

**श्री. भाऊराव होकम** शिक्षक
जनता विद्यालय, पोंभूर्णा ४४३ ५०६
जि. चंद्रपूर.

मी उन्हाळयाच्या सुट्टीत चंद्रपूरला घरीच राहतो. माझ्याजवळ वडिलांनी दिलेली १/२ तोळयाची सोन्याची अंगठी होती. ती मी माझ्या कपडयाच्या ब्रिफकेस मध्ये ठेवीत असे. मी ती अंगठी अनेकदा काढून घातली व ठेवून दिली. सुटया संपल्यानंतर मी नोकरीच्या गावी आलो. पंधरा दिवसानंतर, एका गुरुवारला ब्रिफकेस मधून एक ड्रेस घालायला काढला. सकाळची शाळा असल्यामुळे व वेळ झाल्यामुळे मी बाबांचे नामस्मरण करीत घाई घाईने शाळेत गेलो. शाळेत गेल्यानंतर दोन तासांनी अचानकपणे काहीतरी हरवल्यासारखे वाटू लागले. कोणती वस्तू हरवली असेल याचा मनातल्या मनात विचार करून बाबांना विचारीत होतो. बाबांनी मला एकदम आठवण करून दिली की तू आपल्या सोन्याच्या अंगठीचा तपास कर. मी अगदी अस्वस्थ झालो. शाळेत लक्ष लागत नव्हते. मनाची धडधड सुरू झाली. एक हजार रुपयाची वस्तू हरवली आता आपल्याला घरचे लोक काय म्हणतील या बद्दल भिती वाटू लागली. शाळा सुटल्यावर घरी आलो. माझी कपडयाची ब्रिफकेस घेतली, पूर्ण खाली केली. प्रत्येक कापडाची घडी मोडून पाहिले. ब्रिफकेस हलवून पाहिली. इतर कागदांच्या फायली पाहिल्या परंतु अंगठी कुठंच दिसेना. मनातल्यामनात रडायला यायचे. बाबांच्या फोटोसमोर रडलो. बाबांनी म्हटले की बाबा आपणच माझी अंगठी आणून देऊ शकता. परंतु बाबांनी मला पुन्हा घाबरवले. मला असे वाटायला लागले की, आपण सकाळी कपडे घाईघाईने काढले व कपडे घालीत असतांना काही तरी पडले व त्याकडे आपण दुर्लक्ष करून शाळेत निघून गेलो. घरी कोणीच नाही. मोलकरीण आली असेल तिने झाडलोट केली असेल व तिला अंगठी नक्कीच मिळाली असेल असे वाटू लागले. तिला विचारले परंतु तिने सुद्धा नकारच दिला. कोण इमानदारी दाखवेल ? मन अगदी बेचैन झाले. जेवण सुद्धा कमी झाले.

एक महिन्यानंतर मी चंद्रपूरला घरी गेलो. झालेली हकिकत घाबऱ्या घाबऱ्या आईला सांगितली. आईला विचारले की माझी अंगठी घरी राहयली काय? कुणाला दिसली काय ? घरी विचारपूस झाली. शोधाशोध पेटया, कपाट, कपडे पण सारे व्यर्थ एका भक्तास विचारले की अंगठी सापडेल काय ? उत्तर मिळाले नाही. ती घराच्या बाहेर गेली.

नंतर मी नोकरीच्या गावी आलो. माझ्या सोबत सौ. सुद्धा आली. तिला सर्व सांगितले तिने सुद्धा सर्व पाहिले. कपडे झटकून पाहले. परंतु गेलेली अंगठी कसली

सापडणार ! सर्व कपडे पुन्हा घडी करून ठेवले. पंधरा दिवसानंतर एका गुरुवारला सकाळला आंघोळ करून ब्रिफकेस मधून कपडे बाहेर काढीत असतांना बॅगेमधील ड्रेस बाहेर काढणार तोच एकदम हातात चमकत सळसळ करीत अंगठी आली लगेच बाबांच्या फोटोसमोर जाऊन बाबांचे फार फार आभार मानले. अशाप्रकारे बाबांनी इच्छा पूर्ण केली.

खरोखरच बाबा लहान सहान खेडयातील दूरवर असलेल्या भक्तांकडे सुद्धा धावत येतात याची प्रचिती घडली. अशाप्रकारे बाबांचे आजपर्यंत मला लहान—सहान अनेक अनुभव आलेले आहेत. बाबा नेहमीच माझ्या पाठीशी आहेत असे वाटते.

मला प्रथम दोन मुली आहेत. मी बाबांना म्हणालो की आता तरी दिवा लावा. अन् काय या वर्षी खरोखरच १० जून ८५ ला मला मुलगा झाला. माझे डोळे भरून आले.

पुष्कळ दिवसांपासून साईच्या दर्शनाकरता शिरडीला जावे असे मनात आहे. परंतु बाबा जेव्हा बोलावतील तेव्हाच जाणे होईल. मी बाबांच्या बोलावण्याची वाट पहात आहे.

# "जेथे साईभक्ती तेथे कसली भिती ?"

**सौ. अश्विनी अ. चीपकर**
न्यु.बी.डी.डी. चाळ नं. १०/४८
अपना बाजार जवळ, नायगाव मुंबई ४०० ०१४.

जुलै महिना तसा आम्हाला फार कठीणच गेला. पण त्यातल्यात्यांत साईभक्तीमुळे सर्व संकटातून तरुन आलो. त्याचे असे झाले की माझा मोठा मुलगा अतूल ॲलर्जीमुळे सुजून गेला होता. सूज म्हणजे फक्त तोंडावरच होती. डोळे खोल गेले व चेहरा नेपाळयासारखा झाला. त्यामुळे मनात खूप घाबरलो. डोळयाच्या डॉक्टराकडे गेलो. त्यांनी ॲलर्जीवरच्या गोळया दिल्या. साईंना मनात विनवले "देवा जाणूनबूजून काही अपराध घडत आहेत. ते न व्हायची मी पुरेपूर दक्षता घेईन. पण माझ्या मुलाला बरं वाटू दे." आणि खरंच त्या औषधाला गूण आला व त्याची सूज नाहीशी झाली.

त्यानंतर लगेच माझी छोटी मुलगी जी १ वर्षाची आहे. (श्रद्धा')ती तिच्या वाढदिवसाच्या आधीपासूनच जुलाबाने हैराण झाली होती. सतत ६ दिवस जुलाब झाल्यानंतर १०-१२ दिवस ठीक गेले. व पुन्हा जुलाबाला सुरवात झाली. ५ दिवसात ३ डॉक्टर झाले. पण काही गूण आला नाही. उलट जास्तच आजार आला. नंतर त्यातच ताप भरला. व एकदमच मलूल पडली. सारखी मांडीवर पडून राहू लागली. त्यामुळे माझे वडील व सर्वजंण तिला वाडीया हॉस्पिटलमध्ये न्यायला सांगू लागले. पण तिकडे नेले तर ॲडमीट करतील या भितीने माझ्या मिस्टरांनी नकार दिला. तो दिवस रविवार होता व तिला आजारी होऊन पूर्ण सातवा दिवस होता. जुलाब थांबेनात म्हणून मी गावठी औषध करण्यासाठी स्वयंपाकघरात गेले. तोपर्यंत श्रद्धाला माझ्या धाकटया भावाने घेतले. त्याच्या गळयात एक "तुळशीमाळ" होती. तिला हात लावताच भावाने ती माळ श्रद्धाच्या गळयात घातली आणि काय आश्चर्य तोपर्यंत सारखी मांडीवर झोपणारी मुलगी खाली उतरुन खेळायला लागली.

त्या "तुळशीमाळेचा" इतिहास असा की माझ्या मागची बहीण दुसऱ्या बाळंतपणासाठी माहेरी आलेली आहे. ती नेहमी तिच्या दोन्ही मुलींना उदी लावते. एके दिवशी उदीची पूडी 'सोडल्यावर: त्या पूडीत तिला ही माळ मिळाली होती. ती कोणी ठेवली होती हे त्या साईंशिवाय कोणालाही माहीत नाही. बहीणीने ती माळ आपल्या मुलीच्या गळयात घातली होती. पण नंतर ती भावाने स्वतः घातली. त्याच्या गळयातून ती माळ श्रद्धाच्या गळयात आली.

ती माळ गळयात आल्यानंतर श्रद्धाला खूपच हुशारी वाटू लागली. दुसऱ्या दिवशी सोमवारी वाडीयात नेले असता मी डॉक्टरांना म्हटले की हिला ॲडमीट करा. तर त्या म्हणाल्या की काही आवश्यकता नाही. घरीच बरी होणार व औषधे लिहून दिली. पाहिलात ना माळेचा प्रभाव.

त्याचप्रमाणे आणखी महत्त्वाचा अनुभव म्हणजे एकदा माझी आई अतूलला घेऊन आमच्याकडे आली होती. तो आजोळीच असतो. आल्यावर ती सांगू लागली की "सकाळी अतूल झोपेतून रडतच उठला. मला बुवाने मारले असे म्हणत होता. बुवा दाढीवाला होता असेही म्हणत होता. कोणता बुवा रे विचारले तर साईबाबांची मूर्ती दाखवायला लागला." मीही त्याला विचारले तेव्हा घरातली साईबाबांची कॅलेंडर दाखवू लागला. म्हणत होता की, "हयाच्या हातात डबा होता. त्याने डबा काढून मारला. हा मटन खातो." व तेव्हापासून त्याला चालू असलेली सर्व औषधे बंद झाली व त्याचे वजन वाढून तब्येतही बरी झाली आहे. त्याचे सर्व आजारपण तेव्हापासून निघून गेले आहे.

त्याचप्रमाणे गेल्या महीन्यात (२५ जून) ला खूप पाऊस पडला होता. तेव्हा सकाळी ८.३० पासून आमच्याही खोलीत खिडक्याद्वारे पाणी यायला लागले तसेच छतावरूनही गळायला लागले. श्रद्धाही सतावत होती. म्हणता म्हणता पाऊलभर पाणी साचले व किचन टेबल व कपाटाच्या खाली जायला लागले. पिळून काढीन म्हटले तर श्रद्धा खाली उतरायलाच मागत नव्हती. शेवटी जावेकडे ठेवून आले. ती तिकडे रडत होती व घरात मला रडू यायला लागले. कारण काढावे तितके जास्तच पाणी साचत होते. शेवटी साईंनाच विनवणी सुरु केली, आणि खरच तेव्हा साफ पाणी पुसून घेतल्यानंतर पुन्हा पाणी पुसायची आवश्यकता भासली नाही. बाहेर पाऊस कमी अधिक जोराने पडतच होता. पण मला मात्र पुन्हा पुसायची पाळी आली नाही. याप्रमाणे साई माऊलीने या लेकीचे त्रास कमी केले.

साईअध्यायातील चरणाप्रमाणे –

**ऐसा हा साई दयेचा पुतळा । तयासी भक्ताचा अति जिव्हाळा ।**
**लेकुरा जैसा आईचा कळवळा । किती मी प्रेमळ गाऊं त्या ।।**

श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय ।।

# श्री साईबाबांचा चमत्कार व कृपालोभ

**श्री विहार वि. राखुंडे**
डब्ल्यु ३/१, बजाज ऑटो कॉलनी
आकुर्डी, पुणे - ३५.

श्री साईबाबा आपल्या भक्तांमधे जवळीक कशी तयार करतात याचा अनुभव मला आला तो असा.

सुरवातीला मी कंपनीच्या होस्टेलवरच राहायचो. आमचे होस्टेल हे कंपनी कॉलनीमधेच आहे. गेल्या वर्षी कॉलनी गणेश मंडळाची शिरडीला ट्रीप निघाली होती. शिरडी ट्रीपविषयी कळताच मी लगेच तयार झालो. तसेच होस्टेलवरचे काही विद्यार्थीही माझे सोबत होते. सर्वांचे पैसे भरून मी नावे नोंदविली. ट्रीप गुरुवारी जाणार व बस सकाळी ४.३० ला ठरलेल्या ठिकाणावरून सुटेल अशी सूचना आम्हास पैसे भरते वेळी देण्यात आली होती. गुरुवार उद्यावर आला होता व उद्या सकाळी ४.३० ला उठायचा प्रश्न माझे समोर उभा झाला. कारण त्यावेळी माझेकडे अलार्म घडयाळही न्हवतं. मी विद्यार्थ्यांना मला सकाळी उठवून द्या  अस बोललो व त्यावर ते कबुलही झाले होते. मी रात्री झोपी गेलो परंतु बाबांच्या

दर्शनाच्या ओढेने झोप अर्धवटच होती. सकाळी १.०० लाच झोप उडाली होती. परंतु इतक्या लवकर उठून काय कराव या विचारानं बिछान्यावरच पडून होतो. इतक्यात सकाळी ३.३० च्या दरम्यान दारावर 'थाप' पडली व विहार - विहार उठतोस ना ! असा आवाज ऐकू आला. मी उठलो दार उघडून बघतोय तो कुणीच नाही. विद्यार्थी उठायचे होते. त्यांनाही शेवटी मीच उठवल. कुणासही विचारावं तर कुणीच म्हणेना की, मी तुम्हास उठवल म्हणून. तशी ती हाकही माझ्याकरता अनपेक्षीतच होती. शेवटी स्नान, पूजा आटोपून बस स्टॉपवर आलो व तेथेही परत सर्वांना विचारल परंतु मी तुम्हास उठवल नाही हेच उत्तर प्रत्येकांकडून मिळत होत. शेवटी एकच उत्तर शिल्लक होत ते मनाशीच समजून घेतल की, आपले बाबाच सकाळी आपणास उठवायला आले होते. व खरोखरच या चमत्कारापासून माझी श्रद्धा अधीकच वाढत गेली.

नोकरी मिळाल्यानं नोकरीचा प्रश्न तर सुटला होता. परंतु माझी आर्थिक परिस्थिती मध्यम वर्गाची असल्याने पुण्यात राहायचा प्रश्न माझे समोर फार बिकट होता. माझ मुळच गाव यवतमाळ (विदर्भ). होस्टेल मिळाल्यानं सुरवातीचा माझा प्रश्न सुटला होता. परंतु किती वेळ होस्टेलची मुदत वाढवून मागायची व समजा नाही मिळाल्यास काय ? आईची तब्येत ? असे काही प्रश्न नेहमी माझ्यासमोर घोंगावत असे. शेवटी एक दिवस मी बाबांजवळ माझी अडचण बोललो व नंतर मी माझ्या साहेबांना वरील अडचण सांगितली, व जागे विषयी बोललो. त्यांनी माझी अडचण समजावून घेतली परंतु जागे करता येणाऱ्या अडचणी त्यांनी मला सांगितल्या त्यावर मात्र माझा पूर्ण धीर खचला. तशा त्या अडचणीही उघड होत्या. "आपण प्रयत्न करूया." या त्यांच्या वाक्याने मात्र मला धीर आला. पुढे काही दिवसांनी साहेबांनी कॉलनी सोडल्यावर, "मी होस्टेल बघतो, मला जागा मिळावी असा अर्ज केला. सुदैवानं माझ्या खात्यातील कोणीही अर्ज केला नव्हता. तसेच त्याकरता येणाऱ्या अडचणी वेळोवळी बाबा सोडवत गेले. अर्थात त्याकरता माझे प्रयत्नही चालू होते, व शेवटी दिवाळीपूर्वी मला जागा मिळाली. माझा मोठा प्रश्न दूर झाला. याला श्री बाबांचीच कृपा. सोबत मी हॉस्टेल बघतो आहे. गेल्या २ वर्षापासून मी हॉस्टेल बघतो आहे पण आजपर्यंत कुठल्याही प्रकारची अडचण बाबांनी येऊ दिली नाही व यापुढेही बाबांचा कृपाहात माझे पाठीशी असल्याने येणार नाही याची मला खात्री आहे. तसेच आजपर्यंत मी हाती घेतलेली कामे व्यवस्थित पार पडतात. याला बाबांचीच कृपा. अशा या कृपावंत बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम व अशीच त्यांची कृपादृष्टी सदैव माझे पाठीशी राहो हीच त्यांचे चरणी प्रार्थना.

# " प्रचिती "

**सौ. निर्मला चि. राजे**
लीला भुवन, राजारामपुरी
७ वी गल्ली, कोल्हापूर

हा अनुभव कथन करताना माझे मन आनंदाने भरून येत आहे. श्री साईबाबा प्रत्येक भक्ताला कशी प्रचिती देतात व त्यांचे संकट निवारण करतात हे मी स्वतः अनुभवले आहे.

आमची धुळयाहून मुंबईला बदली झाली. इतर गावी बदली नंतर आम्हाला ऑफिस तर्फे निवास स्थाने मिळत असत. पण मुंबईमध्ये अेक स्थानिक व अेक बदली होऊन आलेला कर्मचारी असा नियम निवास्थाने देण्याबाबत आहे. मुंबईला बदली झाल्यावर आम्ही जागेबाबत शोधाशोध करू लागलो. कोठेही जागा मिळण्याची शक्यता नव्हती. मुंबईला जागा मिळणे म्हणजे नशिबाचीच परीक्षा. मुंबईला आल्यावर आम्ही अेका लॉजमध्ये उतरलो. पण लॉजमध्ये असे किती दिवस राहणार? हे ऑफसला गेल्यावर माझी दुपारी घर शोधण्याची मोहीम असावयाची. मध्यंतरी आम्ही महिनाभर अेका ठिकाणी पेईंग गेस्ट म्हणून राहीलो. त्या बाई फारच चांगल्या स्वभावाच्या. त्यांच्याकडे पण किती दिवस राहणार. अेके दिवशी आम्ही दोघे ठाण्याला गेलो आम्हाला असे कळले की अेका को. ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये अेक ब्लॉक रिकामा आहे तो कसा मिळणार, त्याच्यासाठी किती डिपॉझीट भरावे लागेल. असे अनेक प्रश्न डोळयापुढे उभे राहिले.आम्ही सरळ त्या ब्लॉकच्या मालकांना भेटलो आणि आमची अडचण त्यांना सांगितली. त्यांनी आम्हाला कोणतीही अट न घालता ५०० रु. डिपॉझीट घेऊन ब्लॉक राहण्यास दिला. आमचा आनंद गगनात मावेना कारण मला बऱ्याच जणानी सांगितले होते की मुंबईत तुम्हाला राहण्यास जागा मिळणे फारच कठीण आहे.परंतु हा ब्लॉक मिळण्यास आम्हाला कोणताही त्रास पडला नाही.

खरोखरच ही सर्व बाबांचीच किमया होती. त्या नंतर आम्हाला ऑफीस तर्फे अती चांगला ब्लॉक मिळाला. नोकरी निमित्ताने ज्या ठिकाणी बदल्या झाल्या त्या सर्व ठिकाणी चांगली निवासस्थाने मिळत गेली, व बाबांची कृपेची प्रचिती जाणवली. त्यामुळे माझे प्रत्येकाला सांगणे आहे. श्रद्धा व सबुरी हया दोन गोष्टीवर नितांत विश्वास ठेवून श्री बाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवल्यास ते प्रत्येक अडचणीतून भक्ताची सुटका करतात.

श्री बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम असून मी त्यांच्या चरणी लीन आहे.

# मातृपद लाभले

**सौ. शुभांगी शिवराम कदम**
३/ए, कमलवन को. ऑ. हौ. सोसायटी,
कांदिवली (प.), मुंबई ४०० ०६७.

गेल्या वर्षी मी बाबांना प्रार्थना केली की मला लवकर चांगला मुलगा होऊ दे मी माझे पति व मुलासमवेत शिरडीला तुमच्या दर्शनाला येईन. मी रोज रात्री झोपण्यापूर्वी बाबांची उदी त्यांच्या पायाला (फोटोमधल्या) लावून पाण्याबरोबर पोटात घेत असे. बाबांची कृपा येवढी की लगेच त्याच महिन्यापासून मला दिवस राहिले. दिवस राहिले तरी मी प्रार्थना व उदी घेणे बाळंत होई पर्यंत चालूच ठेवले. जोडीला रामरक्षा देखील माझ्या पतिच्या सांगण्यावरून वाचू लागले.

सातव्या महिन्यात मी हॉस्पीटलला नाव घातले. १५-१५ दिवसांनी दर शनिवारी चेक-अप साठी जाऊ लागले. आठव्या महिन्यात डॉक्टरांनी सांगितले की मुलाचे डोके वरच्या बाजूस आहे व बहुधा मुल पायाळू होईल. त्यासाठी शस्त्रक्रिया करावी लागेल. नववा महिना संपायच्या वेळेला डॉक्टरांनी क्षारिण फोटो काढायला सांगितला. त्यात मुलाची वाढ पूर्ण दाखवली होती. व पाय खालीच होते. मंगळवार दिनांक ८ जानेवारी १९८५ रोजी मी एक्सरे डॉक्टरांना दाखवला व डॉक्टरीणबाईने सांगितले की मूलाची वाढ पूर्ण झालेली आहे तेव्हा कधी ऑपरेशन करायचे ते सांगा. गुरुवार/शुक्रवारला ॲडमीट हो. दुसऱ्या दिवशी ऑपरेशन करू. मी ताबडतोब गुरुवारी सांगितले. माझ्या मनात गुरुवारी बाळंत व्हावे असे होते. गुरुवारी (त्या दिवशी संकष्टी चतुर्थी होती) सकाळी मी दोघे भाऊ व वहिणी बरोबर हॉस्पीटलमध्ये गेले. माझे सासरे व पति आधीच आलेले होते. घरून निघताना माझ्या मनात गुरुवारीच ऑपरेशन व्हावे असे फार वाटत होते. देवाला नमस्कार केला व प्रार्थना केली की सर्व व्यवस्थित पार पाड.

सकाळी हॉस्पीटलमध्ये ॲडमीट झाल्यावर थोडयाच वेळात माझी डॉक्टरीण बाई राऊंड घेताना माझ्या रुम मध्ये आली. माझ्याबरोबरची इतर माणसे माझ्या रुममध्येच होती. डॉक्टरीणबाईने आल्या आल्याच विचारले की तुझे आज ऑपरेशन केले तर चालेल का ? कारण दूसरी जुळयाची केस होती.ती तिला दुसऱ्या दिवशी घ्यायची होती. मी ताबडतोब आनंदाने हो म्हटले व त्याच दिवशी संध्याकाळी माझे ऑपरेशन झाले, व मला छान मुलगा झाला. आम्हा सर्वांना हया गोष्टीचा फारच आनंद झाला. आता बाबांना मी सांगितल्याप्रमाणे शिरडी भेट देखिल लवकर होवो, व श्री साईबाबांची अशीच कृपा आम्हा सर्वांवर नित्य असू दे हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

# अखेरीस बॅग सापडली

श्री. विनायक गो. शिंदे
१७१/४७९३ पंतनगर
घाटकोपर (पूर्व) मुं. ७५

मी साईबाबांचा सर्वसामान्य भक्त आहे. एकदा मी व माझा मित्र "शिरडीके साईबाबा'' हा चित्रपट पहायला गेलो होतो. चित्रपट खरोखरच सर्वांग सुंदर होता. तो मला मनापासून आवडला; आणि तेव्हा पासूनच माझ्या मनात बाबांबद्दल निस्सीम भक्ती उत्पन्न झाली. ती उत्तरोत्तर वाढत गेली. थोडीसी चित्रकला अवगत असल्यामुळे बाबांचा मोठा फोटो काढून तो घराच्या दर्शनी भागी लावून नित्यनेमाने साईनाम व दर्शन घेऊ लागलो. उद्देश एवढाच की माझ्या सारख्या गरीब, होतकरु, नोकरदार तरुणावर - त्याच्या घरादारावर त्यांची सावली राहून घरात कोणतेही विघ्न न येवो. बाबांच्या कृपेने आजतागायत कुठलेही विघ्न किंवा संकट माझ्यावर आलेले नाही. परंतु बाबांच्या कृपाप्रसादामुळे मी एका बिकट संकटातून कसा सहीसलामत बाहेर पडलो त्याची ही सत्य घटना.

दादरच्या एका हॉलमध्ये १० जुन ८४ ला सकाळी १० च्या मुहूर्तावर माझे लग्न लागायचे होते. त्याप्रमाणे १० तारखेला आम्ही म्हणजे मी वर लहान बहिण, वहिनी व मोठया बहिणीचे यजमान सर्व सामान सुमान घेऊन टॅक्सीने दादरला निघालो. योग्यवेळी टॅक्सी हॉलवर पोचली. आम्ही सर्वजण पाहुणे मंडळीचे आगत - स्वागत स्वीकारीत हॉल मध्ये अवतीर्ण झालो. आम्ही सर्वजण स्थानापन्न झाल्यावर १०-१५ मिनीटे झाली असतील नसतील तोच माझी बहिण जवळ जवळ ओरडलीच 'आपली मोठी सूटकेस सामानात दिसत नाही' त्या बरोबर सगळयांच्या तोंडचे पाणी पळाले. कारण त्या सूटकेस मध्ये वराचा वेष, वधूची साडी, दागिने व लग्नाविधीसाठी लागणाऱ्या जवळ जवळ सर्वच वस्तू होत्या, सुमारे सात आठ हजाराचा ऐवज होता. टॅक्सीतून उतरताना एवढी मोठी सूटकेस गाडीच्या पाठच्या डिकीत धांदली मुळे म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा ती बॅग तशीच राहून गेली होती. ड्रायव्हर प्रामाणिकपणे मीटरच्या प्रमाणे पैसे घेऊन दुसरी सवारी शोधण्यासाठी केव्हाच निघून गेला होता. बरे कोणी हुशारीने त्या टॅक्सीचा नंबरही टीपून घेतलेला नव्हता. सगळयांची एकच धावपळ उडाली. दोन्ही पक्षांकडील वऱ्हाडी माणसांच्या चेहऱ्याचा आनंदी रंग पालटुन भकास दिसायला लागला. मी वर असल्यामुळे माझी मन:स्थिती कशी झाली असेल याची कल्पना न केलेली बरी. जो तो असहाय्य होऊन माझे सांत्वन करायला लागला. मी स्वत: टॅक्सीकरून वेडयासारखा दादरभर त्या ड्रायव्हरची टॅक्सी कुठे दिसते का पाहायला लागलो. मी हतबुद्ध होऊन साईबाबांची प्रार्थना केली की 'बाबा, वैऱ्यावरही येऊ नये अशी

वाईट वेळ माझ्यावर आली आहे. त्यातून आता तुमच्या शिवाय मला कोण तारणार, माझ्या भक्तीची कसोटी आहे.' शेवटी त्या गदारोळात अत्यंत विचित्र मनस्थितीत भटजींनी लग्न कसेबसे उरकून घेतले. लोक आइसक्रीम खात होते पण सर्व हॉलभर उदासिनतेची दाट छाया पडलेली दिसत होती. शेवटी लोक अहेर द्यायला लागले. मी तर अक्षरशः खोट खोट हास्य करीत अहेर स्वीकारीत होतो. खरे तर माझ्या डोळयांवाटे कधी अश्रु येतील व ओठातून हुंदका फुटेल याची शाश्वती नव्हती. इतक्यात माझा मित्र श्री. मनोहर महाडिक हा जवळ जवळ आनंदातिशयाने किंचाळतच दादरावरून वरती आला, 'विनायक तुझी बॅग मिळाली. तो टॅक्सी ड्रायव्हर आला आहे.' अपार आनंदामुळे माझ्या ओठातून शब्द फुटेनात. मी मनातल्या मनात म्हणालो, 'बाबा मी तुमच्या कसोटीत कदाचित उतरलो असणार. इतक्या लांबून एका सर्वसामान्य भक्ताने केलेली प्रार्थना तुम्ही ऐकलीत आणि संकटातून मला वाचवलंत, तुमचे हे ऋण सात जन्मी फिटणार नाहीत. असा हा बाबांच्या अलौकिक शक्तीचा पडताळा याची देही याच डोळा अनुभवायला मिळाला. कर्मधर्म संयोगाने पत्नीही साईभक्त लाभली. तिच्या माहेरच्या सर्व व्यक्तींची साईबाबांवर अनन्य साधारण भक्ती आहे. माझ्या मनातली बाबाबद्दलची श्रद्धा लाखो पटीने वाढलेली आहे.

# बाबांच्या कृपेने बहिणीला बरे वाटले

**श्री प्रकाश दत्ताराम यार्दी**
प्लॉट नं. ६०४, फेज टु, सतुवाचारी,
वेल्लोर, तामिलनाडू ६३२ ००९.

**।। शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी ।।**

आपले हे वचन श्री साईनाथांनी आपल्या अनेक भक्तांच्या बाबतीत खरे करून दाखविले आहे, व त्याच वचनाची प्रचिती त्यांनी आम्हाला पण दिली.
माझी वडिल बहिण सौ. अर्पणा नाबर गेले वर्षभर मूत्रपिंडाच्या विकाराने आजारी होती. मार्च १९८५ मध्ये तिच्यावर मुत्रपिंड रोपणाची शस्त्रक्रिया झाली. त्या अगोदर जवळ जवळ नऊ महिने ती डायेलेसीस घेत होती व त्यावेळी फक्त श्री साईनाथांच्या कृपेचाच आधार होता. ऑपरेशन पण त्यांचेच कृपेने व्यवस्थीत पार पडले.

ऑपरेशन नंतरचे पहिले दोन महिने तिला थंडी वाजून ताप येवू लागला. ती बाबांचे उदीचे नियमित सेवन करत असे व ती मस्तकावर लावताच थंडी वाजणेचे थांबत असे. ताप साधारण एक ते दोन तास रहात असे व मग दिवसभर सर्व नॉर्मल. डॉक्टराना पण तापाचे कारण समजेना सर्व क्षकिरण व रक्ताच्या सर्व तपासण्या झाल्या पण तापाचे निदान होईना व त्यातच एके दिवशी सकाळी थंडी वाजून ताप भरला तेव्हा ताप १०५ होता. त्याचबरोबर किडनी पण व्यवस्थीत काम करत नाही असे डॉक्टराना आढळून आले. त्यांनी लगेच हॉस्पीटलमध्ये ॲडमीट होण्याचा सल्ला दिला.

डॉक्टरांनी सर्व प्रथम माझे वहिणीला ॲंटी रिजेक्शनचे इंजेक्शन दिले पण त्याच बरोबर किडणी रिजेक्ट होणेची शक्यता असलेचे पण बोलून दाखविले. आम्हाला तर काहीच सुचेनासे झाले घरातील आम्ही सर्वच जण साईभक्त असलेने त्यांचीच प्रार्थना सुरु केली व आम्हांला संकटातून सोडव असे विनविले.

शेवटी डॉक्टरानी माझ्या बहिणीच्या मूत्रपिंडाची बायोप्सी करणेचे ठरविले जर किडनी चांगली असेल तर ट्रिटमेंट देता येईल व जर नसेल तर आम्हाला ती काढून टाकावी लागेल असे ते म्हणाले. मी परत श्री साईनाथांचे चरणी धाव घेतली व मागणी केली देवा माझ्या बहिणीचा किडनी बायॉप्सीचा रिपोर्ट नॉर्मल येवू देत.

अखेर बायोप्सी केली त्याचा रिपोर्ट पण नॉर्मल आला आम्हाला सर्वांना हायसे वाटले. कारण एक मोठे संकट टळले होते.

माझे बहिणीचे वाढलेले रिपोर्टस् पण हळूहळू खाली येत आहेत तसेच तापपण कमी झालेला आहे. ही सर्व त्या श्री सद्गुरु साईनाथांचीच कृपा. त्यांचेच कृपेने माझे बहिणीला अचानक गुरुवारी डिस्चार्ज मिळाला व ती हॉस्पीटल मधून घरी आली.

जर आपण खऱ्या श्रद्धेने व मनाने साईचरणी धाव घेतली तर श्री साईनाथ आपल्या भक्ताला सर्व संकटातून बाहेर पडणेस मदत करतात. त्याकरिता मात्र हवी 'श्रद्धा व सबुरी''.

अशा या सद्गुरु श्री साईनाथाना आमचे कोटी कोटी प्रणाम.

# बाबा भक्तांच्या इच्छा पूर्ण करतात

**श्री. भ. रा. सोडये**
७, 'माया' ३३, सुंदर नगर,
कालिना मुंबई ९८.

प. पू. साईबाबांबद्दल आमच्या कुटुंबातील सर्वांना फार प्रेम आणि श्रद्धा आहे. साईमंदिरातील रोजच्या आरतींची आणि 'साईदरबार' वगैरे साईस्तुतीच्या कॅसेट्स् आमच्या घरात दिवसातून केव्हाना केव्हा तरी वाजत असतातच. त्या शिवाय आमच्या मनाला शांती मिळणे कठीण होऊन बसले आहे.

गेल्या गुरुपौर्णिमेची (ता. १२ जुलै १९८४) गोष्ट आहे. आमचा टेपरेकॉर्डर दोन दिवसांपूर्वी अचानक बंद पडला होता. दोन महिन्यापूर्वी १२० रुपये खर्च करून तो दुरुस्त करून घेतला होता टेपरेकॉर्डरचे काहीच ज्ञान नसून सुद्धा मी तो चालू करण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत होतो. त्यातील विजेचा पुरवठा सुद्धा बरोबर होत होता परंतु टेपरेकॉर्डर चालू होण्याचे काहीच लक्षण दिसेना. शेवटी निराश होऊन तो टेपरेकॉर्डर नकोसा झाला. त्यातच गुरुपौर्णिमेच्या दिवशी श्री साईबाबांच्या आरत्या वगैरे काहीच ऐकता येणार नाही. म्हणून आम्ही खूप नाराज झालो होतो. सर्वात जास्त नाराज झाली होती ती माझी पत्नी सौ. मंदाकिनी.

मी सकाळी ऑफीसला निघून गेल्यानंतर तिने श्री साईबाबांची उदी घेऊन त्या टेपरेकॉर्डरला लावून साईबाबांकडे प्रार्थना केली आणि सांगितले. "बाबा, आज गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी तुमच्या आरत्या ऐकू शकत नाही हे माझे दुर्भाग्य नाही का ? जर तुमच्यावरील आमच्या श्रद्धेने आणि तुमच्या कृपेने आजच संध्याकाळपर्यंत हाच टेपरेकॉर्डर आपोआप चांगला वाजून देत.

त्यानंतर मी रात्री ९।। वाजता शेवटचा प्रयत्न करून पाहिला. परंतु टेपरेकॉर्डर रुसून बसला होता तो बोलायला तयार होईनाच. शेवटी माझा थोरला मुलगा अरुण वय वर्षे १६. (त्यालासुद्धा आमच्याप्रमाणे टेपरेकॉर्डरचे ज्ञान शून्य) मला म्हणाला, 'बाबा, मी पाहतो प्रयत्न करून.' मी म्हणालो, ठीक आहे. त्याने सुद्धा दोन चार वेळा सर्व बटने दाबून पाहिली. आणि काय आश्चर्य– गेले तीन दिवस बंद पडलेला टेपरेकॉर्डर चांगला वाजू लागला. आमच्या आनंदाला सीमा राहीली नाही. त्यावेळी रात्रीचे ठीक १० वाजलेले असल्यामुळे आम्ही शेजारती ऐकता ऐकता श्री साईंशी एकरुप झालो होतो. बाबा आमच्या हाकेला धाऊन आले आणि आमची इच्छापूर्ती करून आम्हाला आणखी एक अनुभव दाखवून दिला. याबद्दल धन्यता वाटली. तेव्हापासून तो टेपरेकॉर्डर फार चांगला वाजत आहे.

श्री साईनाथांची महती सांगावी तेव्हढी थोडीच.

# सात दिवसात ताई घरी आली

**विमल देसाई**
२ झेलम, कैटरिंग कॉलेज समोर
वीरसावरकर मार्ग, दादर २८

साईबाबा भक्ताना नेहमी प्रचिती दाखवितात. भक्तांना हृदयापासून मारलेली हाक नेहमी ऐकतात. संकट निरसनासाठी धावून येतात. मला त्याचा अनुभव आला. भक्तगणांनी हा अनुभव वाचावा हयासाठी हा पत्र प्रपंच.

माझ्या बहिणीस अचानक पक्षघात झाला. तिला ताबडतोब अती काळजी विभागात ठेवण्यात आले. नंतर चार दिवसांनी तिला जनरल वॉर्डमध्ये आणले. तेव्हा तिच्या जीवावरचा धोका टळला होता. परंतु ताईला कसलेच ज्ञान होत नव्हते. ती येणाऱ्या जाणाऱ्याना ओळखत नव्हती की कोणाशी काही बोलत नव्हती. डॉक्टरांनी तिला दिड-दोन महीने हॉस्पीटलमध्येच ठेवावे लागेल असे जेव्हा आम्हाला सांगितले तेव्हा आम्ही फारच काळजीत पडलो. तेव्हा मी साईबाबांच्या चरणी अशी प्रार्थना केली की, "ताई सात दिवसात घरी आली पाहिजे. आणि काय आश्चर्य !

साईबाबांच्या कृपेने नंतर अशा घटना घडल्या की ताई सात दिवसात घरी परतली.

त्याचे असे झाले की त्या हॉस्पीटलच्या जनरल वॉर्डमध्ये ताईच्या बाबतीत हलगर्जीपणा घडू लागला. त्या दिवशी ताईच्या सोबतीला तिची सून होती. ताईचे पोट दोन दिवस साफ झाले नव्हते. म्हणून सूनेने तेथील डॉक्टरांची परवानगी घेऊन सिस्टर्सना एनिमा द्यावयास सांगितले परंतु याही बाबतीत कामचूकारपणा झालेला सूनेला खटकला. खर म्हणजे त्याही अगोदर अशाच हलगर्जीपणाच्या घटना घडल्या होत्या. शिवाय सिस्टर्स नावालाच रुग्णाची सेवा करत. ताईला 'पॉट' (Pot) देण्यापासून कापूस आणण्यापर्यंत सर्व कामे ताईजवळ हजर असणाऱ्या नातेवाईकालाच करावी लागत. त्या दिवशी एनिमाच्या घटनेवरून सूनेला असे वाटले की 'सर्व कामे आपणच करतो आहोत तर आईंना (ताईला) हॉस्पीटल मध्ये ठेवून तरी काय फायदा त्या पेक्षा आपण त्यांची घरी नेवून अधिक चांगली व्यवस्था करू शकू. तसेच त्यामुळे आईंच्या मनावरचे हॉस्पीटलचे दडपणही कमी होईल.

तेव्हा सूनेने मला विचारले की आपण आईंना घरी आणू या का? माझी भिस्त तुमच्यावर आहे.' मी पण साईबाबांवर दृढ श्रद्धा ठेवून ताईला घरी आणवले.

अशा रितीने ज्या ठिकाणी डॉक्टरांच्या सांगण्यावरून ताईला दिड ते दोन महिने हॉस्पीटलमध्ये काढावे लागणार होते त्या ठिकाणी माझ्या नवसाप्रमाणे ताई सात दिवसातच घरी परतली.

घरी आल्यावर माझ्या डॉक्टर भाच्याने व डॉक्टरकी शिकणाऱ्या भाची ने ताईला ताब्यात घेतले व साईबाबांच्या कृपेने हॉस्पीटलमधील दिवसात न झालेली सुधारणा दोन चार दिवसात ताईत दिसून आली.

साईबाबांची जशी माझ्यावर कृपा झाली तशीच सर्वांवर होऊ दे ही प्रार्थना.

# भक्तांची इच्छा पूर्ण करणारे श्री साईबाबा

**सौ. जयश्री जनार्दन घाग**
मिलाप अपार्टमेन्ट
मालाड (प.) मुं. ६४.

२५ जुलाई १९८५ चा दिवस होता. त्या दिवशी मी व माझे यजमान शिरडीला बाबांचे दर्शनास १४ ऑगस्टला जाण्याचा बेत ठरवित होतो. आमची गाडी दुरुस्तीसाठी गेली असल्याने शिरडीला एस.टी. ने जाण्याचा बेत ठरविला. त्यानंतर ३० जुलाई रोजी माझे मानलेले दिर शिवाजी पवार जे भिवंडी येथे श्री. विनायक पाटील यांच्याकडे गाडी चालकाचे काम करतात. ते आमच्या घरी दुरुस्तीला दिलेल्या गाडीबद्दल सांगण्यास आले होते. तेव्हा मी त्यांनाही आमच्या बरोबर शिरडीला येण्यास सांगितले व त्यांनी ते मान्य केले. त्यांनी श्री विनायक पाटील यांचेकडे १४-८-८५ पासून चार दिवसांची रजा मागितली. तेव्हा पाटील यांनी सदर रजा कशासाठी पाहिजे हे विचारले. माझ्या दिराने सांगितले की, मालाडच्या भावाबरोबर एस.टी. ने शिरडीला जात आहे. एस.टी. ने जाणार हे समजताच श्री. पाटील यांनी आमचे घरी दूरध्वनी केला, व मला सांगितले की तुम्ही माझी गाडी घेवून शिरडीला जा. मी म्हटले यजमानांना विचारून मग तुम्हाला कळविन. त्या प्रमाणे मी यजमानांच्या कचेरीत दूरध्वनीवरून संपर्क करून सर्व हकीकत सांगितली. ते म्हणाले अग साईलीला अगाध आहेत. मी सकाळी तिकीटा आरक्षणासाठी गेलो होतो. तेथे मला समजले की ११ ऑगस्ट पासून एस.टी. कामगार बेमुदत संपावर जाणार आहेत. म्हणून मी तिकीटे काढली नाहीत. श्री. पाटील यांनी जर गाडी दिली नसती तर त्यावेळेस आमचे शिरडीला जाणे झाले नसते, आणि अशी त्या साईमाऊलीने शिरडीला जाण्याची आमची सोय केली. त्या साईमाऊलीस आम्हा सर्वांचे कोटी कोटी प्रणाम.

# बाबा धावून आले ना !

**श्री. प्रकाश महादेव टेमकर**
मु. पो. पोयनाड, ता. अलिबाग,
जि. रायगड

चार ऑगस्टला आमच्या आईला संध्याकाळी थंडी भरून ताप म्हणून आला. दुसऱ्या दिवशी संडास सुरू झाले. त्यामुळे कमालीची अशक्तता आली. स्थानिक डॉक्टरांचे उपचार सुरु होतेच. पण गुण अजीबात येत नव्हता. मी बाबांची उदी लावीत होतोच. दोन दिवसांनी आईची अवस्था विचित्रच झाली. बोलणे बंद झाले. नजर साफ अनोळखी झाली. खाणे पिणे बंद झाले.

शेवटी डॉक्टरांनी पनवेलला खाजगी हॉस्पिटलमध्ये नेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार स्पेशल टॅक्सी केली आणि आईला पातळ बदलविण्यासाठी नुसती हाताला धरून बायकांनी अुभी केली तोच तिला विलक्षण झटका आला. तोंडातुन फेस येऊ लागला, श्वासाची घरघर चालू झाली. आम्हाला वाटले खेळ संपला. घरांत रडारड सुरु झाली. मी बाबांना निर्वाणाची हाक मारली. आईच्या अंगाला उदी चोळणे चालूच होते. तशाच परिस्थितीत अक्षरशः चौघांनी आईला उचलूनच टॅक्सीत झोपविली व पनवेलला नेली. पण दुदैव ! तिथे डॉ. पटवर्धनांचे हॉस्पिटल फुल झाले होते. शिवाय त्यांनी आईची अवस्था पाहुन पेशंटला परत घरी नेण्याचा सल्ला दिला.

पण सोबतच्या मंडळींनी सल्ला न जुमानता आईला मुंबईस 'सुश्रुषा' हॉस्पिटलमध्ये नेऊन अॅडमिट केली. पण तिथेसुद्धा डॉक्टरनी विशेष आस्था दाखविली नाही. कारण पेशंटची अवस्थाच तशी होती. डॉक्टरांनी स्पष्टच सांगितले की आमच्या हातात आहे तेवढे उपचार करूच पण तुमच्या आईला वाचविणे केवळ परमेश्वराधीन आहे. मी 'साईलीला'चा एक अंक व उदीची पुडी आईच्या उशाला ठेवलेलीच होती. आईला सारखा उदी चोळत होतो.

चार दिवस आई बेशुद्ध होती. रक्त, लघवी वगैरे सगळया तपासण्या झाल्या, पण कशातच दोष सापडला नाही. मी सारखा उशाला बसून साई सच्चरितातला ११ वा अध्याय व स्तवनमंजिरीचे पाठ करीत होतो. त्यावेळी बाबांना नवस बोललो की बाबा, आईला हया असाध्य आजारातुन तुम्हीच बरी करा. ती स्वतःच्या पायांनी शिरडीस तुमच्या समाधीच्या दर्शनाला येईल अशी खडखडीत बरी करा. कारण डॉक्टरना अर्धांगवायुचा झटका आल्याची दाट शंका होती.

पण बाबांनी माझी हाक ऐकली. बाबांच्या वारी म्हणजे गुरुवारीच भल्या पहाटे आई शुद्धीवर येऊन इकडे तिकडे पाहु लागली. बोलण्याचा प्रयत्न करू

लागली. पण नंतर भ्रमिष्टासारखी बडबडु लागली. आम्ही पुन्हा निराश झालो. त्यातच आम्ही पति-पत्नी उभयंता बुधवारी शिरडीस गेलो. गुरुवारी बाबांना अभिषेक केला. समाधिवर चढून बाबांकडे आईचे क्षेम - कुशल मागितले. गुरुवारी सांज आरतीच्या वेळी मी बाबांच्या समाधीजवळ उद्विग्न अवस्थेत उभा होतो. मनात आईच्या तब्येतीविषयी विचार होते. एकटक बाबांकडे पहात होतो.

तोच बाबांच्या डोक्यावरील एक गुलाबाचे टपोरे फुल टपकन् बाबांच्या पायापाशी पडले. झाले, बाबांनी माझ्या मानसिक अवस्थेवर कौलच दिला होता की घाबरू नकोस आई बरी होईल. श्रद्धा व सबुरी ठेव.

आम्ही शिरडीहुन परत फिरलो. मुंबईस आलो तोच हॉस्पिटमध्ये गेलो. पहातो तर आई व्यवस्थित बसलेली होती. व्यवस्थित बोलत होती. मनातल्या मनात मी बाबांना वंदन केले. साईकृपेच्या अनुभूतीने मन गहिवरून आले. डोळे आनंदाश्रूने पाणावले. आईला बाबांचा प्रसाद दिला उदी लावली. आता आई बरी आहे. पायांना अजुन सुज आहे व स्वतःहून चालवत नाही. पण पायाला उदी लावणे चालूच आहे. आई पूर्ववत चालू शकेल ही मला खात्री आहे. बाबांची कृपा अविरत अशीच सर्वांवर रहावो, हीच साईचरणी प्रार्थना.

# जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।।

**– श्री. सुनील कांबळी**
दादर मुं. नं. १४

त्या दिवशी शुक्रवार होता. मी माझी प्रॅक्टीकल पूर्ण करून घरी आलो. तेव्हा मला कळले की, आपण जो नेहमी V. C. R. सेट आणत असू तो कोणी तरी अरुणच नाव सांगून चोरीला नेला होता.

अरुण हा माझा मित्र होता. तो नेहमी मला V. C. R. च्या ऑर्डरी देत असे. पण त्यादिवशी काही उलटेच झाले. पोलीस केस करण्यात आली होती. मी मनात विचार केला. आता अरुणला पोलीस पकडून नेणार व त्याला चोप देणार निरपराधी व्यक्तिला शासन होणार होतं. मला त्यावेळेस साईबाबांची आठवण झाली. मी साईलीलेचे अनुभव नेहमी वाचत असे. मी त्याचवेळेस साईबाबांचे स्मरण केले व अरुणला जो डाग लागलाय तो धुवून काढा. अशी बाबांना विनवणी केली.

आणि काय चमत्कार !एका कुप्रसिद्ध माणसांकडून त्या V. C. R. सेटचा पत्ता पोलीसांना लागला व तो V. C. R. सेट मिळाला. त्यामुळे नुकसान तर टळले व माझ्या मित्राच्या अंगावरील डाग धुवून निघाला हे सगळं साई चमत्कारा मुळेच.

# डॉक्टरच्या रूपाने बाबाच आले

**श्री. दिनकर सखाराम वर्दम**
११, कांबळी निवास २ रा माळा
खो. नं. ६, टोपीवाला लेन,
लॅमिंग्टन रोड, मुंबई नं. ७.

ही घटना आहे फेब्रुवारी १९८५ मधील, माझे काका कुडाळ या गावावरून मुंबईला आपली प्रकृती तपासून घेण्याकरीता आले होते. त्यांना मधुमेह व क्षयाचा विकार होता. दोन तीन वर्षापूर्वी मुंबईला येवून जी. टी. रुग्णालयात त्यांनी आपली प्रकृति तपासून घेतली होती व त्यांना बरेही वाटले होते. त्याप्रमाणे परत एकदा तपासणी करण्याकरीता म्हणून ते मुंबईला माझ्या खोलीवर येवून दाखल झाले व जी. टी. रुग्णालयात रोज जावून तपासणी करून घेऊ लागले. जवळ जवळ महिनाभर मूत्र, रक्त, क्षकिरण वगैरे सर्व काही तपासणी ते स्वतःच जाऊन करून येत होते. गोळ्या वगैरे उपचार, आहार चालूच होते. मी माझ्या कामात असल्यामुळे त्यांच्या जवळ फारसे लक्षही दिले नाही. परंतु एक दिवस असा आला की ते जे रात्रौ १० वा. झोपले ते सकाळी ६ वा. उठणारे गृहस्थ दुपारी ११ वाजेपर्यंत उठलेच नाहीत. घरातील सर्व मंडळी कामानिमित्त बाहेर गेली होती व मीही जाण्याच्या तयारीत होतो. एवढयात माझ्या सौ. ने व माझ्या आईने मला बाहेर कुठे जाऊ नकोस तुझे काका बेशुद्ध झाले आहेत जीभ आडवी झालेली आहे डोळे वर फिरलेले आहेत व हालचाल काहीच दिसत नाही. तरी त्वरीत डॉक्टरना बोलव. मी ताबडतोब बाबांना हात जोडून विनंती केली की, 'बाबा आता तुम्हीच मला या संकटातून वाचवा, काकाना बरे वाटू देत. लगेच मी बाबांची उदी पाण्यात टाकून चमच्याने त्यांना पाणी पाजायला माझ्या आईला सांगितले. आईने तो उपाय ताबडतोब सुरु केला बाबांच्या तसबिरीसमोर तुपाचा दिवा लावून माझ्या मोठया मुलाला मी साईसत चरित्रातील १५ वा अध्याय वाचायला सांगितला तो त्याने वाचून पूर्ण केला. तोपर्यंत आमचे फॅमिली डॉक्टर श्री. जोशी आले. त्यांनी एक इंजेक्शन दिले व ४ चमचे साखर घालून आणखी एक कप पाणी पाजायला सांगितले. त्यानंतर साखरेचा चहा द्यायला सांगितले एका तासात एवढया गोष्टी झाल्यावर काका शुद्धीत आले उठून बसले व बोलूही लागले. त्यानंतर त्यांनी जेवणही घेतले. तो पर्यंत आमचे डॉक्टर आम्हाला सांगतच होते की पेशंट सिरीयस आहे 'कोमामधे' जाण्याचा धोका आहे. रुग्णालयात दाखल करावा लागेल. जर हे एका तासात शुद्धीवर आलेत तरच प्रसंग टळेल असे समजा. परंतु माझी श्री साईवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळे रोग्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागणार नाही याची मला खात्री होती व शेवटी झालेही तसेच. एका तासानंतर ते शुद्धीवर येवून उठून बसल्यावर डॉक्टरच म्हणाले की आता भितीनाही. मी बाबांचे मनोमन आभार

मानले. नंतर आमच्या डॉक्टरांनी त्यांना ८ दिवस आपली ट्रीटमेन्ट दिली व १२ तासांचा एस्.टी. चा प्रवास करून ते सुखरूप कुडाळला आपल्या गावी पोहचले. त्यानंतर त्याच दिवशी मी जेव्हा साईचरित्रातील १५ वा अध्याय वाचला तेव्हा मला कळून आले की चोळकरांना बाबांनी कप भरभरुन साखरेचा चहा पाजायला सांगितले होते, आणि तोच उपाय डॉक्टरच्या रुपाने येवून बाबांनी माझ्या काकांना साखर पाजून एका तासात बरे केले.तर असे आहेत आमचे साई परमेश्वर. अशीच कृपा आमचेवर राहो ही साई चरणी प्रार्थना.

●

376

# मंगळसूत्रातील मणी - वाटी मिळाली.

**सौ. प्रतिभा वामन बोडस**
मु. पो. पडेल ता. देवगड जि. सिंधुदूर्ग

मी श्री साईलीला मासिकाची एक वाचक आहे याला कारण सर्वस्वी माझी आईच आहे. तिनेच गेल्या सप्टेंबर पासून परस्पर वार्षिक वर्गणी भरून हा अंक सुरु करून दिला. व तेव्हापासून दरमहा मी या अंकाची आतुरतेने वाट पहात असते. ही प्रेरणा तिला श्री बाबांपासूनच मिळाली असं माझ मत आहे. म्हणून बाबांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम.

विशेष अडीअडचणीना बाबा धावून येतात. याचा मला वेळोवेळी अनुभव आलेला आहे. मासिकातून आलेले लोकांचे अनुभव वाचून मी सुद्धां मनांत लेख देण्याची इच्छा बाळगली. व प्रत्येकवेळी आजचे काम उद्यावर लोटून स्वस्थ बसत असते. परंतु अशी अडचण वेळोवेळी का यावी ?

एकंदा मी झाडांना पाणी लावण्याकरिता जात होते तो दिवस शनिवारचा होता. माझ्या मंगळसूत्रातील एक मणी व एक वाटी पाण्यातच पडली. परंतु ही गोष्ट माझ्या लक्षात आली नाही. वस्तु केव्हा हरवली होती व केव्हा हे कांही केल्या आठवेना मन गोंधळून गेले काही सूचेना अनंताला (गडी) ही गोष्ट सांगितली. त्या त्याला प्रथम थट्टाच वाटली परंतु सत्य घटना त्याला दाखवली. त्याने मंगळसूत्र पाहिल्यावर तो ही आश्यर्चचकीत झाला. शोधावी कुठे काहीच कळेना शेवटी पाटातून शोधत निघाले तो वाटी मला माडाच्या तळीत मिळाली व मणी पुढे पाटात अनंताला मिळाला. मी वस्तू घेऊन ती बाबांच्या पुढयांत ठेवली कारण त्यांच्याच कृपेने ती मिळाली होती.

असेच लहान मोठे अनेक अनुभव मला प्रत्यक्ष आलेले आहेत. तसेच ते अनेक भक्तांनाही येतात. माझी बाबांवर निस्सिम श्रद्धा आहे. बाबा संकट समयी भक्ताला मदतीचा हात देतात. अशीच साईकृपा पाठीशी राहो.

# सुगंधाच्या रूपाने श्री साईबाबा

**सौ. उषाताई मुळे**
पेटकर वाडा,
नारायण पेठ, पुणे ३०

साधारण १९७३ - ७४ मधली ही गोष्ट आहे. त्या वेळी मी शिरडीला श्री साईनाथ विद्यालयात शिक्षिका होते व आम्ही (दोघे) माझे यजमान हेडमास्तर होते. त्या वेळी चावडीच्या मागे दोन खोल्या मध्ये रहात होतो. शाळेतील अनेक कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागत होते. त्या वेळी फक्त श्री साईबाबांचा आधार होता. त्या दिवशी असेच कडु अनुभव आले होते. श्री साईबाबा पाठीशी होते मन निर्भय होते.

रात्री एक - दिडच्या सुमाराला मी उठून दुसऱ्या खोलीत पाय टाकला आणि मन आश्चर्याने भरून आले. ती खोली सुगंधाने भरून गेली होती. त्या सुगंधाचे वर्णनही करणे शक्य नाही. फक्त १ मिनिट कमीच परंतु त्या सुगंधाने मनाला आनंद, धैर्य, स्वास्थ, किती वाटले याचे महत्त्व पटविणेही कठीण असे हे आमचे पाठीराखे संकटाला साथ देणारे श्री साईबाबा.

# बाबांची अगाध लीला

**सौ. सुगंधा परशुराम गजरे**
ए/१३, पंकज को. ऑ. हॉ. सोसायटी,
एकसर रोड, (ठाकुर पाखाडी),
बोरिवली (प.) मुंबई नं. ४०० ०९२.

आमच्या कुटुंबातील आम्ही सर्वजण बाबांची भक्ती करतो. दर गुरुवारी बाबांच्या फोटोला हार घालून आम्ही आरती करतो. तसेच नेहमी प्रमाणे गुरुवार दि. १४ मार्च ८५ रोजी सायंकाळी हार घालून आम्ही आरती केली. माजघरांतील मोठ्या तसबीरीला मोठा हार असतो. परंतु हया गुरुवारी हार फारच तोकडा दिला होता हारवाल्याने. माझी मुले मला म्हणाली सुद्धा. आज फुलवाल्याने हार फारच लहान दिला आहे. परंतु संध्याकाळी आरतीची वेळ झाल्यामुळे तो हार तसाच बाबांच्या तसबिरीला चढविला. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी दि. १५ मार्च ८५ ला सकाळी माझे पति ऑफिसला जाताना बाबांना नमस्कार करायला गेले तर हार

थोडा खाली आला होता. आम्हाला वाटले गाठी सैल झाल्यामुळे खाली आला असेल. परंतु नंतर सकाळी ९.०० वा. माझ्या मुली मला म्हणाल्या आई, हार बघ किती वाढलाय आणि बघते तर खरोखराच हार फोटोच्या दिडपट खाली आला होता. माझ्या मोठया मुलीने हाराच्या खाली भिंतीवर खूण करून ठेविली व नंतर सुमारे तासाभराने पुन्हा पाहिले तर हार आणखी वाढला होता व सतत वाढतच होता. तसेच गुरुवारी हार घालल्या नंतर शुक्रवारी जेव्हा हार वाढत आहे हे लक्षात आले तेव्हा आम्ही हारांतील फुले मोजली होती. सोमवारी जेव्हा वाढ होण्याचे थांबले तेव्हा पुन्हा फुले मोजून पाहिली ती ७२ फुले होती व हाराचा आकार पूर्वीपेक्षा जवळ जवळ तिप्पट वाढला होता !! आम्हांला खूप खूप आनंद झाला. बरेच साईभक्तांनी दर्शन घेतले. बाबांची लीला अगाध आहे. भक्ताने भक्तिभावाने वाहिलेले एक फूल देखील मोठया हाराच्या पेक्षा मौलिक आहे. हे बाबांनी आम्हांला हया हाराच्या चमत्काराने दाखविले. अशीच आमच्यावर व सर्व साईभक्तांवर श्री साईबाबांची कृपा राहो अशी मी श्री साई चरणी प्रार्थना करते.

श्री साई चरणी कोटी कोटी प्रणाम.

**नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ।**
**नित्य घ्या प्रचित अनुभवे ।।**

# योगायोग की चमत्कार

**श्री. वासुदेव रा. पवार**
मु. एडगांव, पोस्ट वैभव वाडी
जि. सिधुदूर्ग

श्री बाबांचे प्रथम समाधी दर्शना नंतर जन्मलेला माझा मुलगा चि. प्रसाद वय ४ वर्षे. हा गेल्या डिसेंबर पासून पोलिओने आजारी आहे. त्याला उभे रहाता व चालता येत नाही. त्याला जानेवारीत शिरडीस घेऊन गेलो. त्यानंतर मुंबअीच्या ३ प्रसिद्ध साईभक्तांनी त्याला पाहून हा लौकर चालू शकेल असे सांगून उदी दिली. त्यात मुलुंडच्या साईधामचे परमभक्त श्री. वाडकर बाबा यांनी दर शनिवारी शनिमहात्म्य वाचा असा सल्ला दिला. परंतु मी त्याबाबत २-३ महिने चाल ढकल केली. गेल्या आषाढात एक जाहिरात वाचून मुंबईच्या नवनाथ प्रकाशनकडे म. ऑ. पाठवून एक शिवलीलामृत व एक निवडक दहा स्तोत्रे पाठविणेसाठी कळविले. त्यांचे कडून श्रावणातल्या पहिल्या शुक्रवारी पोस्टाने पुस्तके आली. उघडून पाहतो तर वरच पुस्तकाचे बील. त्यावर निवडक दहा स्तोत्रे व शिवलीलामृत

पाठविल्याचा उल्लेख होता. प्रत्यक्ष पुस्तके उघडून पाहातो त्यात निवडक दहा स्तोत्रे व एक शनि महात्म्य हे पुस्तक पहाताच मला एकदम आश्चर्याचा सुखद असा धक्का बसला. दुसरेच दिवशी पहिला श्रावण शनिवार म्हणून त्या दिवसा पासून वाचनास सुरवात केली. बाबांच्या एका परम भक्ताचे वचन खरे करणे करिता तर बाबांनी ही किमया केली नसावी ना ? कारण मी जरी हेतुपुरःसर विसरलो असलो तरी भक्ताचे तोंडी बोललेले बाबा कसे विसरतील ? माझा मुलगा अद्यापही चालत नाही. तरी माझा पूर्ण विश्वास आहे की ज्या अर्थी बाबांनी ही किमया दाखवून दिली आहे. त्या अर्थी माझ्या मुलास चालते केल्याशिवाय माझी साओ माऊली रहाणार नाही.

माझ्या सारख्या विसराळू जीवास झोपेतून जागे करणाऱ्या माझ्या साई माऊलीस माझे कोटी कोटी प्रणाम.

# मला आलेला अनुभव

**श्री. प्रभाकर गोडबोले**
फडणीसकी गोठ, गणेश बाजार ग्वाल्हेर

ता. १२-८-८५ रोजी माझा मुलगा चि. विशाल वय ४ वर्ष हयास सात आठ दिवसांपूर्वी गोवर निघाला होता. गोवरा नंतर त्यास ताप ही चढला होता त्यामुळे तो अतिशय अशक्त झालेला होता. हयाच अवधीत त्याच्या मानेवर दोन्ही बाजूस फोड व एक गळयाच्या मध्यभागी असे तीन फोड झाले. प्रथमच हया फोडाचा आकार लहान असल्याने पावसाळी फोड म्हणून डॉक्टरी इलाज करवला नाही. पण पहाता पहाता हया फोडाचा आकार खुप वाढला व त्यामुळे त्याला त्याची मानही फिरवण्यास त्रास होऊ लागला त्याला फारच कष्ट होत होते, व रात्रही जागून निघत होती. त्यामुळे आम्हा उभयतांस फार काळजी वाटू लागली पण बाबांवर आमचा पूर्ण विश्वास ठेवून. त्याच्या फोटो कडे पाहून विनंती केली की बाबा उद्या सकाळ पर्यन्त त्याला आराम होऊ दे. बाबांची उदी घरात होतीच ती त्याच्या फोडावर व कपाळी लावली. दुसरे दिवशी म्हणजे ता १३ रोजी फोड़ फुटण्यास सुरवात झाली खूप पू व रक्तही निघू लागले. नंतर डॉक्टरी इलाज ड्रेसिंग, इंजेक्शने वगैरे झाली, व संध्याकाळी तो पहिल्या सारखा मान फिरवू लागला, व पूर्ववत कार्यक्रम सुरु झाले, आता २-४ दिवस डॉक्टरी इलाज चालेल, पण विशेष म्हणजे की बाबांनी आमची हाक ऐकली व मुलास ठीक केले.

# जया मनी जैसा भाव । तयातैसा अनुभव ।

**श्री. उदयकुमार वि. आडविलकर**
मु. पो. वडगाव, सोनार गल्लीजवळ,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

१०-१०-८३ रोजी रविवारचा दिवस होता. त्याच दिवशी माझी असोशियनची टायपिंगची परिक्षा होती आणि त्याच दिवशी मला सकाळपासून ताप, थंडी व डोके दुखी यांचा खुप त्रास होत होता. किती उपचार केले तरी ताप काही उतरत नव्हता. परिक्षेसाठी गेलो असता मला खूपच त्रास वाटत होता. काही केल्या काही सुचत नव्हते. माझी परिक्षा सकाळी ११ वाजता होती. तेव्हा खूप ताप आला मी सरांना भेटलो व माझ्या तब्येती बाबत सांगितले तेव्हा सरांनी मला दुपारी २ वाजता येण्यास सांगितले. मी दोन तास विश्रांती घेतली त्या विश्रांतीमध्ये मी श्री साईबाबांचा धावा केला. त्यांची उदी संपूर्ण अंगाला लावली व त्यांच्या नामाचा जप केला. ती उदी लावल्या. पासून १ तासाच्या आतच माझा थोडा ताप उतरला नंतर औषध घेऊन परिक्षेसाठी गेलो व हा टायपिंगचा पेपर मला खूपच सोपा गेला.

ही साईबाबांची कृपा पाहून मला खूपच आनंद झाला. साईबाबा हे "सबका मालिक है".

# मग जो गाई वाडे कोडे माझे चरित्र माझे पवाडे । तयाचे मी मागेपुढे चोहीकडे उभाच ।।

**कु. शकुन्तला द. भोसले**
एच/१५, आंबेकर नगर
परेल टँक रोड, मुंबई

श्री साईबाबांच्या वचनाप्रमाणे ते सदैव माझ्या मागेपुढे उभे रहातात. ते अनुभव मी लिहीन लिहीन म्हणता म्हणता आता लिहायला घेतले. म्हण आहे संकट काळीच देवाची आठवण येते. पण तरीही श्री साईनाथ कधीही रागवत नाहीत. ते धावूनच येतात, आणि चांगले करण्यासाठीच सर्व करतात. असा माझा विश्वास आहे. बाबा माझे सर्वस्व आहेत. त्यांच्या शिवाय मला कोणाचा आधार आहे? सर्व करते करविते तेच आहेत.

मागे मी मनाने खूप खचले होते पण श्री बाबांनीच मला त्यातून बरे केले. माझा डावा पाय वरून खालीपर्यंत खूप दिवस दुखत होता. मी ...

व तीर्थाने माझा पाय बरा करा. नंतर मी भोपाळला असताना पाय घसरून इतकी वाईट पडले. मला चौघानी धरून आणले. अंगाला घाम सुटला. अर्धवट बेशुद्धच झाले. माझे भाऊ म्हणाले. मी उचलून तुला पलंगावर झोपवतो. म्हटले नको मी चालून बघते. श्री साईबाबांची आळवणी करून उठले व चालत पलंगावर जाऊन झोपले. म्हटले बाबांची उदी आणि तीर्थ द्या, आणि काय चमत्कार एकदम मला धैर्य आले. भावाना म्हटले तुम्ही ऑफीसला ज्जा. मला बरे आहे. मी उठून कपडे पण बदलले. नंतर साईनाथांना म्हटले 'काही मोडलेले हाड सरकलेले नसू दे. आणि एक्सरे काढला तर सर्व ठीक. त्यानंतर एकदा सकाळी मी उठले व बाथरूमला गेले. सर्व झोपलेले. पाय घसरून सपशेल आडवी पडले. उठता येईना सारखा श्री साईनाथांचा धावा सुरु केला. बाबा काही मोडलेले नसू दे. मला परस्वाधीन करू नका. तुमच्या शिवाय माझे कोण बाबा. १५-२० मिनिटे त्या स्थितीत बाबांचा धावा करत पडले होते आणि श्री बाबांचे नाव घेऊन उठले आणि सांगायचे म्हणजे काही दुखले पण नाही. नंतर मला मागे १। महिना डिसेंट्रीचा त्रास झाला. खूप औषधे घेतली. पण बरे वाटे ना. श्री बाबांना म्हटले साईनाथा तुझ्या उदीने व तीर्थाने मला बरे केलेच पाहिजे. मला खूप अशक्तपणा आला होता मन घाबरले होते आणि मला श्री साईनाथांनी बरे केले. तेच सर्व माझी काळजी चिंता दूर करतात. सकाळी उठल्यावर मध्यंतरी व झोपताना त्यांची उदी व तीर्थ मी घेते. माझा पूर्ण विश्वास आहे की बाबाच परब्रम्ह आहेत. दीनांचा दयाळू व मनाचा मवाळू। शिरडीचा श्री साई कृपाळू.

**श्रीसाईलीला**

**श्री साई काव्य बहार विशेषांक**

**१ फेब्रुवारी १९८६ रोजी प्रसिद्ध होईल**

# संकट समयी श्रीसाई

**सौ. सरल काबाडी,**
३ फालगुनी, सरोजिनी रोड,
सांताक्रूझ (पश्चिम).

**संकट समयी मज सांभाळिती ।**
**पुरविती आर्ती साईनाथ ।।**
**किती सांगू तुम्हां बाबांची महती ।**
**ठयी ठयी येती अनुभव ।।**
**चालती संगती हाती धरोनिया ।**
**जीवन हे तयां धरोनिया ।**
**जीवन हे तयां अर्पियेले ।।**
**मज नित्य येई त्यांचा अनुभव ।**
**'सरल' हा भाव धरी चित्ती ।।**

अशा हया, नित्य मला हात धरून चालविणाऱ्या बाबांचे किती अनुभव सांगावे ? अनेक अनुभवातील हा अेक अनुभव आहे.

तेव्हा आम्ही नागपूरला होतो. व माझा ५ वर्षाचा मुलगा वर्ध्याला माझ्या आईवडिलांकडे राहत असे. तेव्हाचा हा प्रसंग! माझे दिर न्यूयॉर्कला जाणार होते. त्यांना निरोप देण्यासाठी आम्ही मुंबईला जाण्याचे ठरविले, त्याप्रमाणे सर्व तयारी झाली. मुलगा वर्ध्याला आम्हाला येअुन मिळणार होता. नागपूर-दादर अेक्स्प्रेसच्या रात्री १० वा. च्या तिकिट्सचे रिझर्व्हेशन झाले व ठरविलेल्या दिवशी आम्ही आमच्या लक्ष्मीनगरच्या घरून रात्री ९ वा. च्या सुमारास स्टेशनवर निघण्याकरीता आमच्या 'कार'मध्ये बसलो. परंतु गाडीत त्याचवेळेस काही बिघाड झाल्यामुळे गाडी सुरूच होत नव्हती. माझ्या पतीने खूप प्रयत्न केला पण गाडी अडूनच बसली. तेथेच १० वाजले. माझ्या पतीना वाटले की, आता स्टेशनवर जाण्यात अर्थ नाही, तेव्हा मुंबईचा बेत रहित करावा. पण माझा प. पू. बाबांवर दृढ विश्वास होता. मी माझ्या पतींना सांगितले की, बाबांच्या कृपेने आपणास गाडी मिळेल व आपण जरूर मुंबईस जाअु. तेव्हा आपण 'अजनी' (नागपूर मधिलच) स्टेशनवर, जे आपल्याला जवळ आहे तेथे जाअु. त्याप्रमाणे माझ्या भावाला ऑटोरिक्षा आणण्यास पाठविले. माझा धांवा व माझ्या पतीचा नकार चालूच होता. तेवढयात आमच्या बाजूला राहणारे सद्गृहस्थ तेथे आले व सर्व परिस्थिती पाहून त्यांनी 'काय झाले ?' असे विचारले. तेव्हा आम्ही त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. घडयाळाकडे पाहून त्यांनीही माझ्या पतीच्या म्हणण्याला दजोरा दिला व सर्व सामान परत घरी ठेवून स्वस्थ झोपावे असा सल्ला दिला. कारण

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गाडी 'अजनी' स्टेशनवरूनही सुटली असणार ? पण माझा बाबांवर अती विश्वास होता. मी सुद्धा जिद्दीलाच पेटले. शेवटी स्त्रीहट्टापुढे मान तुकवून किंवा बाबांच्या प्रेरणेने माझे पती स्टेशनवर येण्यास तयार झाले. त्या सद्‌गृहस्थांनी आपल्या मुलाला स्वतःच्या गाडीत आमचे सामान ठेवण्यास सांगितले व वर हे ही सांगितले की, 'यांना स्टेशनपर्यंत नेऊन सोडून येऊ नको. गाडी गेल्याची खात्री करून परत घेऊन ये.' तेवढयात माझ्या भाचा 'ऑटो' घेऊन आला. त्याला पैसे देऊन आम्ही 'अजनी' स्टेशनवर गेलो. सर्वांची खात्री (अर्थात् मी सोडून) होती परत घरी यावे लागणारच ! अजनी स्टेशनवर फलाटावर जाण्याकरता आम्ही जरा धावतच होतो. टी.सी. ने विचारले, 'कां धावता ?' माझ्या पतीने त्यांना उलट विचारले 'अेकस्प्रेस गेली ना ?' तो म्हणाला 'अेकस्प्रेस आलीच नाही. अर्धा तास लेट आहे. ती नागपूरहूनच सुटते. पण ती लेट होण्याचे कारणच कळत नाही ? मी माझ्या पतीकडे साभिप्राय पाहिले व त्यांनीही डोळयानेच श्री बाबांना मानल्याचे कबूल केले. आम्ही फलाटावर गेलो पण आम्हाला आमचा डबा बघण्याला वेळ नव्हता, कारण तेवढयात गाडी आलीच. आमच्या समोरून जाणाऱ्या अेका डब्यातून 'काबाडी, या डब्यात ये, तुझे रिझर्व्हेशन येथेच आहे,' असे शब्द आले. जाऊन बघतो तर माझ्या पतीच्या ऑफीसमधील त्यांचा मित्र तेथे होता. त्याने नागपूर स्टेशनवरच प्रवाशांच्या यादीत आमचे नांव पाहून वाट पाहिली व गाडीने नागपूर स्टेशन सोडल्यावर टी.सी. ला 'अजनी' पर्यंत आमची जागा कोणालाही न देण्याची विनंती केली. कारण अेक सीट त्याने अेका मारवाडी सद्‌गृहस्थाला देण्याचे कबूल केले होते. मी तर बाबांना गाडी मिळाली तर १.२५ रु. पेढे वाटण्याचे कबूल केले होते. माझा जप सुरूच होता. बाबांचे नाव घेतच मी माझ्या सीटकडे गेले, जेथे ते मारवाडी सद्‌गृहस्थ बसले होते. मला पाहताच ते उठले. मी त्यांना सहज विचारले, 'आपण कोठे जाता ?' त्यांनी उत्तर दिले 'शिर्डी!' ते दोन शब्द अैकताच मात्र माझा स्वतःवरील ताबा गेला व माझ्या डोळयातून अविरत अश्रू झरू लागले. ते गोंधळून माझ्या पतीकडे पाहू लागले. तेव्हा माझ्या पतीने त्यांना सर्व प्रसंग सांगितला. तेव्हा त्या सद्‌गृहस्थाच्याही डोळयातून आनंदाश्रू वाहू लागले व त्यांनी सांगितले की, ते बाबांचे निस्सिम भक्त असून सतत शिर्डीवारी करीत असतात व आता सुद्धा ते स्वतःचा नवस फेडण्याकरीताच शिर्डीला जात आहेत. मी माझ्या पतीना त्यांच्या जवळ १.२५ रु. देण्यास सांगितले, कारण माझा नवस ते शिर्डीलाच फेडतील व प्रत्यक्ष बाबांच्या पुढेच नैवेद्य.(पेढे) दाखवितील. नंतर बाबांच्या अनुभवांचे 'पेढे' अेकमेकांना देत ती रात्र आम्ही साईनंदातच घालविली !

**सांगितले तुम्हा नसे माझे कांहीं ।**
**कर्ता करविता तोचि एक साई ।।**

# डोळयावरची गाठ गेली

**सौ. सरलादेवी रामचंद्र शिंदे**
१५ "हरिकृपा" रुईकर कॉलनी,
कोल्हापूर ४१६ ००५.

"तैसा तैसा पावे मी ही त्यासीं" त्याप्रमाणे बाबा मला पावले. माझा अनुभव असा की माझ्या डाव्या डोळयाच्या पापणीवर वाटाण्या एवढी एक गाठ आली. डोळयांच्या प्रसिद्ध डॉक्टरांना दाखविली. ते म्हणाले हया वयात ही गाठ काढता येत नाही. आता माझे वय पासष्ट आहे. मला मोठी काळजी उत्पन्न झाली. डोळयांची बाब. डोळे आहेत तर सर्व.

मी बाबांना मनोभावे साकडे घातले की बाबा माझी ही गाठ पंधरा दिवसात नाहीशी करा नाहीतर माझी मोठी पंचाईत होईल. मी म्हटले मी तुम्हाला न चुकता अकरा मण्यांचे वस्त्र दररोज घालीन व उदी घालून तीर्थ पायाला लावून घेईन. आणि आश्चर्य म्हणजे माझी ही डोळयाची गाठ पंधरा दिवसात नाहिशी झाली. हा मला अनुभव १९८४ फेब्रुवारी मध्ये आला. खरेच बाबांची लीला अगाध आहे. असेच ते सर्वांना पावोत हीच बाबांच्या चरणी प्रार्थना आहे.

# श्री साईकृपा

**सौ. अर्चना चंद्रकांत तावडे,**
बि. नं. १२६/वृंदावन पॅलेस,
टिळक नगर, चेंबूर : ४०० ०८९.

दिनांक ११.७.१९८५ रोजी संध्याकाळी अचानक माझा उजवा डोळा भयंकर लाल झाला. शुभ्रपटल बुबुळावर किंचित सरकले व ती जागा फुगीर दिसू लागली. पापणी अजिवात मिटता येईना. मी खूपच घाबरले. सर्वांनी मला डॉक्टरांकडे तावडतोब जाण्याचा सल्ला दिला. श्री साईबाबांवर माझी श्रद्धा आहे. मी साईबाबाचा धावा केला. माझा डोळा एक दिवसात पूर्ववत होऊ दे. असे मी साकडे घातले व बाबांना सांगितले "माझा डोळा पूर्ववत करा" दुसऱ्या दिवशी डोळा पूर्ण बरा झाला. अशी ही आपली सर्वांची साईमाऊली आमच्यासाठी नेहमीच धावत येते. मी रोज अंतःकरणापासून बाबांना म्हणते "बाबा असाच आशिर्वादाचा हात आमच्या पाठीवर ठेवा" श्री बाबांची सदैव कृपा दृष्टी सर्व प्राणीमात्रावर राहो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना आहे.

# – साईबाबांची कृपा –

– श्री. शाम बेंदरकर
हातखंबा, रत्नागिरी.

मी प्रथम १९७१ सालात विद्युत मंडळात लिपिक म्हणून नोकरीला लागलो. समाजकार्य करण्याबद्दलची मला प्रथम पासूनच ओढ होती. थोडयाच दिवसात वीजमंडळात कार्य करणाऱ्या एका युनियनचा सभासद झालो आणि मी लगेच समाज कार्य व संघटनेचे कार्याला सुरुवात केली. १९७५ साली मी वीज मंडळातील खाते परीक्षा उत्तीर्ण झालो. म्हणजेच वरिष्ट लिपीकाची बढती मिळण्यास मी लायक झालो होतो. पण त्या त्या जागा शिल्लक नसल्यामुळे मला बढती मिळत नव्हती. असाच एकदा १९७७ साली मी रत्नागिरी येथे काम करीत असताना संघटनेच्या अधिवेशनासाठी धुळे येथे गेलो. धुळयाला जाताना किंवा परत येताना वाटेत शिरडी लागतेच. आम्ही अधिवेशन संपवून परत येत असताना गाडी शिरडीच्या स्टँडवर आल्यानंतर अचानकपणे बिघडली. आम्ही पुण्यापर्यंतचे एस.टी. चे तिकिट काढले होते. मग आम्ही काही प्रवासी लोकांनी कंडक्टरकडे साईबाबांचे दर्शन घेऊन येऊ काय अशी विचारणा केली. आता कंडक्टर साईच्या दर्शनाला परवानगी कशी नाकारु शकेल. मग आम्ही श्री साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी निघालो. कंडक्टरने गाडीचे काम होई पर्यंत तुम्ही दर्शन घेऊन या पण जरा लवकर परत या अशी सुचना केली होती.

मग मी आणि इतर एस. टी. तील प्रवासी साईबाबांच्या देवळाचे आणि तेथील संपूर्ण परिसराचे दर्शन घेऊन आलो. मला ते अतिशय आवडले. साईबाबांकडे पहाताच मला कोण जाणे पण साईबाबा आपल्याला पावतील असे वाटले. मी सहज नमस्कार करून मला खात्यात बढती मिळावी असा नवस बोललो. मी तेथे माझा नवस पुरा झाल्यास असे करीन तसे करीन असे मुळीच बोललो नव्हतो. त्यानंतर परत एस. टी. ने पुण्याला येऊन तेथुन रातराणी रत्नागिरी गाडीने मुक्कामी परत आलो. अगदी अनपेक्षीतपणे यावेळी मला साईबाबांचे दर्शन घडले होते. जणु साईबाबांचे दर्शन घेण्यासाठीच आमची धुळयातुन निघालेली बस शिरडीला बंद पडली होती.

रत्नागिरीत आल्यावर मी परत नेहमी प्रमाणे कचेरीत जायला लागलो. एक महीना गेला असेल नसेल, तर बातमी आली की, वरिष्ट लिपीकाच्या जादा जागा मंजुर झाल्या आहेत आणि माझा बढतीत क्रम लागणार. थोडयाच दिवसात १९७८ साली माझी वरिष्ट लिपीक म्हणून बढतीची ऑर्डर आली. एवढेच नव्हे तर मला पाहिजे होते त्या ठिकाणी म्हणजे कुडाळला पोस्टींगही मिळून गेले. त्यावेळी मला तीव्रतेने 'साईबाबांची' आठवण येत होती. साईबाबांनी अनेकांच्या

मनोकामना पुऱ्या केल्या आहेत हे मी ऐकून होतो. पण आता प्रत्यक्षात अनुभव आला होता. त्या अनुभवामुळे माझी साईबाबांवरची श्रद्धा अधिक गाढ झाली. त्यानंतर मी कुठेही गेलो आणि कुठल्याही बुक स्टॉलवर एखादे साईबाबां विषयीचे पुस्तक पाहीले की खरेदी करून त्यांच्याविषयी जास्त माहीती मिळवण्याचा प्रयत्न करू लागलो. साईबाबांचा एक सुंदर फोटो मी शिरडीहून मागवून घेतला आणि घरांत लावून नित्यनेमाने त्यांना पुजू लागलो. आज माझा संसार अत्यंत सुंदर रितीने सुखात चालला आहे. तर अशी असते साईबाबांची कृपा. त्यांची कृपा आपणांस लाभल्यावर मग जीवनात काही कमी पडणार नाही.

# प्लॉट विकला गेला

**सौ. अंजली किरण शहा**
५४ महावीर नगर, सांगली ४१६ ४१६

ज्या ज्या वेळी मला अडचण अगर आमचे कुटुंबास अडचण येते त्या त्या वेळी मी मनोभावाने श्री साईबाबांना शरण जावून कृपेची मागणी करते. व त्यांचे शिरावर सर्व सोपवते. मी भक्तीभावाने त्यांचाच आश्रय घेते व त्यामुळे माझ्या सर्व आकांक्षा व अपेक्षा सफल होतात. त्याचा छोटासा दाखला असा :—

आम्हा कुटुंबियांनी पूर्वीच घेतलेल्या खुल्या जागेवर नवीन राहणेची इमारत बांधणेचे ठरवून एका सुमुहूर्तावर बांधकामास सुरवात केली खरी पण अनंत अडचणी येवू लागल्या. त्याबरोबर पैशाचीही मोठी अडचण आली. त्यावेळी आमचीच दुसरी एक खुली जागा विकून नव्या इमारतीच्या कामाची पूर्तता करावी या उद्देशाने गेले. वर्षभरावर सदर जागा विकावयाचा प्रयत्न करूनही ती विकली जाईना व आता इकडे तर पैशा शिवाय बांधकाम अपुरे राहीले व पुढे चालू करता येईना. त्या गोष्टी मुळे माझ्या पतिना व आमचे घरचे सर्वांना खूपच मानसिक त्रास होवू लागला व आमचे कुटुंबांचे सर्वांचेच मनस्वास्थ्यच जवळ जवळ संपुष्टात येवू लागले. त्यावेळी मी परमकृपाळू साईबाबांस त्यांचे फोटो समोर ठेवून व धूप करून "श्री साई देवा आमची दुसरी रिकामी जागा विक्री होऊ दे, पैसे मिळू दे. व माझ्या पतिदेवाची व आम्हा सर्व कुटुंबाची काळजी कमी होवू दे. कौटुंबिक स्वास्थ पुनश्च लाभून कौटुंबिक चिंता नष्ट व्हावी अशी प्रार्थना केली . व सर्व भार त्यांचेवर सोपविला. दोन तीन महिने आले तसेच गेले. मात्र अचानक एके दिवशी तीन चार इसम सदर रिकामे जागेविषयीं चौकशी करू लागले. त्याच सुमारास

माझे पती औरंगबादेस कामासाठी जाणार होते व तेथून श्री साईनाथांचे दर्शनालाही जाणेचे ठरले. मी श्री साई देवाशी पुनश्च सांकडे घातले की "श्री साई देवा माझे पती तुमच्या दर्शनासाठी शिरडीस जाणेचे पूर्वीच सदर रिकामे फ्लॉटची विक्री व्हावी". आणि सांगण्यास अतिशय आश्चर्य वाटते की, ताबडतोब दोनच दिवसांत वाटाघाटी होऊन सदर रिकामा फ्लॉट विकून नवीन बांधकाम बंद पडलेले ते सुरू करणेस पैसे आले.

श्री साईनाथ देव माझ्या प्रार्थनेस पावले हा तर आनंदच आहे व ते वरचेवर माझे कुटुंबावर प्रेमळ नजरेने पहात असतात त्याचे प्रत्यंतर आम्हास तर वरचेवर येते.

भक्तांसाठी सदैव धावत येणारे अनंत कोटी ब्रम्हांड नायक, राजाधिराज, योगीराज श्री साईबाबांना कोटी कोटी प्रणाम.

असेच आम्हा कुटुंबियावर आपली मायेची पाखर सदैव आहेच व ती वाढावी हीच प्रार्थना.

# साईबाबांनी सापाच्या रूपात दर्शन दिले

**सौ. सुमन पांडुरंग मिराशे**
पाटबंधारे वसाहत अुमरी (स्टे.)
जि. नांदेड

दिनांक १७ ऑगस्ट १९८२ रोजी आमच्या घरी श्री साई सच्चरिताची समाप्ती झाली. मी महादेवाच्या दर्शनासाठी १० वाजता मंदिरात गेली होती. माझ्या बरोबर इतर बायकाही होत्या मी मनात विचार करीत होते की आज सकाळी बाबांच्या पोथीची समाप्ती झालेली आहे व बाबांनी आपणास कोणत्यातरी स्वरूपात दर्शन द्यावे. ही मनातील तीव्र इच्छा होती. गावातील महादेवाच्या मंदिरात १० वाजता इतर बायका सोबत दर्शन घेत असताना एक साप कोठून आला ते कळण्याच्या आतच तो महादेवाच्या पिंडीवरून चढून पुन्हा २ मिनीटातच नाहीसा झाला. मी मनोभावे बाबांचे सापाच्या रूपात दर्शन घेतले अशा रीतीने श्री साईबाबांनी माझ्या मनातील असलेली आंतरिक इच्छा पूर्ण केली तीही पोथीची समाप्ती झालेल्या दिवशीच. धन्य ते बाबा. आम्हा साईभक्तांवर त्यांची अशीच कृपा राहो हीच प्रार्थना.

# साईबाबा नवसाला पावले

**सौ. उषा काशिनाथ जठार**
''पंचशील सोसायटी''
बि. नं. १२३, खो. नं. ४०७९
४ था माळा, नेहरू नगर
कुर्ला, पूर्व, मुं. नं. ४०० ०२४.

आमचे घरांत बरीच वर्षे साईबाबांची भक्ती चालू आहे. त्यांच्या पोथीचे पारायण पण केले आहे. साईबाबांनी केलेले अनेक चमत्कार साईलीलेमध्ये वाचले आहेत. मला पण वाटत असे की आपणाला पण साई चमत्कार दिसावा व त्याचे वर्णन साईलीलेत लिहावे. त्या प्रमाणे मला व माझ्या मुलाला त्यांच्या चमत्काराचा अनुभव आला म्हणून तो साईलीलेसाठी लिहून पाठवित आहे.

माझा मुलगा चि. अनिल हा आर. टी. ओ. मुख्य कचेरीत नोकरीस आहे. क्लार्क म्हणून. त्याची साईबाबांवर फार श्रद्धा. साईंना नमस्कार केल्याशिवाय तो घरातून बाहेर पडत नाही. त्याने असिस्टन्ट व्हेईकल इन्स्पेक्टरचे जागेसाठी परीक्षा दिली व त्या परीक्षेत उत्तम पास झाला. परंतु त्याला त्या जागेसाठी बोलावणे येत नव्हते. बरेच दिवस झाले. वाट पाहून तो कंटाळला. त्यानंतर त्याने जंगल अधिकाऱ्याचे जागे साठी परीक्षा दिली व साईबाबांना नवस केला की मला या जागेसाठी बोलावणे येऊ दे, मी शिरडीस बाबांचे दर्शनाला येईन.

परंतु जंगल अधिकाऱ्याचे जागेसाठी त्यांने जंगलात जावे हे मला आवडले नाही. म्हणून मी दयाळू साईबाबांना नवस केला की माझ्या मुलाला इन्स्पेक्टरचे जागेसाठी बोलावणे येऊ दे. म्हणजे त्याचे जाणे आपोआप रद्द होईल. परंतु साईमाऊलीला चमत्कार दाखवायचा होता. त्यांना दोन्ही भक्तांच्या इच्छा पूर्ण करावयाच्या होत्या. म्हणून त्यांनी प्रथम मुलाच्या इच्छेप्रमाणे अधिकाऱ्याचे पात्रतेसाठी पत्र पाठविले. त्याप्रमाणे त्याने बालाघाटला पूर्ण शिक्षणासाठी जाण्याची सर्व तयारी केली. तो लांब जाणार म्हणून माझ्या इच्छेप्रमाणे सत्यनारायणाची पुजा घातली. त्या नंतर तो स्वतः शिरडीस जाऊन श्री साई समाधीला भेटून आला. त्या नंतर दोन दिवसांनी त्याची निघण्याची तारीख होती. कारण तिकीटी रिझर्व केल्या होत्या. मी त्याला म्हणाले दोन दिवस आणखी थांब, त्यानंतर गुरुवारी साईंचा वार येत होता त्या दिवशी निघ असे मी म्हणत होते. परंतु तिकीटे काढलेली असल्यामुळे तो थांबावयास तयार होईना. मी मनांतून सारखा साईंचा धावा चालविला होता की याला परत येण्याची बुद्धी द्या म्हणून. आम्ही सर्व त्याला व त्याच्या मित्राला पोहोचविण्यासाठी कल्याण स्टेशनवर गेलो. आम्ही सर्वांनी साश्रु नयनांनी दोघांना निरोप दिला व रात्री परत घरी आलो. त्या दिवशी आम्हाला मुळी झोपच लागली नाही.

दुसऱ्या दिवशी बुधवारी त्या दिवशी माझा दोन नंबरचा मुलगा चि. अतुल हा पण साईभक्त आहे. आपल्या दादाने लिहून ठेवलेले राजिनामा पत्र घेऊन चि. अनिलचे ऑफीस मध्ये गेला व तेथील क्लार्क जवळ ते दिले. तो आश्चर्याने बघतच राहीला. अरे तू आलास बरे झाले कारण आम्ही अनिलचे घरी निरोप कसा पाठवावा या विचारात होतो कारण त्याचे राजिनामा पत्र आताच देऊ नका.त्याला इन्स्पेक्टरचे जागेसाठी निवडले आहे. तरी त्याला ताबडतोब तार करा व बोलावून घ्या. त्या प्रमाणे आम्ही ताबडतोब बालाघाटला तार केली व पाठोपाठ पत्र पाठविले. तार व पत्र त्याला लवकरच मिळाले. साईंची कृपा त्यांनी परत येण्याचा निर्णय त्वरीत घेतला व परत आला व नवीन जागेवर काम करू लागला.चि. अतुल हा पण श्री साईंचे कृपेने ठाण्याच्या जिल्हा कोर्टमध्ये कामाला राहीला. माझी मुलगी चि. रश्मी ही एस. एस. सी. पास झाली. त्यांची नोकरी उत्तम चाललीआहे. अशा तऱ्हेने श्री साईबाबांनी आमचे घरी आनंदी आनंद केलेला आहे. त्यांची कृपा दृष्टी अशीच आमचेवर सदैव असावी ही साईचरणी प्रार्थना.

**साईबाबा कृपाळू । फार असती मायाळू ।।**
**करती सर्वांचा प्रतिपाळू । भवसागरी या ।।**

# साई तारी त्याला कोण मारी

**श्री. दत्तात्रय बेंद्रे सावरगावकर**
मु. पो. ता. भोकर
जि. नांदेड ४३१ ८०१

श्री साईबाबांची लीला अगाध आहे. गेल्या पाच वर्षापासून मी श्री साईबाबांची भक्ती करतो. गुरुवारी उपवास करून सायंकाळी आरती करून प्रसाद म्हणून नारळ फोडतो. मी बाबांची मनोभावे सेवा करून सुद्धा बाबांचे दर्शनास शिरडीस जाण्याचा योग येत नव्हता. गेल्या एप्रील ८४ मध्ये रामनवमीला आमचे पाहुणे श्री प्रसराम पाटील चिंचाळकर शिरडीस जावून आले व मला म्हणाले,"काका तुम्ही बाबांची फार भक्ती करता परंतु एकवेळ शिरडीस बाबांचे दर्शनाची इच्छा आहे परंतु योग काही येत नाही. तुम्ही सोबत येत असाल तर आम्ही उद्याच बाबांचे दर्शनाला निघतो आणि काय आश्चर्य!आठ दिवसापूर्वीच शिरडीला जावून आलेले असून सुद्धा ते आमचे बरोबर यायला तयार झाले. मी माझी पत्नी व माझी लहान मुलगी व पाहुणे भोकरहून दि. २८.४.८४ ला नांदेडला आलो व सर्वांना रेल्वे

स्टेशनवर बसवून मी काम नसताना सुद्धा जुन्या मोंढयात गेलो परत येताना उशीर झाला म्हणून मी धावत पळत स्टेशनाकडे येत असताना मागून सी.टी. बस आली. बसचा वेग कमी आहे म्हणून मी एक हात सी.टी. चे दंडूक्यास धरून एक पाय वर ठेवला तेव्हढयात बसचा वेग वाढला व माझा एक पाय पायरीचे खालचे बाजूस गेला व दंडूक्याचा हात सुटला. तेवढयात पापणी लवते न लवते सी.टी. . मध्ये तोच एका व्यक्तीने माझ्या दंडास घट्ट धरून सी.टी. . मध्ये ओढले मी तर बेशुद्ध पडल्यागत झालो व माझ्या सर्वांगास दर दरून घाम फुटला. मला बोलता येईना. बस मधील अनेक व्यक्तीनी मला विचारले एवढया घाईने कोठे जात आहात ? मी उत्तर दिले ''बाबांचे दशनाला''. सर्वांनी खरोखरच बाबांचे उपकार मानले. मी बस मधून उतरून रेल्वे स्टेशन मध्ये आलो तर आमची सर्व मंडळी रेल्वेत बसली व रेल्वे सुटणार तेवढयात मी त्यांचे जवळ गेलो. एवढा वेळ का लावलात म्हणून ते माझेवर रागावणार तेवढयात मी वरील घटना त्यांना सांगताच सर्वांचे डोळयात पाणी आले व सर्वांनी बाबांचे आभार मानले व बाबांची कृपा व बाबांचे दर्शनास आपण जात आहोत म्हणूनच प्रत्यक्ष बाबांनी अपघातातून वाचविले. यापुढे आमचा प्रवास व दर्शन सुखरुप झाले व सुखाने घरी परत आलो.

मला दुसरा ताजा अनुभव दि. २२-१२-८४ रोजी आला. सकाळी मी स्नान करून माझ्या दिड वर्षाच्या मुलीस घेऊन नित्याप्रमाणे हनुमानाचे दर्शनास गेलो. येताना फूल घेवून घरी आलो. माझी दिड वर्षाची रंजना नावाची मुलगी हातात फूले घेऊन घरात आली. साईबाबांचे फोटोसमोर समई जळत होती. माझी मुलगी बाबांचे फोटो जवळ गेली व वाकून बाबांचे डोक्यावर फूल तिने ठेवले. तेवढयात समईने मुलीचे झग्याचा पेट घेतला व अर्ध्यापेक्षा जास्त झगा जळाला. तेव्हा मुलगी आक्रोश करून रडू लागली व बाबा बाबा म्हणू लागली. मी बाहेर अंगणात बसलो होतो व माझी पत्नी आणि आई दुसऱ्या खोलीत गहू निवडीत बसली होती. मुलीचा आक्रोश ऐकून ते देव्हाऱ्याकडे जातात तोच ते दृश्य पाहाता क्षणीच आरडा ओरड करून हातांनी चोळून आग विझविली आणि काय आश्चर्य म्हणावे की बाबांची अगाध लीला म्हणावी. अर्ध्यापेक्षा जास्त झगा जळूनसुद्धा माझ्या मुलीचे मांडीस पंचविस पैशाचे नाण्यापेक्षाही कमी जखम झाली. वाडयातील सर्व मंडळी जमली. मी मुलीस विचारले समईकडे कशाला गेलीस? ती बोबडया भाषेत म्हणाली, ''बाबाला फूल'' आणि मी पहातो तर काय खरोखरच बाबांचे डोक्यावर फूल आहे. हे सर्व माणसानी पाहीले व सर्वांनी बाबांचे शतशः आभार मानून बाबांमुळेच मुलगी वाचली. बाबांची लीला अगाध आहे. साई तारी त्यास कोण मारी असे सर्वांचे तोंडून शब्द निघाले.

माझी दिड वर्षाची मुलगी असून सुद्धा दररोज तिन चार वेळा बाबांचे दर्शन घेऊन स्वतः अंगारा लावून घेते. माझ्या लाडक्या साई माऊलीस शतशः प्रणाम.

# – धन्य ती साई माऊली –

**– कु. जया ना. काशीद,** बी. ए.
मु. पो. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर

**धन्य ती साई माऊली, आम्हा दिन दुबळयांची साऊली ।**

वरील पंक्ती प्रमाणे खरच साईबाबा म्हणजे आईच्याही पेक्षा जादा दिलासा देणारी साऊली वाटते. त्याचे प्रत्यंतर मला आले ते मी देत आहे.

खरच तो दिवस म्हणजे आम्हा कुटुंबीयांना अंधकारमय होता. परंतु त्या अंधकारात प्रकाश दाखविणारी मायेची माऊली साई होती. माझी मोठी बहिण लताचे हृदयाचे झडप बदलण्याचे ऑपरेशन व्हावयाचे होते. वास्तविक ऑपरेशन अतिशय मोठे व अत्यंत अवघड आहे असे डॉक्टरांनी वेळोवेळी सांगितले होते. परंतु ऑपरेशन करणे अतिशय आवश्यक होते. त्यामुळे आम्ही कुटुंबीयानी नाइलाजाने ऑपरेशन करावयाचे ठरविले. परंतु मनात धाकधूक, काळजी होती. काही विपरीत तरी घडणार नाही ना ? अशी उगीच भिती वाटायची.

परंतु माझा विश्वास साईवर होता. तशी तीन चार महिनेच अगोदर बाबांची मी भक्त झाले होते. एके दिवशी दुपारी पडल्या पडल्या गुंगी लागली आणि बाबांनी दृष्टांत दिला की माझ्या बहिणीचे ऑपरेशन व्यवस्थीत झालेले आहे व मी त्या टाक्यांवर बाबांची उदी चोळते आहे. मी लगेच आईला सांगितले की ऑपरेशन व्यवस्थीत होणार मला आताच दृष्टांत बाबांनी दिला. तरी आईचा विश्वास बसणे जरा कठीणच ! शेवटी आणरवीन एक प्रयत्न म्हणून बाबांना म्हटले बाबा, माझ्या बहिणीचे ऑपरेशन व्यवस्थीत होऊ दयात.

आणि बाबांनी माझी हाक अैकली आणि माझ्या बहिणीचे ऑपरेशन व्यवस्थीत झाले. ऑपरेशन पाच तास चालले. एवढे मोठे ऑपरेशन झाले असतांना ती आठव्या दिवसा पासूनच फिरायला लागली. मग आम्ही तिला बाबांची उदी रोज लावताच तिच्या त्या दिवसापासून ती देखील बाबांची भक्ती करू लागली आहे. विशेष म्हणजे ऑपरेशनचा दिवस नक्की माहीत नव्हता. वडील मुंबईला केव्हा ऑपरेशन आहे ते पहाण्यास गेले होते. तिला अगोदरच अॅडमीट केले होते. आणि काय आश्चर्य ज्या दिवशी ऑपरेशन झाले,त्याच दिवशी त्याच वेळेला पुण्यात माझे (माझ्या आत्याकडे) बाबांच्या पोथीचे पारायणाचा शेवट होत होता.

खरच साई माऊली धन्य आहे. अशीच दीन दुबळयांच्या हाकेला ओ दयावी हिच साईचरणी प्रार्थना.

# आई साईपदी विलीन झाली

**श्री. आर. डी. सबनीस**
पर्सोनेल ऑफीसर
वालचंद नगर (जि. पुणे)

२-३-१९८० ! पौष पौर्णिमा !! त्या दिवशीच्या आकाशांतील पूर्ण चंद्राने भूतलावर सुधेचा वर्षाव केला पण मला मात्र मातृत्वाचे वियोगाचे घोर अंध:कारात लोटून दिले.

त्या आधी ८/१० महीने ती अंथरुणावर विकलांग स्थितीत जीवनाची वाटचाल करीत होती. आमचे घराणे धार्मिक ! चांगले संस्कार झालेले! जीवनाच्या पैलतीरी जातांना सुद्धा वडिलधाऱ्यांचा आदर, गुरुजना बद्दल प्रेमभाव हीच शिकवण ती ठेवून गेली. आमचे मूळ घराणे श्री स्वामी महाराज अक्कलकोटकर यांचे वारसा घेवुन आलेले! त्यातच आईच्या तारुण्यात श्री साई महाराजांच्या सान्निध्यात ती काही वेळ आलेली! श्री स्वामी व श्री साई अेकच असलेचा तिचा दृढ भाव! त्यामुळे आम्ही सर्वच साईभक्त झालो व त्याचेच अनुग्रहीत श्री नाना महाराज (श्रीधरानंद सरस्वती) यांचा अुपदेश होवुन रोपटे वाढू लागले. मातृप्रेमाचे खत पाणी निरनिराळे ग्रंथ वाचून, भजने म्हणून, ते फोफावत चाललं. तिच्या आजारपणात अनेक वेळा श्री साईनी मला धीर दिला त्यातील अेक!

अर्धांग वायुच्या दुखण्याने आई अशक्त झाली होती. मी पत्नी अन्य सर्व तिची अुत्तम सेवा करीत होतो. अशाही स्थितीत ती भजने, गाणी म्हणत असे व तिला धार्मीक ग्रंथ वाचून दाखववे लागत होते. त्यामुळे माझीही प्रगती साधत होती. फक्त हाता पायासच अर्धांग वायू असलेने वाचा अखेर पर्यत चांगली होती. कितीही श्रम पडले तरी काही वाटत नव्हते. एके दिवशी तिला मी श्री स्वामी लीलामृत (श्री अक्कलकोट स्वामी महाराज) ही पोथी दररोज १ अध्याय वाचून दाखवत होतो व ती मन लावून अैकत असे! त्यातील अेका अध्यायात स्वामी व्याधीने जर्जर झालेल्या भक्ताकडे येतात व त्यांची सुटका करण्याकरता जप माळ खाली आपटतात. माळ तुटते! मणी घरंगळून जातात! व त्याच वेळी त्यांची सुटका होते. हे वाचत असताना मला माझ्या हातातील पोथीचे पान मोठे होत गेलेले दिसले व श्री साई महाराजांनी जप माळ खाली आपटल्याचा भास झाला मला अत्यंत वाईट वाटले व पोथीचे पान अश्रूनी न्हावून निघाले. त्याच वेळी आई म्हणाली राम! धीर धर! मी आता २/३ दिवसात जाणार आहे." असे म्हणून तिची जपांची माळ तिने माझ्या गळ्यात घातली. व म्हणाली जीवनात हीची जपणूक कर! आता तुझ्या श्री साई महाराजांनीच माळ आपटली ना !" असे ती म्हणाली तिलाही तोच दृष्टांत झाला असावा.

१ जानेवारी ८० चे नविन वर्षास सुरवात झाली व त्या दिवशी तिची प्रकृती फार बिघडली. दुपारी संध्याकाळी जागुन काढल्या. २ ला दुपारी १२ वाजता प्रकृती विकोपास गेली दुपारी ३ वाजता मजकडून तिने चहा २ चमचे घेतला संबंध दिवसभर आईच्या आठवणी येत होत्या तिने घेतलेले कष्ट तिचे अध्यात्मातील अगाध ज्ञान! तिची शिकवण !! मन बेचैन होवून अश्रू वाट काढीत होते. ३.१५ वा जास्त झाले म्हणून मला सौ. ने बोलविले तिचे मस्तक माडीवर घेतले. व मनास अेकदम धीर आला. तिने घालून दिलेली शिकवण पुढे चालू ठेवण्यातच तिच्या आत्म्याला शान्ती आहे हे मनोमन पटले. तेवढयात तिने जोराने श्वास घेतला मी तिचे मस्तकावर हात ठेवला. त्यावेळी माझ्या हातावर कोणीतरी त्याचा हात ठेवल्याचा भास झाला. व ''घाबरु नकोस मी आहे ना! अस कोणीतरी म्हणतय असं वाटलं. तिची जीवन ज्योत साईपदी विलीन झाली व त्याच वेळी अश्रू आटून गेले व भितीवरच्या श्री साईच्या फोटोचा हार अुजवे बाजुनी खाली आला.

मानवी सुख दुःखात भक्तासाठी धावुन येणाऱ्या श्री साई महाराजांना शतशः प्रणाम !

# श्री बाबांची कृपा

**सौ. अवंतिका प. पाठारे**
२१ सी. गांवदेवी मुं. नं. ७.

मी व आमचे सारे कुटुंब बऱ्याच वर्षापासून श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईबाबांचे एकनिष्ठपणे भक्ती करत आहोत. माझ्या जीवनात अनेक कठीण प्रसंग आले ते सर्व त्यांच्या कृपेने निवारण झाले. आता आलेला माझ्यावर कठीण प्रसंग मी निवेदन केला नाही तर मी कृतघ्न ठरेन.

२३ सप्टेंबर १९८४ ची गोष्ट. माझ्या मुलाची प्रकृती एका एकी बिघडली. ताप चढला, नाडी चालेना व श्वास घेता येईना जीव घाबरून श्री साईबाबांना हाका मारू लागला. तो दिवस रविवारचा असल्यामुळे डॉक्टर वेळेवर मिळणे कठीण झाले. फार भयानक प्रसंग. अशावेळी शेजारील माणसाने त्यास जवळच्या हॉस्पिटलमध्ये उचलून नेले व घरी जावयास निघालेल्या डॉक्टरांना वाटेतच

अडविले. मुलाला पहाताच डॉक्टर गंभीर झाले व म्हणाले प्रयत्न करतो बाकी यश देणे ईश्वराधीन इतकेच.

त्यावेळी मला व माझ्या यजमानांना साईबाबांच्या जपाशिवाय काहीच कळत नव्हते तोंडाने जप व हाताने मुलाला अधून मधून उदी लावणे हे चालूच होते. १/२ तासांनी मुलाला घाम सुटला. मंद मंद नाडी चालू झाली व गॅसच्या सहाय्याने श्वास पण सुरु झाला व हळूहळू म्हणाला, "मला बाबा दिसले व म्हणाले, "बेटा, घाबरू नको मी तुझ्या पाठीमागे आहे." ही घटना घडावयाच्या पूर्वी २ दिवसच बाबांनी त्यास बाहेरगांवाहून घरी येण्याची बुद्धी दिली तो दिवसही गुरुवारी रात्री १२ वाजता एवढी ही बाबांची माझ्यावर कृपा दृष्टी–

**नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचिती अनुभवे ।।**

वरील वचन मुलाच्या बाबतीत अनुभवले आहे. अशीच कृपादृष्टी राहो हीच साईचरणी प्रार्थना–.

अशा या साईमाऊलीस माझे कोटी कोटी प्रणाम.

# तेल मिश्रीत उदीचा प्रभाव नि बाबांचे आगमन

**सौ. इंदिरा मोरेश्वर खेडेकर**
द्वारा : राजेंद्र मनोहर पाडगांवकर
जीवन बीमा नगर, अे/६/१/१२ जीवन आराधना सो.
बोरीवली (प.) ४०० १०३.

**आवडीने भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ।**
**नको खेद करू कोणत्या गोष्टीचा । पती लक्ष्मीचा जाणतसे ।**
**सकळ जिवांचा करितो सांभाळ । तुज मोकळीक ऐसे नाही ।**
**जैशापरी स्थिती तैशीच रहावे । कौतुक पहावे संचिताचे ।**
**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा। हरि कृपे त्याचा नाश झाला ।।**

संत नाथांचा हा अभंग व सद्‌गुरु साईबाबांचा श्रद्धा व सबूरी हा बहुमोल मंत्र हे दोन्ही जीवनाला अतिशय धीर देणारे आहेत यात बिलकूल शंका नाही. माझे द्रुष्ट दैवत श्री सद्‌गुरु साईबाबा असून श्रद्धा व सबुरी हया त्यांच्या मंत्रावर माझा पूर्ण भरवसा ठेवून, त्यांची निस्सीम भक्ति मी करीत असते. माझ्यावर फार संकटाचे जरी प्रसंग आले होते, तरी ते त्यांनीच निवारण केले. माझी मुलगी सौ.

विजया हिच्यावर जो प्रसंग आला होता तो प्रसंग बाबांनी निवारण केला व फोटोच्या रूपाने दर्शन दिले. माझ्या मुलीला अंगभर एकाएकी इतकी भयंकर खाज उठू लागली, ती इतकी वाढत गेली, तिला अंग खाजवणे सुद्धा असह्य होऊ लागले. त्यासाठी डॉक्टरची, वैद्यांची, गावठी वगैरे औषधे पोटात देऊन, बाहेरून लावून झाली. थोडा गुण दिसावयाचा पण, परत जास्त खाज सुरु होत असे. तिची ती परिस्थिती पाहून माझे मनही बेचैन होत असे. तशाच परिस्थितीत सद्‌गुरु बाबांच्या फोटोच्या पुढयात उभी राहून प्रार्थना केली'', बाबा, माझ्यावर आलेली कठीण संकटे तुम्हीच दूर केलीत ना ? तर माझ्या मुलीवर आलेले हे संकट तुम्ही दूर कराल अशी माझी पूर्ण खात्री आहे. आता तुम्हीच माझे डॉक्टर, तुमची उदी हेच आता औषध.'' असे म्हणून खोबरेल तेलात उदी कालवून बाबांचे नामस्मरण करीत तिच्या सर्व अंगाला लावण्यास सुरुवात केली. रोज रात्रीचा हाच उपाय चालू ठेवला. एका आठवडयात खाजेचे प्रमाण बरेच कमी येऊ लागले. आमच्या सर्वांच्या मनाला बरेच समाधान वाटून ती आता ऑफीसात सुद्धा जाऊ लागली. धन्य असे माझ्या बाबांच्या उदीची. ह्या आनंदा प्रित्यर्थ मी बाबांचा सप्ताह सुरु केला. सप्ताहाच्या चौथे दिवशी झुणका भाकरीचा नैवद्य करून बाबाना नैवद्य दाखवून ''बाबा साईनाथा हा नैवेद्य गोड मानून घ्या''. अशी प्रार्थना करून घरातील मंडळीची जेवणास पाने वाढली. इतक्यात दरवाजावर बेल वाजली. दरवाजा उघडून पहाते, पोप्टमनने बाबांचा श्री साईलीला मासीकाचा अंक माझ्याकडे दिला अंकावर फोटो पहातो तो खंडोबाच्या देवळात बाबांचे प्रथम आगमन झाल्यावर या साई, या साई, म्हणून त्यांचे स्वागत करण्यासाठी जो फोटो होता, तोच फोटो आता मिळालेल्या अंकावर पाहिला. फोटोकडे पाहून मी म्हटले, ''या बाबा'' असे म्हणून तो हृदयाशी धरून नैवेद्य वाढलेल्या पाटावर ठेवून निरांजनं वगैरे ओवाळून अशीच आम्हावर कृपा दृष्टी ठेवा अशी प्रार्थना करून डोळयात आनंदाश्रूही उभे राहिले. बाबांचे बोल आठवले निःशंकपणे माझ्यावर भार ठेवून श्रद्धा व सबुरीवर पूर्ण विश्वास ठेवा. संतनाथांचाही अभंग याच अर्थी असल्यामुळे तो प्रथम लिहिला आहे.

# माझ्या कै. वडिलांना आलेला अनुभव

सौ. मंगला पाठक
१७६, पूर्णेद्र भवन, कधियाना, जवलपूर

आमचे कुटुंब शिरडीस कसे आले ही मोठी आश्चर्य कारक घटना आहे. श्री बाबांनी आम्हांला आपल्या चरणाशी कसे खेचून आणले. असे म्हटले तरी चालेल. ही गोष्ट माझे कै. वडिल सर्वांना नेहमी सांगत.

माझे वडिल म्हणजे पूर्वीचे (१९७२ ते १९८२ या काळातील) साईबाबा संस्थानचे पुजारी, गवई व किर्तनकार. कै. ग. वि. जोशी हे होत. त्यांना सर्वजण शिरडीस "शास्त्रीकाका" म्हणत. इ. स. १९७० जूनला वडिल कोपरगांवच्या श्री. गो. विद्यालयातून निवृत्त झाले. त्यावेळी घरात आम्ही दोघी बहिणी लग्नाच्या होतो. भावाला नुकतीच नोकरी लागली होती. कै. वडिलांना सेवा निवृत्ती वेतन मंजूर झाले होते. पण त्यावेळी ते मिळत नव्हते. पुढे एक वर्षानंतर ते मिळू लागले. पण तो पर्यंत आम्हाला आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागले. फार मोठ्या समस्येत आम्ही होतो. आईने तर धसक्याने अंथरुणच धरले होते. तशातही वडिल भिक्षुकीची येईल ती कामे करीत. भावाचीही थोडी फार मदत होतीच. येईल तो दिवस ढकलीत होतो. जवळ जवळ बर्षभर वडिल घरीच बसून होते. तशातच आमच्या स्नेहयांचा मुलगा श्री. प्रकाश यास शिरडीची सोयरीक जमली. कै. रामभाऊ खोत यांचीच ती मुलगी, रत्ना होय. प्रकाशने वडिलांना तिथी निश्चयासाठी शिरडीस नेले. तेव्हा वडिल प्रथम मंदिरात श्री. बाबांच्या दर्शनास गेले व प्रदक्षिणा घालून जाळीच्या दाराजवळ उभे राहिले. श्री बाबांना 'तूच आता यातून काही तरी मार्ग सुचव' अशी डोळ्यात पाणी आणून विनंती केली. नंतर खोताच्या घरी आले. तिथी निश्चय वगैरे सर्व कार्यक्रम आटोपल्यावर कै. खोतांनी सहजच वडिलांना "सध्या काय उद्योग चाललाय ?" अशी पृच्छा केली. कै. वडिलांनी त्यांना सर्व काही स्वत:बद्दल सांगितले. तेव्हा खोत म्हणाले, ५, ६ दिवसापूर्वीच मंदिरातील कै. विठ्ठलराव मराठे ते वारलेत. भजन, किर्तन, पुजारी या जागेसाठी आता नविन माणसाच्या शोधात आहोत. तेव्हा तुम्हाला जर त्यातले काही येत असेल तर ठीकच आहे." त्यावर वडिलांनी वरील सर्व गोष्टीत मी पारंगत असल्याचे सांगितल्यावर कै. खोतांनी त्यावेळेस असलेले रिसीव्हर श्री. का. सी. पाठक त्यांची व वडिलांची भेट करून दिली व त्यांचे जवळ वडिलांबद्दल शिफारस केली. त्यावेळी शिरडीत असलेले कै. डॉक्टर सुभाष गुजराथी हयांना वडिलाबद्दल समजल्यावर ते ही साहेबाना ज्ञावून भेटले व वडिलांबद्दल साहेबांजवळ शिफारस केली. कै. सुभाष गुजराथी हे वडिलांचे कोपरगांव पासून विद्यार्थी होते. ते सर्व झाल्यानंतर साहेबांनी वडिलांना लेखी अर्ज पाठवावयास सांगितला. परंतु अर्ज

साहेबांना मिळण्यापूर्वीच कै. सूर्यवंशी घरी (कोपरगांवला) आले व साहेबानी "ताबडतोब हजर होण्यास सांगितले आहे" असा निरोप दिला. दि. १ जून १९७१ वडिल श्री बाबांच्या सेवेसाठी शिरडीस कामावर हजर झाले. तर लग्नाची तारीख होती १० जून १९७१. ही सर्व बाबांचीच किमया होय. संकटात सापडलेल्याला बाबा कसे हात देतात. हे हया प्रसंगावरून कळले. "अगाध तव करणी । मार्ग दावीसी अनाथा ।" ही बाबांच्या आरतीतील ओळ किती अर्थपूर्ण आहे नाही!

१९७१ ते १९८१ पूर्ण १० वर्षे कै. वडिलांनी बाबांची सेवा केली. श्री. बाबांच्या कृपेने कै. वडिलांचे मनोगत पूर्ण झाले. अशीच बाबांची भक्तांवर कृपा असावी हीच सदिच्छा! असेच आमचा श्री साई कृपेने प्रवास पण सुखरुपतेने पार पडला.

आम्ही उभयता आमची १ वर्षाची मुलगी चि. आश्विनी हिला घेऊन शिरडीस दसरा उत्सवासाठी निघालो होतो. रेल्वेस्टेशनवर आलो तर हावडा बॉम्बेला फारच गर्दी दिसली. जागा मिळण अगदी कठीणच वाटू लागले. त्यांत लहान मुलीला घेऊन प्रवासाला निघालो होतो. काय करावे काहीच सुचत नव्हते. हे तर म्हणाले जागा मिळाली तरच आपण जायचे. नाहीतर सरळ परतीचा प्रवास. त्यांचेही म्हणणे अगदी मला पटले. पण मनांत जरा नाराजच झाले. डोळयासमोर तर सारखी शिरडी, उत्सवाचा प्रसंग माहेरीची माणसं दिसू लागली. हयांनी सिटींग रिझर्वेशनची चौकशी केली. तर 'नाही' उत्तर मिळाले. असेच चौकशी ऑफीसमधून बाहेर पडताना एक टी. सी. हयांना दिसला. तो जरा सज्जन वाटल्याने हयानी रिझर्वेशन मिळवून देण्याविषयी विनंती केली. कुठे जायचे! किती जण आहात! वगैरे त्याने चौकशी केल्यानंतर हयानी त्याला मनमाडला जायचे व तेथून पुढे शिरडीस जावयाचे आहे. हे सांगितल्या बरोबर त्याने खिशातून २ रु. काढून हयांच्या हातावर ठेवले व शिरडीहून येताना लिंबाखालच्या बाई जवळून अष्टगंध व प्रसाद घेऊन येण्यास सांगितले व स्वतः चा पत्ता दिला, आणि आमचीही पण जागेची सोय करून तो सद्गृहस्थ त्याची डयूटी संपल्याने निघून गेला. अशा रितीने आमचा जबलपूर ते शिरडी प्रवास केवळ साईनाथांच्या कृपेने सुखरूपतेने पार पडला. मनातले मनात बाबांचे आभार मानले व सद्गदीत होऊन नमस्कार केला.

# * बाबांचे विलक्षण अस्तित्व *

**श्री. संजय व्ही. माडीवाले**
मु. पो. राजगुरु नगर, ता. खेड, जि. पुणे.

पुणे येथील माझे मामा श्री. वसंतराव चिथले यांचा पुणे महानगरपालिका वसाहतीत, हनुमाननगर येथे बंगला आहे. त्यांचेच मागील बाजुस त्यांचे अेक

स्नेही श्री. यादव यांचाही बंगला आहे. श्री. यादव हे अनन्य साईभक्त असून, त्यांचेकडे श्री साईबाबांची उपासना नित्यनियमाने चालू असते. श्री. यादव यांचे घरातील वातावरण अतिशय धार्मिक असून ते स्वत: दरवर्षी आषाढी अेकादशीला ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखी बरोबर पायी पंढरपूरला जात असतात. त्यांचेकडेच साधारण ४ ते ५ वर्षापूर्वी घडलेली ही अेक सत्य घटना आहे.

अेकदा रविवारी सुट्टी असल्यामुळे श्री. यादव आपल्या बंगल्याला कुलूप लावुन, नानापेठेतील घरी मुक्कामाला गेले होते. ४ ते ५ वर्षापूर्वी हनुमाननगर भागात लोकवस्ती विशेष वाढलेली नव्हती. त्याच अंधाऱ्या रात्री श्री. यादव यांच्या बंगल्याचे कुलूप तोडुन काही चोर सराईतपणे आत घुसले. बाहेरील खोलीत चोरुन नेण्यासारख्या वस्तु अेकत्र करून, आणखीन काही मिळते का हे पहाण्यासाठी चोर आतील खोलीत आले. आतमध्ये कपाटात काही मूल्यवान दागिने व गादीखाली ठेवलेली रोकड रक्कम चोरांना आढळून आली. खोलीत त्यावेळी अंधार असल्यामुळे नीट दिसण्यासाठी चोरांनी दिवा लावला असावा. कारण खरा चमत्कार इथेच घडुन आला असल्याची शक्यता आहे. आतील खोलीत कपाटावर भितीलगत परमपूज्य बाबांची अेक भव्य, मनोहारी तसबीर आहे. जिच्या अस्तित्वाचा अनुभव श्री. यादव यांनी अनेक वेळा घेतलेला आहे.

दुसऱ्या दिवशी श्री. यादव नेहमी प्रमाणे बंगल्यावर परत आले. त्यावेळी त्यांना बाहेरील दरवाज्याचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत आढळून आले. आतील सर्व वस्तु इतरतत: पडलेल्या होत्या. चोरून नेतायेतील अशा सर्व वस्तु, रोकड रक्कम व काही दागिने अेकत्र करून ठेवलेल्या स्थितीत होते. श्री. यादव व त्यांच्या काही मित्रांनी तपास केला, तेव्हा असे आढळून आले की खोलीतील अेकही वस्तु किंबहुना अेक पैसादेखिल नाहीसा झालेला नव्हता. हा अेक चमत्कारच म्हटला पाहिजे.

परमपूज्य बाबांच्या विलक्षण, भारावून टाकणाऱ्या अस्तित्वामुळे, चोरांना मनोवृत्तीत बदल झाला असेल. कदाचित चोरी करण्याची त्यांना हिम्मत झाली नसेल. अशा प्रकारचे अनेक तर्क उपस्थित होतात. ज्यांची अुतरे केवळ बाबांकडे पाहिल्यावरच मिळू शकतील. श्री. यादव यांचे तोंडून मात्र अनाहूतपणे शब्द बाहेर पडले.....

**। या अुपकारा साईनाथा । केवि अुतराई व्हावे चरणांवर ।**
**। आम्हा काहीच कळेना सर्वथा । ठेवितो माथा चरणांवर ।**
**। दिन दिन आम्ही पामर । कृपा असावी अनाथांवर ।**
**। आता येथुन पुढे निरंतर । चरणी तव थार असावा ।**

# ।। 'शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी ।।

**श्री. एस. पी. तिकोने**
से. नं. २७ अ/३८०,
'साईकृपा' प्राधिकरण पुणे ४४.

या साईबाबांच्या उक्तीची प्रचिती मी प्रत्यक्ष अनुभवली. मी व माझी पत्नी दोघेही साईभक्त आहोत. लग्नानंतर पत्नीमुळे मी साईभक्त झालो.

एखादा प्रसंग असा येतो की; मन विचलीत होते. मनाची द्विधा अवस्था होते. मन चिंती ते वैरी न चिंती. अशाच एका कठीण प्रसंगातुन साईबाबांनी मला वाचवले आहे.

माझी पत्नी तिसऱ्यांदा गरोदर होती. पहिली दोन सिझरीन झालेली होती. एक मुलगा व एक मुलगी आहे. तिसऱ्यांदा दिवस गेल्यावर मी नको म्हणत होतो. परंतु पत्नीची मनोकामना व साई इच्छा म्हणा— डॉक्टरांचा सल्ला घेतला. डॉक्टरांनी सांगितले तिसरे मूल होणे. भितीचे कारण नाही.

मी तर मनाने खचुन गेलो. मित्र, मंडळी. सगे सोयरे सर्वजण म्हणत ३ रे सिझरीन धोक्याचे असते. मला काही सुचेना. असेच ३ महिने लोटले. हे बाळंतपण व्यवस्थित झाले नाही तर ? असे प्रश्नचिन्ह माझ्या डोळ्यापुढे आ वासुन उभे रहात असे. पत्नी रोज साईबाबांची भक्ती करीत असे. असेच दिवसा मागुन दिवस, महिन्या मागुन महिने गेले. ९ वा महिना लागला. बाबांच्या श्रद्धेमुळेच ९ महिने लोटले. बाळंतपणाची तारीख जवळ येवू लागली. जीवाची घालमेल होवू लागली, मनाची चंचलता वाढली पोट तर नेहमी पेक्षा जास्तच आलेले दिसत होते.

आम्ही दोघे एका परिचित गृहस्थाकडे गेलो. त्यांनी आम्हाला धीर दिला २३-२-८४ ते २५-२-८४ या दिवशी दवाखान्यात जाऊ नका म्हणून सांगितले. दुर्दैवाने २२ तारखेपर्यंत काही त्रास झाला नाही. २३ तारखे पासून २५ तारखे अखेर पत्नीला खूप त्रास झाला. रडत होती त्याही कठीण परिस्थितीत साईबाबांचे नामस्मरण चालू होते. बाबांची उदी लावली, आणि २६ तारीख उजाडली.

पत्नीला वेदना व खूप त्रास होवू लागला तिची पूर्ण खात्री झाली की आपण आता जगणार नाही. जेवण जाईना, झोप लागेना, कामात लक्ष लागेना पण आम्हा उभयतांचा बाबांवरच विश्वास. बाबांनीच मला यातुन तारून नेले.

२६ तारीख रविवार. डॉक्टरांकडून तपासून घ्यावे म्हणून आम्ही दुपारी दवाखान्यात गेलो. डॉक्टर भेटतील की नाही शंकाच. परंतु बाबांचे तसविरीचे

दर्शन घेवुन, उदी लावुन बाहेर पडलो. त्याच दिवशी नसबंदी शिबिर असल्याने मुख्य डॉक्टर आणि इतर डॉक्टरही सुदैवाने भेटले.

दवाखान्यात गेल्यावर डॉक्टरांनी लगेच ऑपरेशनचा निर्णय घेतला. मी तर घाबरूनच गेलो पण स्वतःला सावरले. बाबांचे नामस्मरण सुरू केले. ब्लड टेस्ट करून ग्रुप सांगितला रक्त तयार ठेवण्यास सांगुन सासऱ्याना घेवुन दवाखान्यात गेलो. सासरेही साईभक्त आहेत. त्यांनी मला धीर दिला. साईबाबा सर्व काही व्यवस्थित पार पाडतील असा मला धीर दिला. हॉस्पिटलमध्ये जाताच सिस्टर बाळ घेऊन बाहेर आली आणि म्हणाली मुलगा झाला. ऑपरेशनही व्यवस्थित झाले. माझा जीव भांड्यात पडला.

हॉस्पिटलमध्ये समोरच श्री कृष्णाची मूर्ती आहे. मला क्षणभर तेथे साईबाबांच दिसले. साईबाबांनी मला प्रसाद दिला. म्हणून मी माझ्या या मुलाचे नाव "साई प्रसाद" ठेवले.

**।। नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचिती अनुभवे ।।**

या वचनाचा प्रत्यय मला आला. अशी ही साई माऊली आम्हावर अशीच सदोदित कृपा दृष्टी ठेवो हीच साई चरणी प्रार्थना.

# जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव

**सौ. रेखा क. केणी**
८/४१, बी.डी.डी. चाळ, मुंबई ४०० ११५

पांच वर्षापूर्वीची गोष्ट आहे. माझ्या छोटया भावाची मुलगी त्यावेळी जेमतेम एक महिन्याची असेल तिला तेलपाणी करायला एक बाई ठेवली होती. १५ ते २० दिवसानंतर तिने माझ्या वहिनीला (मुलीच्या आईला) सांगितले की, "इतके दिवस मी मुलीला तेल लावते तर ती एरव्ही कधीही न रडता फक्त एकाच पायाला तेल लावताना ती जोरात रडते व तो पाय जवळ ओढून घेते. मला तिच्या पायात कांहीतरी दोष असल्याचा संशय येतो तरी तुम्ही डॉक्टरकडे तपासून खात्री करून घ्या." एवढे ऐकून माझी वहिनी धांवतच माझ्याकडे आली. आम्ही शेजारीच रहातो. मी ताबडतोब भावाच्या घरात गेले व त्या बाईच्या तोंडून पुन्हा ते ऐकून गारच पडले. पुन्हा पुन्हा पायाला हात लावून

पाहू लागले तर खरच पाय ओढल्यावर मुलगी जोरात रडायची. आम्हाला काही कळेनासे झाले. शेवटी तिला डॉक्टरकडे नेण्याचे ठरले. तशीच मी माझ्या खोलीत परत आले व वेळोवेळी संकटातून वाचविणाऱ्या परमेश्वरास 'श्री साईबाबांस' आर्त स्वरांत हाक मारली व गाऱ्हाणे घातले की, ''बाबा तुमच्या या छोटया लेकराला आज डॉक्टरांकडे नेणार आहेत तरी तुमच्या कृपेने डॉक्टरांकडून रिपोर्ट चांगला येऊ दे व तिच्या पायात काही दोष नसू दे. तुमच्या कृपेने सर्व काही ठीक होऊ दे. बाबा, तुमच्या दर्शनाला शिरडीला तिला आम्ही घेऊन येऊ''.

नंतर त्याच संध्याकाळी तिच्या आईवडिलांनी डॉक्टरांकडे नेऊन तपासून घेतले. डॉक्टरांनी रिपोर्ट दिला की, तिच्या पायात काहीही दोष नाही. आम्हा सर्वांची चिंता परमेश्वराने दूर केली. आज ती मुलगी पाच वर्षाची झाली असून सिनिअर के. जी. मध्ये शिकत आहे. श्री बाबांना सांगितल्या प्रमाणे त्याचवर्षी आम्ही सर्वजण शिरडीला जाऊन तिचा नवस दिला.

त्याच प्रमाणे दोन तीन महिन्यापूर्वीची गोष्ट आहे. आमची वहिनी म्हणजे मुलीची आई एका रात्री अचानक उठून बसली व अंगात शक्ती नसल्यासारखी डोळे सताड उघडे ठेवले होते. हातपाय लांब करून बसलेली होती. तेवढया रात्री तिला काय झाले हे माझ्या भावाच्याही लक्षात येईना त्याने मला उठविले. मी त्यांच्या घरी गेले व तिची ती अवस्था पाहून गारच पडले. मी सुद्धा तिला हलवून हलवून विचारू लागले तरी ती मान वर करून आमच्याकडे बघेना व काही बोलेना. एकाएकी तिला काय झाले हे आम्हाला कळेना. शेवटी तिला कसेबसे धरून उभे केले परंतु तेव्हढयात ती धाडकन् खाली कोसळली. माझ्या तर तोंडचे पाणीच पळाले. मी बाबांना प्रार्थना केली व बाबांची उदी घेऊन तिला पाण्यातून प्यावयास दिली. पांच मिनिटे झाली असतील तोच तिने आमच्याकडे पाहिले व ओळखल्यासारखे केले. नंतर तिला विचारले, की आता कसे वाटते ? तर तिने मानेने होकार दिला. सकाळी उठल्यावर रात्रीच्या प्रकाराबद्दल विचारले तर ती म्हणाली, ''काय झाले होते हे मलाच कळले नाही. अशी ही बाबांची उदीची किमया व संकटकाली धावून येणाऱ्या आपल्या भक्तांसाठी बाबांची लागलेली तळमळ.

असो, हे अनुभव देण्यास मला मात्र उशीर झाला आहे. तरी श्रीसाईबाबांनी आपल्या या लेकीला क्षमा करावी व सतत आमच्यावर कृपा ठेवावी हीच त्यांच्या चरणी प्रार्थना. अशा हया परमेश्वरास आमचे कोटी कोटी प्रणाम.

# श्रद्धा व सबुरी

डिसेम्बर १९८३ ची गोष्ट आहे. माझी मुलगी त्यावेळी इयत्ता १२ वी मध्ये शिकत होती. प्रथम तिला सर्दी पडसे झाले. नेहमी प्रमाणे फॅमिली डॉक्टरकडून सतत आठ दिवस औषध घेतले परंतु तिला गुण येईना. हळूहळू तिचा खोकला इतका वाढला की सतत खोकल्याची उबळ येवून ती अस्वस्थ होई. तिची ही अवस्था आम्हाला पाहवत नसे. शेवटी दुसऱ्या डॉक्टरकडे तिला नेले त्यांनी तपासून सांगितले की, 'मुलीची छाती कफाने भरली असून तिला न्युमोनिया झाला आहे'. त्यांनी तिला बरीचशी औषधे व इंजेक्शन दिली असे करून पंधरा दिवस निघून गेले तरी तिला आराम पडेना. शेवटी त्यांच्याच सल्ल्याने रक्त, लघवी वगैरे स्पेशालिस्ट कडून तपासून घेतले. परंतु त्यातहि कांही दोष सापडला नाही. नंतर त्यांनी आम्हाला तिचा छातीचा क्षकिरण काढण्याचे सांगितले त्या रिपोर्टमध्येही त्यांना काही दोष नसल्याचे आढळून आले. मुलीच्या प्रकृतीत काहीच फरक पडत नव्हता. श्री साईबाबांना माझी प्रार्थना चालूच होती. शेवटी स्पेशालिस्टकडे तिला नेले. त्यांनी सर्व रिपोर्ट पाहीले व पुन्हा छातीचा क्षकिरण काढण्यास सुचविले. आम्ही त्याप्रमाणे केले व क्षकिरण फोटो रिपोर्ट आणण्याकरिता तिचे वडिल तिला घेऊन डॉक्टरकडे गेले. डॉक्टरांनी मुलीला बाहेर थांबण्याचे सांगून तिच्या वडिलांना सांगितले की, ''मुलीच्या हद्‌यात काहीतरी दोष दिसत आहे तरी तिला जास्त धावपळ करू देऊ नका तसेच ती घाबरून जाईल अशी कोणतीही गोष्ट तिच्या समोर होऊ देऊ नका. तरीही तुम्ही तिला एकदा सायन हॉस्पिटलमध्ये घेऊन या मी तिकडे तिला व्यवस्थित तपासून मग काय ते सांगतो. असे सांगून त्यांनी आम्हाला हॉस्पिटलला घेऊन जाण्याची तारीख दिली.

घरी आल्यावर मला ही गोष्ट माझ्या यजमानांनी गुपचुप सांगितली. मला तर गळल्यासारखे झाले व त्या दिवशी आम्ही दोघेही खूप रडलो. तेही मुलीच्या नकळतच.

मी माझ्या परमेश्वरास, श्री साईबाबास साश्रुनयनांनी पुन्हा प्रार्थना केली की, 'देवा, मुलीला सायन हॉस्पिटलमध्ये घेऊन जावयाचे आहे तरी तुमच्या कृपेने, आशिर्वादाने या तुमच्या छोटया मुलीला वाचवा, व ती बरी होऊ दे व डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे काही नसू दे. बाबा, मुलीची १२ वीची बोर्डाची परिक्षा सुद्धा जवळ आली आहे. तिचे सारे भवितव्य तुमच्या हाती आहे. या तुमच्या लेकीला संकटातून वाचवा.

तत्पूर्वी माझ्या भावाच्या सांगण्यावरून आम्ही तिला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तपासून घेतले. त्यांना देखील काही दोष नसल्याचे आढळून आले. परंतु तिचा खोकला काही कमी नव्हता.

शेवटी ठरल्या दिवशी आम्ही सायन हॉस्पिटलला तिला घेऊन गेलो. डॉक्टरांनी स्क्रिनिंग वगैरे करून तिला व्यवस्थित तपासले व दोन दिवसांनी डॉक्टरांच्या दादरच्या दवाखान्यात रिपोर्ट आणण्यास बोलाविले. त्या दिवशी जीव मुठीत घेऊन व बाबांची पुन्हा प्रार्थना करून आम्ही दादरला गेलो. परंतु बाबांची लीला अगाध त्यांच्या कृपेने डॉक्टरांनी जी शंका व्यक्त केली होती ती दूर झाली होती व त्यांनी कांहीही दोष नसल्याचे सांगितले. केवळ हा मुदतीचा खोकला असून तो औषधाने हळूहळू बरा होईल असे सांगितले व त्यांनी बाहेरची बरीचशी औषधे लिहून दिली. आठ दिवसानी खोकला हळूहळू कमी झाला व मुलीला बरे वाटले. केवढे अनंत उपकार केले श्री बाबांनी माझ्यावर ! एका मोठया संकटातून आम्हाला वाचविले. त्याच प्रमाणे १२ वीच्या बोर्डाच्या परिक्षेतही प्रथम वर्गात मुलगी पास झाली. ही सर्व त्या दयाघनाची किमया. अशीच सदैव कृपा आमच्यावर राहो ही त्यांच्या चरणी प्रार्थना.

# बाबांचा अद्‌भूत चमत्कार

**सौ. सिंधू सणस**
साईनगर काटोल, नागपूर

बाबा कसे, केव्हा आणि कोणत्या रूपाने भेटतील हे साईभक्तांनी अनुभवले आहेच. तरीही मी माझा सत्य अनुभव साईभक्तांपुढे सादर करीत आहे.

माझ्या आयुष्यातील हा पहिला प्रसंग आहे. दिनांक १५-८-८० ची घटना आहे. रात्री १० वाजता मुले जेवण करून झोपली होती. माझे पति रात्री ११ वाजता घरी आले. त्यांना जेवायला वाढले. त्यांना दुध पोळी दिली. दुध जास्त झाले म्हणून त्यांनी कपात दुध काढले व कप भिंतीला टांगलेल्या कपाटात ठेवला. जेवण आटोपले. आम्ही बोलत बसलो.

समोरच्या खोलीत ५ फूट उंचीचे लाकडी कपाट होते. त्या कपाटावर धाडकन काहीतरी पडल्यासारखा आवाज झाला. मी त्यांना म्हणाले काय पडले, ते तरी बघा, ते लाईट लावायला गेले. इतक्यात माझे लक्ष खाली गेले. तो माझ्या दोन पायाच्या मधोमध पांदानकृति आकृति. ते भयानक रूप बघून मी देहभान विसरले. जवळच देव्हारा होता. त्यांत श्रीची मूर्ती बाजूला गजानन महाराजांचा फोटो आणि समोर चौरंगावर कलश मांडला होता. बाजूला दोन पेटया होत्या. त्या ठिकाणी १

फूटही जागा नव्हती. त्या ठिकाणी मी कसे गेले हे सुद्धा कळले नाही. मी डोळे लावून गजानन महाराजांच्या फोटोला डोके ठेवले. हात श्रीच्या मूर्तीजवळ जोडले व काही हालचाल न करता बेशुद्ध अवस्थेत बसले होते. माझे पति लाईट लावणार इतक्यात त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले. तेव्हा हिला काय झाले म्हणून मज जवळ आले. मला उचलून बाजूला केले, व इकडे तिकडे बघू लागले ते महाराज मी ज्या ठिकाणी बेशुद्ध अवस्थेत बसले होते. त्या ठिकाणावरून निघून आमच्याकडे येत होते. इतक्यात मुले जागी झाली. त्यांना तिथेच थांबा असे म्हणताच मी जोराने किंकाळी मारली, व त्यांच्या अंगाला मिठी मारली. त्यांनी टाळयांचा आवाज केला. स्वारी माघारी फिरली व ज्या ठिकाणी कलश मांडला होता त्या चौरंगाखाली ठाण मांडून बसली. माझ्या अंगाला थरकाप होत होता. मुलांना कापूर, उद व उदबती लावायला सांगितली. रात्री ३ वाजेपर्यंत सर्वजण बोलत बसलो. सकाळी नागपंचमी होती. चहा करिता दुधाचा कप काढला. परंतु कपात दुधाचा एकही थेंब नव्हता.

स्वारी कलशा जवळच अदृश्य झाली. २० दिवसा पूर्वी आमचेकडे १६ वर्षाचा मुलगा आला. त्याने सांगितले होते. तुम्हाला चमत्कार घडेल, परंतु घाबरू नका किंवा मारू नका. परंतु आम्ही सर्व लोक विसरलो होतो. तेव्हा पासून माझे ब्लड प्रेशर कायमचेच बंद झाले.

बाब भक्तांना कोणत्या रूपाने दर्शन देतील हे सांगणे कठीणच आहे बाबा मला यापुढे असे दर्शन देऊ नका. हा प्रसंग मी आयुष्यात कधीही विसरणार नाही. हा सर्व चमत्कार बाबांचा म्हणावा लागेल. यात तीळ मात्रही संशय नाही. बाबांचे वास्तव्य सर्वत्र आहे अशा श्री साईस माझे शतशः प्रणाम.

**जीधर देखे, उधर हैं साईबाबा**
**जीधर बैठे, उधर है साईबाबा ।**

# कुठेही जा दुनियेवर मी तो तुमचे बरोबर

**श्री. गुलाबराव य. देशमुख**
५०/१०, नवीन पनवेल
जि. रायगड.

साईभक्तांना अनेक सुखद अनुभव येत आहेत. कोणाला स्वप्नामध्ये मार्गदर्शन तर कोणाला दृष्टांत! मला स्वतःला अनुभव आले आहेत. ते खाली प्रमाणे—

एकदा माझे मानेवर एक लहान गाठ झाली होती. ती हाताला थोडी कठीण लागत होती. मी नियमितपणे त्या गाठीवर बाबांचे नाव घेऊन उदी चोळत असे. चार पांच दिवसात ती गाठ नाहीशी झाली व मी चिंतामुक्त झालो.

एकदा मी व माझा मित्र ऑफिसच्या कामासाठी मुंबईला गेलो असताना सिटी बसमध्ये चढण्याच्या प्रयत्नात माझे घडयाळ पडले. गर्दीमुळे आम्हाला बसमध्ये कंडक्टरने घेतले नाही म्हणूनच बरे झाले. कारण मी किती वाजले म्हणून बघण्यासाठी मनगटाकडे बघितले तर घडयाळ जागेवर नव्हते! मी मित्राला म्हणालो घडयाळ गेले आता मिळणे शक्य नाही हे वाक्य एका सद्‌गृहस्थाने ऐकले व आम्हाला म्हणाला, "तुमचे घडयाळ आहे का? तो बघा तो माणूस घेऊन जात आहे. पोलीस स्टेशनवर जमा करावयाला! मी धावतच त्याच्या पाठीमागे गेलो व घडयाळाबाबतीत त्याच्याकडे विचारणा केली तेव्हा तुमचे घडयाळ आहे का? असे विचारताच मी घडयाळाची ओळख पटवून दिली. त्याने माझे घडयाळ माझे स्वाधीन केले, त्या गृहस्थाला हॉटेलात नेऊन त्यास चहा पाजला, तो साधा धोतर घातलेला मळकट कपडयामध्ये होता पैसे देऊ केले असताना कुठल्या तरी स्टेशनाचे नाव घेतले व मला तिकडे जावयाचे आहे तेव्हढे भाडयाचे पैसे द्या! विशेष म्हणजे चहाचे बिल व पैसे त्याला माझ्या मित्राने दिले व तो अदृष्य झाला! त्यानंतर सात आठ दिवसात माझ्या मित्राला अत्यंत चांगली नोकरी मिळाली हे विशेष!

या नंतरचा अनुभव तर थक्क करणारा आहे. माझ्या दुसऱ्या एका मित्राला एका सिंधी साईभक्ताने एक यंत्र पूजेसाठी दिले आहे ते यंत्र देवळात बाबांचे चरणावर ठेवून दोन फकिराना दोन, दोन पाव देऊन पूजेसाठी ठेवण्यास सांगितले. संध्याकाळी आम्ही दोघे बाबांच्या देवळात जाऊन ते यंत्र बाबांच्या चरणावर ठेवले व परत घेतले व पांव बघण्यासाठी पनवेल स्टेशनच्या स्टॉलमध्ये गेलो, पाव मागितले असताना त्याने पाव संपल्याचे सांगितले. भिकारी तेथे होते परंतु पाव शिल्लक नव्हते म्हणून माझा मित्र नाराज झाला, त्याने माझ्या तोंडाकडे बघितले मी म्हटले, "बाबांची इच्छा!" तेव्हढयात मी समोर बघितले तर कोणीतरी सायकल स्टेशनच्या प्रवेश द्वारात उभी करत होता त्या कॅरेजवर कसली तरी पेटी होती. म्हणून मी पेटीचे प्लॅस्टिकचे कव्हर काढून बघितले तर आंतमध्ये पावाच्या लाद्या होत्या! मला अत्यंत आनंद झाला होता मी ताबडतोब मित्राला हाक मारली व त्याला सांगितले बाबांनी तुझ्यासाठी पाववाल्याला पाठवून दिला बघ! त्या भैय्याकडे पाव मागितले तर त्यांनी चार पाव विकत दिले काय बाबा तर त्या भैय्याच्या रुपात आपल्या भक्तांच्या इच्छापूर्ती साठी आले तर नसतील ना? नक्कीच कारण स्टॉलमध्ये पाव नाहीत हे उत्तर यायला व त्याची सायकल स्टेशनवर उभी करण्यात काही सेकंदाचा फरक बस! साईलीला म्हणतात ती हीच! साईनाथांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम!

# श्री बाबांची कृपा

**श्री. कृ. भा. देशमुख**
३८३ शुक्रवार पेठ
पुणे २.

सकाळची घाईची वेळ.९ वाजले होते.घरांतील पूजा अितर सर्व कामे अुरकून मी रिक्षा गाठली. सौ. अुज्वलाच्या छातीवर गाठ आली होती व ती सारखी ठणकत होती म्हणून आम्ही के.ई.एम. हॉस्पिटल गाठले. डॉ. पत्कीनी सौ. अुज्वलाला तपासले व आपल्या अितर डॉक्टरांशी सल्ला मसलत करून मला सांगितले "गाठ कॅन्सरची आहे" लौकरात लौकर ऑपरेशन केले पाहिजे नाहीतर पुढे त्रास होईल. माझा स्वभाव मुळात भित्रा, त्यात गाठ कॅन्सरची म्हटल्यावर माझे धाबे दणाणले. डोक्यात विचार चक्र सुरु झाले. सौ. अुज्वलाचे काय होणार ? कॅन्सर झालेला मनुष्य फार दिवस टिकत नाही हे सर्वांनाच माहित. घाबरलेल्या मनस्थितीत मी माझे पुण्यातील दोन बंधूना भेटलो व सर्व हकिकत सांगितली ते सुद्धा थोडे चरकले. मुंबईतील माझ्या बंधु भगिनींना पण मी पत्रे टाकली. मनांत बाबांचा धावा सुरु होताच सौ. अुज्वलाला मात्र हे अेकून विशेष काही वाटले नाही. तिचा बाबांवर फार विश्वास, तीच मला सांगत होती, "तुम्ही फारच घाबरट आहात, आपले बाबा आहेत ना ? ते नेहमीप्रमाणे आपले संरक्षण करतील". ऑपरेशनची तारीख ठरली माझे सर्व बंधू भगिनी आदल्या दिवशीच पुण्यात येअून दाखल झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता ऑपरेशन असल्यामुळे सर्वजण ८ वाजता के.ई.एम. हॉस्पिटल मध्ये हजर झाली. सकाळी ९ वाजता ऑपरेशन सुरु झाले. माझा अेक भाअु पद्माकर हा फार धीट.तो ऑपरेशन थिअटरच्या दाराशीच थांबला होता.मी मात्र के.ई.एम. हॉस्पिटलच्या गेटपाशी निराश घेअून बसलो होतो. मात्र बाबांचा धावा सुरु होता. जवळ जवळ पंचवीस मिनिटानंतर डॉ. पत्की ऑपरेशन थिअटरच्या बाहेर आले अधिरतेने माझे बंधूनी त्यांना विचारले डॉक्टर ऑपरेशन चांगले झाले ना. डॉ. पत्की म्हणाले, "अहो देशमुख तुम्ही नशीबवान आहात गाठ कॅन्सरची नाही ती टी.बी. ची आहे. नौवद अिंजिक्शन्स घेतली तर तुमची वहिनी पूर्ण बरी होईल". पद्माकर धावतच माझेकडे आला व म्हणाला दादा घाबरु नकोस गाठ कॅन्सरची नाही ती टी.बी. ची आहे व ती बरी होईल असे डॉ. पत्की म्हणतात. हे अैकताच माझा आनंद गगनात मावेनासा झाला. परमपूज्य बाबांचे चित्र माझे डोळयापुढे अुभे राहिले. माझ्या खिशातील पाकिटात असलेला बाबांच्या फोटोकडे मी कितीतरी वेळ पहात होतो. माझे डोळे आनंदाने भरुन आले. पुढे सौ. अुज्वला पूर्ण बरी झाली. खरोखरच बाबांनीच सौ. अुज्वलाला वाचविले. त्या अनंत कोटी ब्रम्हाडनायक बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम. बाबा अशीच कृपा दृष्टी आम्हा सर्व भक्तांवर असू द्या. हीच प्रार्थना.

# " भोळी भक्ति भोळा भाव, तेथे माझा साई घेई धाव"

**सौ. वैशाली ग. आरेकर**
मयूर अपार्टमेन्ट बी./८,
पहिला माळा, आर. व्ही. देसाई रोड,
बडोदा (३९०००१), गुजरात.

साईलीला मासिकात अनुभव लिहिण्याची माझी बरेच दिवसा पासून इच्छा आहे. ती इच्छा श्री साईच्या कृपेने पूर्ण होत आहे.

एकदा काय झाले, आई खूप आजारी झाली. तिला दवाखान्यात ठेवण्यात आले. भावानी मला पत्र पाठवून हे कळवले. मला अतिशय वाईट वाटले. आईला ताबडतोब भेटता येणे शक्य नव्हते, कारण ती नागपूरात रहाते व मी आहे बडोद्यात. अतिशय लांबचा पल्ला होता. मनात अतिशय वाईट वाटत होते. भावाने पाठविलेले पत्र हातातच होते. तेच पत्र मी साईबाबांच्या फोटो पुढे धरले व खूप रडले. मनातील दु:ख माझ्या साईबाबांना सांगितले व भक्तिपूर्वक प्रार्थना केली की, आईची तब्येत चांगली होवू दे. ती सुखरुप दवाखान्यातून घरी येवू दे. अगदी अंत:करणपूर्वक प्रार्थना केली आणि ही प्रार्थना माझ्या साईंनी ऐकली. परत भावाचे आठ दिवसानी आईची तब्येत बरी आहे, धोका टळत आहे असे पत्र आले. पत्र वाचून मनाला खूप आनंद वाटला. हा झालेला आनंदही त्यांना सांगितला. जेथे खरी भक्ति व निष्ठा आहे तेथे परमेश्वर धावून आल्याशिवाय रहात नाही. याचा मला अनुभव आला.

दुसरा अनुभव असा आहे की, आमच्याकडे फ्रीज घेवून एक वर्ष झाले. फ्रीज मधील वायर शॉर्ट सर्किट झाल्यामुळे त्याचा आतील भाग जळला. बरे गॅरंटी पिरीयड पूर्ण झाला व वर १।। महिना जास्त मुदत झाली. त्यांचा मेकॅनिक येवून बघून गेला. पंधराशे ते सतराशे खर्च येईल असे सांगितले. आम्ही घरातील सर्वच घाबरलो. परंतु त्या फ्रीज डीलरनी सांगितले की, तुम्ही कंपनीकडे अर्ज करून तुमची तक्रार नोंदवा. त्यांनी फ्री चार्ज सांगितला तर आम्ही फ्रीज दुरुस्त करू. अन्यथा तुम्हाला वरील प्रमाणे खर्च होईल. संकट तर आले. मनातल्या मनांत साईंची श्रद्धापूर्वक प्रार्थना केली की, तुमच्यावर विश्वास, श्रद्धा ठेवून कंपनीकडे अर्ज करीत आहे. पण तुमची कृपा असेल तर आमचे फ्रीज दुरुस्तीचे काम फ्री चार्ज होईल. आणि काय आश्चर्य कंपनीकडून 'फ्री चार्ज करून देवू' असे उत्तर आले. अशा रीतीने साईबाबांनी आमची आर्थिक संकटातून सुटका केली. अशीच बाबांची कृपादृष्टी आमच्यावर सदोदीत राहो. हीच साईचरणी माझी विनम्र प्रार्थना आहे.

# —: महत्व श्रद्धा आणि सबुरीचे :—

**श्री. सुर्यकांत गोपाळ चंचे**
मु. पो. नेरळ (पाडा)
ता. कर्जत, जि. रायगड.

माझा धाकटा भाऊ कु. विठ्ठल हा पनवेल आय्.टी.आय्. मध्ये प्रशिक्षण घेत आहे. परंतु जुलै ८४ मध्ये त्याच्या दोन्ही पायांचे घोटयांचे सांधे एकाएकी सुजले व टाचेजवळ वेदना सुरु झाल्या. त्यामुळे त्याला चालताच येईना. घरांत सर्व साईभक्त, त्यामुळे बाबांची उदी त्यास रोज पाण्यातून प्यायला दिली जाऊ लागली, व वेदना होत असलेल्या भागावर लावली जात होती. बरोबरीने डॉक्टरी उपायही चालू होते. एक्स रे काढले त्यातही फ्रॅक्चर वगैरे काही निघाले नाही. फक्त सुज आहे. असे डॉक्टरांनी सांगितले व त्यानुसार औषधे दिली. डॉक्टर प्रत्येक वेळी औषधे बदलून देत होते. त्याने दोन-तीन दिवस बरे वाटे पुन्हा परिस्थिती जैसे थे. सर्व प्रकारे उपाय करून काहीही फायदा होत नव्हता. देवांना नवस करणे, मांत्रिक, भगत सर्व प्रकार झाले पण गुण येण्याची चिन्हे दिसत नव्हती. त्यात घरांतील आवकही यथातथाच.तशाच स्थितीत त्याला ठाण्याला हाड वैद्यांकडे दाखवले. त्यांनी पुन्हा एक्स रे काढले. पण फ्रॅक्चर वगैरे काही नाही फक्त सूज आहे एवढेच निष्पन्न झाले. नंतर रक्त, मल, मूत्र तपासले व त्यानुसार औषधोपचार सुरु झाले. चार दिवस बरे वाटले. पण पुन्हा तीच परिस्थिती. सर्वांना एकच काळजी लागलेली. एवढा मोठा मुलगा फुकट जाणार. मी तर हबकलोच होतो.

अशाच परिस्थितीत दि. ३०-२-८४ रोजी मी श्री साईंच्या फोटोसमोर अक्षरश: डोळयात पाणी आणून बाबांची मन:पूर्वक प्रार्थना केली. की बाबा शेवटचाच उपाय म्हणून व शेवटचीच वेळ मी कु. विठ्ठलला डॉक्टरकडे घेऊन जात आहे. तरी त्याला बरे वाटू दे आणि बाबांनी माझी प्रार्थना ऐकली. श्री बाबांच्या कृपाशिर्वादाने डॉ. रावळ (सरकारी दवाखाना कर्जत) हयांनी दिलेल्या औषधांनी त्याच्या पायाची सुज व वेदनाही कमी झाल्या आणि तो चार ते पाच महिन्यांनी पुन्हा आपले पुढील शिक्षण घेऊ लागला आहे. त्याचे पाय पुन्हा दुखु नयेत ही श्री बाबांजवळ प्रार्थना.

श्री साई पाठिराखा असतांना (कारण बऱ्याच संकटातून बाबांमुळे माझी सुटका झाली आहे) विठ्ठलचा आजार बरा होण्यास चार पाच महिने का जावेत हे एक कोडे माझ्या समोर होते. पण त्याचे उत्तर एकच आहे. श्री बाबांवरील श्रद्धेत व बाबांनी दिलेल्या सबुरीच्या शिकवणीत आम्ही कोठेतरी कमी पडत असू. श्री साई चरणी

केलेली प्रार्थना कधीच फुकट जात नाही हेच खरे. भक्ताकडे फक्त हवी आहे श्रद्धा आणि सबुरी!

श्री साईंची दयाळू कृपादृष्टी आम्हा सर्वांवर सदैव राहो हीच श्री साईचरणी विनम्रभावे प्रार्थना!

।। ॐ चैतन्य श्री साईनाथाय नमः ।।

# " जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव"

**सौ. निर्मला चं. मालवणकर**
साई-स्मृति, दादर

संत आपल्या भक्तांच्या पाठी सदैव उभे असतात. साई सच्चरितातील १७ वा अध्यायात ७७ वे ओवीत बाबांनी म्हटले आहे—

**"माझा भांडार भरपूर आहे । देईन जो जो जे जे चाहे ।**
**परी ग्राहकाची शक्ति पाहे । देतो मी साहे तेच कीं ।।"**

याच उक्ती प्रमाणे बाबांनी आपल्या प्रेमळ भक्तांना वारंवार अनुभव आणून दिले. तसाच ५, ७ वर्षापूर्वी मला पण तसाच अनुभव आला.

माझ्या मैत्रिणीच्या यजमानांना (श्री वेलणकरांना) "साई सच्चरित" वाचावयाची इच्छा झाली. तिने माझ्या कडून ग्रंथ मागून घेतला व केव्हा परत आणू म्हणून विचारले. तेव्हा "मी सध्या 'दासबोध' वाचत आहे. सावकाश आणा". मी अधिक महिन्यात वाचीन". असे सहज बोलून गेले.

काही दिवसानी माझे यजमान मला म्हणाले आपल्या दुकानात "साईसच्चरितचे" ग्रंथ विकावयास ठेवणार आहोत त्याच्या प्रती आल्या की, मी तुला एक देईन तू पाहीजे त्याला दे. हया गोष्टीला पण बरेच दिवस होऊन गेले

श्री वेलणकर रोज संध्याकाळी थोडा थोडा ग्रंथ वाचत होते. अधिक महिन्यास सुरवात झाली तसा त्यांनी ग्रंथ पूर्ण करून मला पाठवून दिला. त्याच दिवशी संध्याकाळी हयांनी पण मला ग्रंथाची एक प्रत आणून दिली. मी मनात ठरविले की चांगलासा अधिक महिन्यातला एक दिवस पाहून चांगले गोड धोड करून नंतर सौ. वेलणकरांना घरी बोलवून प्रेमाने देऊ या (मी हे कांही त्यांना सांगितले नव्हते). दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांची मुलगी चि. सीमा पुजा करावयास गेली. तेथे साई सच्चरिताचा ग्रंथ नव्हता हे पाहून तिला फार वाईट वाटले. तिचे मन फारच

चलबिचल झाले. (तिला ग्रंथ परत केलेला माहीत नव्हता) ती रडू लागली. ''बाबा आपल्या घरातून गेले'' असे सारखे म्हणू लागली. तिचे कशातच लक्ष लागेना तेव्हा तिचे वडील तिला समजावून म्हणाले, ''मुली, लोकाचा ग्रंथ आपण किती दिवस ठेवावयाचा? बाबांची इच्छा असेल तर ते आपणाकडे येतील तू घाबरू नको धीर धर''. असे म्हणून ते ऑफिसला गेले.

इकडे मी सकाळचे काम आटोपून आरामात पडले पण माझ्या मनाला चैन पडे ना! सारखे वाटे आजच तो नेऊन द्यावा. मी तशीच पटकन उठले व १-१।। च्या सुमारास ग्रंथ गुंडाळून पिशवीत घालून घेऊन गेले.

मुली मुळे आईचे मन उदास झाले होते. मला पाहून त्यांना आनंद झाला, ''आज दुपारीच कशा काय?'' मी म्हटले, ''तुम्हांला मी बक्षीस आणले आहे.'' तसे त्यांनी तोंड धुतले वेणीफणी केली, साडी बदलली, देवा पुढे रांगोळी घालून पाट मांडला, कुंकवाचा करंडा, व साखरेची वाटी ठेवली हे पाहून तिची मुलगी आईला म्हणते ''एक मैत्रिण बक्षीस आणते, दुसरी काय पातळ बदलते, मज्जाच आहे बुवा''. तेव्हा तिची आई म्हणाली, ''अधिक महिन्यांत बक्षीस असे थाटामाटातच घ्यावयाचे असते''.

हे शब्द ऐकून मी मनात समजून चुकले, बाबांनी माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांना प्रेरणा देऊन हा साग्र संगीत समारंभ पार करून घेतला. पोथी त्यांना मला अशाच तऱ्हेने द्यावयाची इच्छा होती.

मी त्यांना कुंकू लावून साखर देऊन ग्रंथ दिला. त्यांनी उघडून पाहीला व अक्षरशः आनंदाने ओरडल्या ''सीमे, बघ बाबा आले'' व त्या माय-लेकी आनंदाने अश्रु ढाळू लागल्या. तिच्या वडिलांचे शब्द २, ३ तासातच पूर्ण होतील हयांची कोणालाच कल्पना नव्हती. हा प्रकार पाहून मी थोडी भांबावले पण त्यांनी सर्व सकाळचा प्रकार मला सांगितला. तेव्हाच बाबांनी मला आजच नेऊन द्यावयास सुचविले. मी हा ग्रंथ आज देणार नव्हते. चांगलासा दिवस पाहून देणार होते.

तिला येवढा आनंद झाला. तिने लगेच शिरा केला. ग्रंथाची आरती केली. येवढे होते ना होते तो तिचे वडील ऑफिस मधून आले. एक पाय दारात न एक पाय घरात तो बाबा आल्याची वर्दी तिने वडीलांना दिली. त्यांचेही हृदय आनंदाने गलबलून गेले. एकाच वेळी आम्हा तिघानाही आपला साक्षात्कार बाबांनी दाखविला. ही आठवण आली की अजूनही माझ्या अंगावर आनंदाचा काटा उभा राहातो.

अधिक महीन्यात माझा ग्रंथ सत कारणी लागला बाबांच्या कृपेने माझ्या हातून चांगल्या गोष्टी घडो अशी मी सतत बाबांच्याकडे प्रार्थना करते.
श्री सच्चीदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय.

# बाबांनी हाक ऐकली

**सौ. वत्सला जाधव**
१५१/५०७९ नेहरू नगर
कुर्ला, मुंबई ७०.

माझे लग्न झाल्यापासून म्हणजे १९५७ पासून आम्ही दोघे बहुतेक दरवर्षी शिरडीला जात असू. नंतर मुलं लहान लहान होती तरीही आम्ही जात होतोच.

पण मध्यंतरी ७-८ वर्षे बाबांकडे जाण्याची आठवण होती पण जाता आले नाही. माझे आई, वडील, बहिण सर्व देवाघरी गेले आणि मी अतिशय दुःखी झाले पण बाबांकडे जाण्याची वेळ मात्र येतच नव्हती. कितीही ठरविले तरी जमत नव्हते.

आता माझ्या मुली मोठया झाल्या आहेत. त्यांच्या लग्नाच्या विवंचनेत रोज होते. कोठेच जमत नव्हते, आणि एक दिवस बाबांचीच चाहूल लागली. जणू मी असताना काळजी कशाला. बस! मनाने घेतले की मी शिरडीला जाणार. बाबांना सर्व सांगणार ते सर्व काही करणार मी कशाला चिंता करू ?

आणि १३ एप्रिल १९८५ रोजी मी एकटीच प्रवासी बसने शिरडीला गेले. एकटी जाण्याचा पहिलाच प्रसंग! पण काही अडचण आली नाही.

१४एप्रिलला सकाळी बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. मी एक छोटीशी कविता लिहून ज्यात बाबांनी मुलींच्या लग्नाचा प्रश्न सोडवावा व छान जावई शोधून द्यावा हा आशय होता. ती कविता पुजाऱ्या जवळ बाबांच्या चरणाला लावून देण्याची विनंती केली. पुजाऱ्यांनी बाबांच्या चरणावरील दोन सुंदर गुलाबाची फुले माझ्या अगदी बरोबर दिली.

मी मनोमन बाबांची कृपा समजले व शांत चित्ताने घरी आले जणू माझ्या प्रश्नाचे ते उत्तरच बाबांनी दिले होते. मी तो कागद व फुले देव्हाऱ्यांत ठेवली. आणि ३० जून १९८५ ला मी माझ्या मोठया मुलीचे लग्न ठरविले. तिचा प्रेमविवाह आहे. पण आम्हाला काही ते जमत नव्हते पण बाबांचीच प्रेरणा झाली व आम्ही सर्व रितीरिवाजाप्रमाणे व्यवस्थित ठरविले व १८ ऑगस्टला १९८५ ला थाटामाटात साखरपुडा केला.

हे काम बाबांनीच आमच्या कडून शांत चित्ताने व आनंदाने करवून घेतले यात शंकाच नाही. आपण काहीच करू शकत नाही हे पटले. बाबांची कृपा व आशीर्वाद सतत मिळतो. फक्त आपण प्रेमपूर्वक आळवणी करावी. बाबा आपली इच्छा पूर्ण करतात. श्री बाबांना शतशः प्रणाम!

# ।। जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।।

**सौ. सुशीला केशव पंडित**
३ शांती सदन, वाकोला ब्रिज,
म्युनिसिपल शाळे मागे,
सान्ताक्रुझ मुं. ५५.

गेल्या महिन्यातील गोष्ट. आम्ही उभयता शेगाव, नागपूर, रायपूरला जाण्यासाठी निघालो. आषाढी एकादशीच्या दिवशी घरून निघून द्वादशीस शेगाव मुक्कामी पोचलो. पुष्कळच गर्दी होती. जेमतेम श्री गजानन महाराजांचे दर्शन झाले. आम्हीच नेलेले पेढे प्रसाद म्हणून मिळाले. वर मंदिरात आल्यावर आम्ही पुजाऱ्याजवळ पळीभर तीर्थ मागीतले. ते म्हणाले इथे बाटली आणली असेल तर तीर्थ मिळेल. क्षणभर मनात आले त्या तीर्थाने मरणोन्मुख माणसे बरी होतात. तेथे आम्हाला पळीभर तीर्थ मिळाले नाही म्हणून मनाला रुखरुख वाटली. हे म्हणाले चल गाडीची वेळ होत आहे. तेथून आम्ही नागपूरला गेलो. तेथे माझ्या भावाचे घर आहे. भावास गेल्या वर्षी देवाज्ञा झाली होती. घरी वहिनी व दोन मुली होत्या. इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्यावर मी तिला म्हणाले की उद्या आम्ही रायपूरला जाणार तेव्हा ती म्हणाली आल्यासारखे दोन दिवस रहा. उद्या गुरुपौर्णिमा आहे. इथे श्री साईबाबांचे मंदिर आहे. तेथे आपण दर्शनास जाऊ. मला खूप आनंद झाला.कारण गेले सात आठ वर्ष मी साईबाबांच्या उत्सवास मैत्रिणीकडे जात होते. प्रवासात असल्यामुळे नुसते नामस्मरण करीत होते. मी एक दिवस थांबायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी एक वाजता निघालो. तेवढयात मुसळधार पावसास सुरवात झाली. मी साईबाबांना कळकळीने विनंती केली की, पाऊस थांबव व आम्हाला दर्शनाचा लाभ मिळू दे. आणि खरोखरच पाऊस थांबला व आम्ही दिड वाजता बाहेर पडलो. नागपूरचे ते साईबाबांचे ते भव्य मंदिर पाहून डोळयांचे पारणे फिटले. तेथे नित्यानंदस्वामी महाराज, गजानन महाराज आदि पुष्कळ स्वामींची फोटोंची दर्शने झाली. तेथून श्री गजानन महाराजांच्या उत्सवास गेलो. तेथे पादयपूजा करण्यास मिळाली. मुख्य म्हणजे तेथे तीर्थप्रसाद मिळाला. माझ्या मनाचे समाधान झाले. तेथून दुसऱ्या दिवशी आम्ही रायपूरला गेलो. तेथे माझा भाचा राहातो. रिक्षावाल्यास त्याच्या घरी जाण्याचा पत्ता सांगितला तर तो म्हणाला, ''मालूम है वो साईमंदिर के पास उनका मकान है!'' मला आश्चर्यच वाटले की साईबाबा मी जाते तेथे माझ्या मागोमाग आहेत की काय खरोखरच त्यांच्या कवनाप्रमाणे ''जेथे जातो तेथे तु माझा सांगाती'' याची प्रचिती आली. म्हणूनच आम्हाला प्रवासात त्रास झाला नाही. असे आहेत माझे बाबा – साईबाबा.

# भूषणचा ताप गेला

**सौ. सुहास अजित नाईक**
गणेश चौक, 'साई कृपा'
हरदा.

**'शरण मज आला, आणि वाया गेला**
**दाखवा, दाखवा ऐसा कोणी**
**नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य**
**नित्य घ्या 'प्रचित अनुभवे ।'**

'माझा भक्त जो दृढ श्रद्धेने मजवर पूर्ण विश्वास ठेवून मला शरण आला आहे, त्याला मी कृतांताच्या दाढेतूनही ओढून काढीन'. गुरु माऊलीच्या ह्या वचनाची प्रचिती मला नुकतीच आली.

मानवाच्या आयुष्यात सुख तसेच दुःख दोन्ही येतात. सुखात मनुष्य अत्यंत आनंदात असतो तर दुःखाने होरपळून निघतो. माझ्या आयुष्यातही चटके लावणारे असे दोन प्रसंग आले.

माझे सासरे निस्सीम साईभक्त आहेत. आमच्या घरातील प्रत्येक नवीन काम साईबाबांच्या कृपाशीर्वादानेच पार पडते. नकळतच माझीही बाबांवर श्रद्धा बसली.

तीन वर्षापूर्वी मी बरीच भाजले होते. त्या वेदना सहन करण्याची ताकद मला बाबांनीच दिली व मी लवकर बरी झाले. 'माणसाचे भोग त्याला स्वतःलाच भोगावे लागतात पण त्यातून पार पडण्याची शक्ती माऊलीच्या नामस्मरणाने येते,' असा दिलासा तेव्हा माझे सासरे मला देत. जणू त्यांच्या मुखी बाबाच मला धीर द्यायचे.

अलीकडचाच एक प्रसंग देत आहे. मला पाच वर्षाचे दोन जुळे मुलगे (भरत-भूषण) आहेत. ऑगस्टमधील गोष्ट आहे. २० तारखेला रात्री ९ वाजेपर्यंत भूषण ठीक होता नंतर त्याला अचानक थंडी वाजू लागली, उलटी झाली व त्याने डोळे फिरवून मान टाकली. मी खूपच घाबरले. शेजारीच माझी आजी रहाते. ते सर्वजण धावून आले. आता पुढे काय घडेल ह्या विचाराने पायातील अवसान गळाले. मी बाबांचा धावा केला. सासूबाईंनी त्याच्या अंगाला उदी लावली व तोंडातही बळेच उदीचे पाणी घातले. सासरे बाबांच्या फोटोसमोर जप करीत बसले. बऱ्याच वेळाने तो थोडा कण्हला. डॉक्टरानी ताप पाहीला तर १०७ डिग्री होता. त्यांनी इंजेक्शन दिले व म्हणाले यापुढे आपण उपचार करू शकत नाही. मुलाच्या डोक्यावर व डोळयावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तुम्ही देवावर हवाला ठेवा. भूषणचे

डोळे शून्यात होते. तो कुणालाच ओळखत नव्हता. तापात असंबद्ध बडबडू लागला. आम्ही सर्वजण बाबांचा धावा करीत होतो. अखेर पहाटे पाच वाजता ताप उतरु लागला. माऊलीच्या कृपेने माझ्या भूषणला पुनर्जन्म मिळाला. म्हणतात ना 'बाबांचे होते लक्ष, काळाला मिळाले नाही भक्ष्य'. माऊलीच्या कृपेची फेड मी उभ्या आयुष्यात करू शकणार नाही. बाबांची लीला अगाध आहे.

अशीच बाबांच्या कृपेची सावली आमच्यावर तसेच सर्व भक्तांवर राहो हीच गुरुचरणी प्रार्थना. अशा गुरुमाऊलीला माझे शतशः प्रणाम.

# ।। बाबांचा आशिर्वाद ।।

**कु. लिना गोविंद पराडकर**
१०/बी चौबा चंदन सोसायटी
जोगेश्वरी (वेस्ट)

**श्रद्धा सबुरी मन मे रखो**
**साई साई नाम लेलो**
**मन की होगी पुरी आस**
**करो साई का निज ध्यास**

हया पंक्ती आठवल्या की बाबांच्या अगाध लीलेची कल्पना येते. हया पंक्ती डोळयासमोर ठेवून बाबांनी मला दिलेली प्रचिती मी साईभक्तांसमोर ठेवीत आहे.

हया जगात माणसाला सुख दुःख येतच असतात पण ते भोगण्याचे किंवा कमी करण्याचे सामर्थ्य बाबांच देतात ते म्हणजे श्रद्धा व सबुरीच्या जोरावर. अशीच मी आजारी होती. म्हणजेच मला गळयाजवळ एक ग्लँड झाली होती. परंतु त्याच्यावर मी खूप उपाय केले पण काही ती कमी होईना मी ज्या ज्या डॉक्टरकडे जाई त्या त्या डॉक्टरांना मी माझ्या ग्लँड विषयी शंका येई त्याची ते मला लक्षणे विचारीत म्हणजे ताप येतो, भूक कमी लागते, वगैरे परंतू मला बाबांच्या कृपेने दुसर काहीच होत नव्हतं. तसेच माझे सर्व आरोग्यविषयक चाचणीचे निकाल पण स्वच्छच होते. एक्स रे पण स्वच्छ होते. त्यामुळे डॉक्टर मला म्हणाले की कशामुळे आहे ते आम्हालाच समजत नाही म्हणून. त्यांनी मला ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. ऑपरेशन म्हटल्यावर मी खूपच घाबरले त्या वेळेला श्रद्धा, सबुरी मनामध्ये ठेवून

कृपाळू साई माऊलीचाच धावा केला आणि साई माऊली आपल्या भक्तासाठी धावत येते हयाची प्रचिती मला दिली. म्हणजेच माझी ग्लँड खूपच कमी झाली. अशीच सबुरी, श्रद्धा ठेवून बाबा आपल्या भक्ताचे रक्षण कोणत्याही कठीण प्रसंगी नक्कीच करतात. त्याच प्रमाणे बाबांना मी नवस केला होता की मला बरे वाटले की त्यांनी मला दिलेली प्रचिती मी साईभक्तांसमोर ठेवीन व त्याच प्रमाणे बाबा मी तुमच्या वचनास जागले.

**'नवसास माझी पावेल समाधी'**
**धरा दृढ बुद्धी माझे पायी**

# – संकट काळी धावून येणारे साईबाबा –

**सौ. योजना मारुती भोसले**
मु. पो. सदाशिवनगर
ता. माळशिरस, जि. सोलापूर

दि. १२.७.८४ गुरुवारचा दिवस होता. त्या दिवशी बाबांचा गुरुपौर्णिमा उत्सव मोठया थाटात शिरडीत साजरा होत होता. माझे पती साई भक्त असलेने ते गुरुपौर्णिमेकरिता अगोदरच चार दिवसाची रजा टाकून शिरडीस पोहोचले होते व त्या उत्सवात सामील झाले होते.

परंतु त्या दिवशी माझे घरी मला वेगळाच अनुभव आला. तो असा की, आम्हास तीन अपत्ये आहेत. पैकी तिन्ही त्या दिवशी वेगवेगळया आजाराने हैराण झाली होती. पहिली मुलगी कु. शैला ही शाळेचे आवारात जोरात आपटली. तिचे ओठ फुटले. रक्त गळू लागले. तिचे वर्गातील मुले तिला घरी घेऊन आले. मी फक्त बाबांचा धावा केला. तिला शांत केले ती ही साईबाबांचे नाव घेत होती. तिला रात्रीचा ताप भरला व उलटया होऊ लागल्या.मग मी तर खूपच घाबरले त्याच बरोबर धाकटी मुलगी कु. सीमा ही अगोदरच दोन दिवसापूर्वी तापली होती. हे वातावरण पाहून तिला जादा ताप भरला. दुसरे असे की, दोन नंबरचा मुलगा चि. प्रसाद सकाळपासून जुलाब करीत होता. रात्री नऊ वाजेपर्यंत त्याला एकूण दहा जुलाब झाले. तो अगदी पेंगाळला होता. अशक्तपणा वाढला होता. मी एकटीच घरी असले मुळे दवाखान्यात जाणे अशक्य होते व शिवाय रात्रीची वेळ होती.

मी बाबांवर अक्षरश: चिडले व म्हटले, ''बाबा हे काय तुम्ही लावले आहे'' तुमचा भक्त तुमचे दर्शनास शिरडीस बोलावून घेतलात आणि माझी परिक्षा पहाता की काय ?'' माझेकडे घरात उदी नाही परंतु आपली उदी समजून चुलीची राख तिन्ही मुलांना आपले नाव घेऊन लावली तर काय चमत्कार. मुले क्षणभरात शांत झोपली व दुसरे दिवशी काहीच घडले नाही असे दिसले. मुले अगदी पूर्ववत चांगल्या प्रकारे खेळू लागली. व जेवण करु लागली मला अक्षरश: गंमत वाटली. खरोखरच बाबा आपला महिमा अगाध आहे. भक्तांच्या हाकेला संकट काळी तत्परतेने धावता. या वरून मला आपल्या आर्शीवादाचा अनुभव आला. हा प्रसंग ते जेव्हा शिरडीवरून घरी आले तेव्हा मी त्यांना सर्व वृत्तांत वरील प्रमाणे सांगितला ते फक्त हसले व म्हणाले आपण तुझा अनुभव 'साईलीला' मासिकात देऊ त्या प्रमाणे हे लिहिले आहे.

## तुमचा मी भार वाहीन सर्वथा ।
## नव्हे हे अन्यथा वचन माझे ।।

**श्री. विलास पवार**
१९५ यादोगोपाळ पेठ
सातारा ४१५००२.

प्रत्येकास कोणता ना कोणता अंक प्रिय असतो. अगदी त्याचप्रमाणे मला आवडणारा अंक २ होय. आणि या २ अंकावरच माझे मन का स्थीर होते तर त्याचे कारण म्हणजे आजपर्यंतच्या माझ्या जीवनातील सर्व शुभ घटना या दोन अंकाशी निगडीत आहेत कधी त्या दिवशीचे तारीख २ असेल तर कधी तारखेची बेरीज २ आलेली आहे तर केव्हा ती वेळ दोनची असेल.

नुकताच आलेला अनुभवही असाच आहे तर— एका सहकारी बँकेत मी शाखा व्यवस्थापक म्हणून काम पहात असे. ती शाखा ग्रामीण भागात असलेने कामाचे स्वरूपही तशाच प्रकारे अर्थात लहान प्रमाणात! तो दिवस गुरुवारचा

होता. अनपेक्षीत बदलीची आर्डर मिळाली. शहरातील शाखा मिळाली होती सर्वच काही मोठया स्वरूपाचे, त्यामुळे मन अस्वस्थ झाले. एक मन म्हणायचे की आपणा अगोदर सिनिअर लोक असता आपणावरच एवढी जबाबदारी का? तर दुसरे सांगत होते ते एक आव्हान आहे! काहीही असो मी मात्र मनातून नरमच झालो होतो. आणि मनास स्थिर करण्याचा प्रयत्न करीत होतो. ''साईसारखा पाठीराखा असता कशाची चिंता. आर्डरप्रमाणे बदलीच्या ठिकाणी हजर झालो ती तारीख होती ११ (या तारखेची बेरी १+१ = २ येते) पहा, बाबाचे कसे लक्ष असते.

तदनंतरच्या शनिवारी माझा प्रिय मित्राचा २ वाजता एस. टी. स्टॅंडवर येत आहे. या निरोपानुसार त्यास भेटण्यासाठी त्या दरम्यान घाईघाईने जात होतो. माझे समोर थाळी करीत 'कोई दे दे बाबा' असे शब्द कानावर येईपर्यंत दोन पाऊले पुढे गेलो होतो. क्षणभर मागे येऊन त्या थाळीत मी पैसे ठेवले. आणि निघणार तोच माझा दंड धरला. शर्टच्या खिशातून पुढी काढून माझ्या मुठीत ठेवीत म्हटले, ''यह चिज बहुत बडी है। इसे हमेशा साथ रख. सब ठीक होगा। चिंता किस बातकी? आनंदी आनंद होगा।'' त्यावेळी त्या चेहऱ्यावरील भाव न्याहळीत होतो मी. आम्ही उभे होतो ते उंबराच्या झाडाच्या सावलीत. पुन्हा शब्द कानी आले 'बेटा सुबहसे खाना नही। मी समजलो इथे आणखी पैसे हवेत. क्षणभर विचार आला काही भोंदू असतात. म्हणून पुडी तशीच थाळीमध्ये ठेवीत म्हटले बाबा, यह रखो । तर त्यानी पुन्हा दंड पकडला व म्हटल, ''बेटे दो रुपयेका सवाल है ।'' जणू ''श्रद्धा - सबुरी''.

पटकन खिशातून दोन रुपये काढून थाळीमध्ये ठेवले, व पुडी घट्ट पकडून घाईतच मार्गस्थ झालो. संपूर्ण दिवस आपणास काहीतरी सापडले याच तंद्रीत होतो नि त्याचबरोबर बाबांचे अस्तित्व सारखे जाणवत होते. संध्याकाळी घरी आलो तरीही मी त्याच तंद्रीत होतो. आम्हा पती - पत्नीची श्री साईमाऊलीवर पूर्ण श्रद्धा आहे. तेव्हा सौ. स झालेला वृत्तांत सांगितला व म्हटले मला तर वाटते ते बाबाच होते. पण हे नक्की कशावरून? तेव्हा आम्ही ठरवले आपण बाबानाच विचारू या. लागलीच दोन चिठ्ठ्या तयार केल्या आणि बाबांचे नामस्मरण करून त्यातील एक उचलली तर ती पुढीलप्रमाणे होती. दुपारी भेटलो तो मीच होय!

तेव्हांपासून मनाची अस्थिरता तर कमी झालीच शिवाय उमेदही वाढली आहे - आशा आपल्या संकटसमयी धीर देणाऱ्या श्री सद्गुरु साईमाऊलीस कोटी कोटी प्रणाम !

**जो मजलागी अनन्य शरण ।**<br>
**विश्वासयुक्त करी भक्त जन ।।**<br>
**माझे चिंतन माझे स्मरण ।**<br>
**तयाचे उद्धरण ब्रीद माझे ।**

 396

# बारावे लेखक-कवी सम्मेलन - फेब्रुवारी १९८६

सालाबादप्रमाणे यंदाही श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक-कवींचे स्नेहसम्मेलन श्री क्षेत्र शिरडी येथे रविवार दिनांक २ व सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी, १९८६, रोजी आयोजित करण्यात येत आहे. तरी ज्या लेखक-कवींचे लिखाण १९८० ते १९८५ च्या दरम्यान श्रीसाईलीलेच्या अंकात किमान दोन वेळा तरी प्रसिद्ध झाले असेल, त्यांना अशी विनंती आहे की सोबत दिलेला फॉर्म संपूर्ण भरून तो ३१ डिसेंबर, १९८५, वा तत्पूर्वी मिळेल अशा अंदाजाने खालील पत्त्यावर पाठवावा.

श्री. रा. द. बन्ने
कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
मु. पो. **शिरडी** जि. अहमदनगर, ता. कोपरगाव.
(पिन ४२३१०९)

रा. द. बन्ने
(कार्यकारी अधिकारी)

**सम्मेलनासंबंधी नियम :**

१) सम्मेलनाचा फॉर्म सुवाच्य अक्षरात भरून पाठवावा व पाकिटावर एका कोपऱ्यात "सम्मेलन" असे लिहावे.

२) १ जानेवारी, १९८६ नंतर या सम्मेलनाचे फॉर्म किवा तत्संबंधी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही/स्विकारला जाणार नाही.

३) फॉर्मव्यतिरिक्त सम्मेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही परंतु एकादा फॉर्म स्वीकृत न झाल्यास तसे कळविण्यात येईल.

४) सम्मेलनास हजर रहाणाऱ्यांची निवास, भोजन इत्यादीची व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थानतर्फे केली जाईल.

५) प्रत्येकास स्वतःसमवेत कोणींहि **एकच** आप्त आणता येईल.

६) सम्मेलनास हजर राहू इच्छिणाऱ्यांनी दिनांक १ फेब्रुवारी, १९८६, रोजी संध्याकाळपर्यंत शिरडीस येण्याचे करावे.

# लेखक - कवी १२ वे स्नेहसंमेलन, शिरडी येथे
# रविवार - सोमवार दि. २ - ३ फेब्रु. १९८६

माननीय कार्यकारी अधिकारी साहेब यांना –
स. न. वि. वि.

शिरडी येथे भरणाऱ्या १२ व्या लेखक - कवी संमेलनास मी हजर राहू इच्छितो – इच्छिते. आपणास हवी असलेली माझी माहिती खाली देत आहे.

१) संपूर्ण नाव –
(प्रथम आडनाव) ·

२) संपूर्ण पत्ता –

३) व्यवसाय –

४) शिक्षण – ५) वय –

६) श्रीसाईलीला वर्गणीदार आहे – नाही.

७) वर्गणीदार असल्यास मराठी - इंग्रजी वर्गणीदार क्रमांक –

८) श्रीसाईलीलामधून गद्य की पद्य लिहितां –

९) लेख व काव्याची शिर्षके (केवळ संदर्भासाठी), महिना प्रसिद्धी वर्ष

१)
२)
३)
४)
५)

१०) सोबत कुणी येणार असल्यास त्या व्यक्तिचे नाव व नाते